श्रीदासराम ग्रंथमाला : पुष्प ६३

## अभंग दरबार भाग–२

ABHANG DARBAR Part -2

**प्रकाशक : सौ.उषा प्रतापसिंह राजपूत**
शुभंकर बंगला, राजपूत कॉलनी,
समृध्दीनगर,कुपवाड रोड,सांगली

**प्रथम आवृत्ति :** इ.स. २०१५

**संकलक व संपादक:** श्री. दीपक चंद्रशेखर केळकर
घ.नं. ८२७, श्रीराम निकेतन, श्रीबापूरावजी केळकर वाडा,
सिटी हायस्कूल मागे, गांवभाग, सांगली–४१६ ४१६
दूरध्वनी–(०२३३) २३३२४६३, भ्रमणध्वनी – ०९८२२००७५२८

**प्रकाशन दिन :** आश्विन शु.१० शके १९३७
गुरुवार दि. २२/१०/२०१५
विजयादशमी (दसरा)

© सर्व हक्क संकलक व संपादकाचे स्वाधीन

**मुद्रक :** श्री. अनिल अजित लोखंडे
श्रीदासराम ऑफसेट, सांगली.
दूरध्वनी–(०२३३) २३२२७२९

**प्रसाद मूल्य :** रु.५०/–

**प्रत मिळणेचे ठिकाण :** श्री. दीपक चंद्रशेखर केळकर
घ.नं. ८२७, श्रीराम निकेतन, गांवभाग, सांगली–४१६ ४१६
दूरध्वनी–(०२३३) २३३२४६३, भ्रमणध्वनी – ०९८२२००७५२८

।। श्री ।।

**श्रीदासराम ग्रंथमाला : पुष्प ६३**



# अभंग दरबार

**भाग – २**

◆

◆ संकलक व संपादक ◆

**श्री. दीपक चंद्रशेखर केळकर**

◆

◆ प्रकाशक ◆

**सौ.उषा प्रतापसिंह राजपूत**

**आवृत्ति पहिली** **सांगली** **इ.स. २०१५**

# प्रार्थना

**श्रीराम**

भगवान श्रीसद्‌गुरु श्रीतात्यासाहेबमहाराज कोटणीस, माझे आजोबा ती.प.पू.श्रीमामामहाराज केळकर व माझे पितृदेव ती.प.पू.श्रीदासराममहाराज केळकर यांच्या नित्य कीर्तनात त्या त्या दिवसाच्या विषयाला धरून अभंगातील काही चरण वा अभंग पदे येत असत.  अशा काही पदांचे, अभंगांचे संकलन व संपादन चि. दीपक चंद्रशेखर केळकर यानी केले व ते अभंग दरबार हे पुस्तक प्रथम आवृत्ती सन २०११ मध्ये आमचे श्री. नामदेवराव हरि पठाडे, हरीपूर यांनी प्रकाशित केली. त्याच्या सगळ्या प्रती संपल्या. हे पुस्तक सर्वांनाच आवडले व या पुस्तकाची दुसरी आवृत्ती २०१५ मध्ये आमच्या श्री. दीपक चंद्रशेखर केळकर यांनी प्रकाशित केली. ही अत्यंत विशेष आणि नमूद करण्याजोगी गोष्ट आहे.

असे हे कीर्तना संदर्भासाठी येणारे अभंग, पदे अनेक आहेत. वरील पुस्तकात जे अभंग, पदे आलेली नाहीत त्याचे पुन्हा संकलन करून हे पुस्तक ‘अभंग दरबार भाग-२’ या नावे प्रकाशित होत आहे ही अत्यंत आनंदाची गोष्ट आहे.

या पुस्तकाचे प्रकाशन करीत आहेत, आमच्या श्रीदादांवर अत्यंतिक निष्ठा असलेल्या सांगलीच्या राजपूत घराण्यातील सौ.उषाताई रजपूत या करीत आहेत. हा अभंग दरबार श्रीदादांचा कीर्तन दरबार आहे. याला फार मोठे महत्त्व आहे.

या दोनही ग्रंथातील अभंग व पदे आपणा सर्वांनाच अत्यंत मोलाची वाटणार आहेत. आणि त्यामुळे आम्हा सर्व साधकांचेवर अनंतर उपकार होणार आहेत.

या दोनही ग्रंथातील अभंग व पदे यांचे पाठांतर, त्यांचे चिंतन आम्हा सर्वांचे हातून व्हावे अशी शतशः प्रार्थना श्रीदादांचे चरणी करतो.

भगवान श्रीसद्‌गुरु श्रीतात्यासाहेबमहाराज कोटणीस, माझे आजोबा ती.प.पू.श्रीमामामहाराज केळकर व माझे पितृदेव ती.प.पू.श्रीदासराम महाराज केळकर या त्रैमूर्तींचे चरणी अभिवादन करून येथेच थांबतो.

भाद्रपद शु.४<br>गणेश चतुर्थी<br>दि.१७/०९/२०१५

श्रीदादांचा कृपाभिलाषी<br>चंद्रशेखर

॥ सदगुरु दासराम माऊली समर्थ ॥

# प्रकाशिकेचे दोन शब्द

प.पू. सदगुरु दासराममहाराज तसेच प. पू. आण्णामहाराज यांची श्री रामनिकेतन मधली कीर्तने आपल्याला भाग्याने ऐकावयास मिळतात. अत्यंत रसाळ किर्तनात विविध, मधुर चालींचे अभंग येतात. त्या अभंगाचे खास आकर्षण कीर्तन ऐकणाऱ्यांना वाटते. आणि आपणही हे अभंग म्हणावेसे वाटते. ऐकता ऐकता हे अभंग पाठ होऊनच जातात. पूर्व अभंग साधकाना हवे असतात म्हणून माझी आई कै. ति. सौ. कुसुम गुलाबसिंह राजपूत हिच्या स्मरणार्थ ही सेवा घडत आहे.

ति.सौ.आईचे बालपण बार्शीच्या भगवंताचे मंदिरात गेले. समोरच वाडा म्हणून सर्व नित्योपचार व कार्यक्रम ती आवडीने पहात असे. ऐकत असे. म्हणून तिची वृत्ती आयुष्यभर समाधानी राहिली. आम्हा सर्वाना ती रोज शिरगांवकर राममंदिर येथे नेत असे. कीर्तन, प्रवचन चुकवीत नसे. घरात माणसे जास्त व उत्पन्न फक्त पगार तरी कष्टाने आम्हास वाढवले. काम करताना भगवंताचे अनुसंधान असे. स्वैपाक करताना हरीपाठ, अभंग, धुणेधुताना श्री व्यंकटेश स्त्रोत्र म्हणे. आम्हालाही सकाळी श्रीराम जयराम जयरामचं माळ ओढायची मग नाष्ट मिळे. नैवैद्य दाखवून मगच जेवण मिळे, संध्याकाळी शुभंकरोति व माळ असे मगच जेवण करायचे.

आम्ही सहा भावंड, मिळकत कमी पण घरात डाळी करण्यापासून सर्व करेत असे सणावारी सुग्रास जेवण पाटपाणी, रांगोळणी, उदबत्ती वगैरे करन देई. शिक्षणासाठी आग्रही होती. सर्वांनी किमान ग्रॅच्युएट व्हावे ही इच्छाही पूर्ण झाली तिला कधीही काही कमी पडले नाही. व्यवहारात आमचे वडील मदतीला व मागे भगवंताचा हात होता. अशी ना चिंता अवस्था ती जाताना होती. ती गेल्यावर तिसऱ्या दिवशी दिव्याखाली पीठावर अत्यंत मनोहारी रीतीने ॐ ह्या अक्षराची कलाकुसर सर्वांनी पहिली व ती चांगल्या ठिकाणी गेली ही खात्री पटली.

प. पू. गोंदवलेमहाराजांचा अनुग्रह आमच्या आई वडिलांना. पण जेंव्हापासून ते प. पू. दादांकडे आले तेव्हा त्यांच्यात त्यांना गोंदवले महाराजच दिसले. दर सोमवार गुरुवारी एकादशीला श्री रामनिकतेनमधे कीर्तनात आई येत असे. माझे वडिल अद्यापही दररोज सायकलवरून कीर्तनात येतात. गुरुपौर्णिमेच्या दुसरे दिवीशी सन १९ जुलै २००८ ला आईने देह ठेवला. तिचे स्मरण सदोदित असतेच. कळत नकळत तिचे मन दुखावले असेल, सदय अंत:करणाने मातृहृदय क्षमा करेलच!

सदगुरु प. पू. दादामहाराज, प. पू. आण्णामहाराज यांनी आमच्या संपूर्ण कुटुंबावर असेच कृपाछत्र ठेवावे. आम्हाकडून निष्ठावंत भावाने भक्ति करवून घ्यावी ही प्रार्थना!

प. पू. दीपक केळकर यांनी अत्यंत व्यस्तेतसुद्धा हे काम केले. आभार मानावेत ते थोडे! श्री.बाळासाहेब लोखंडे यांनी प्रेसचे काम भक्तिपूर्वक केले. त्याबद्दल आभार! माझ्या परमार्थात माझे पति, मुले चि. पंकज व चि. गिरीश स्नुषा सौ. कंचन व सौ. रिद्दिमा यांची नेहमीच मदत असते. पुस्तक काढताना अनेकांनी वेळ काढून मदत केली त्यांचे आभार!

**राजाधिराज सदगुरु दासराम महाराज की जय !**

श्रीदादांची कृपाभिलाषी
**सौ. उषा प्र. राजपूत**

## माझिया मनीचे.......

नको वैकुंठीचा वास । तया सुखा आहे नाश ।
अद्‌भुत हा रस । कथा काळी नामाच्या ।।

वरील श्रीतुकाराममहाराजांच्या अभंगातील उक्तीप्रमाणे श्रीअण्णांच्या कीर्तनात बसले असता, नको तो वैकुंठीचा वास, नको ते क्षणिक सुख असे वाटून जाते आणि कीर्तनात काय ब्रह्मरस आहे हे सहज जाणवून जाते. प.पू. श्रीदादांनी केलेले अभंगांचे एकत्रीकरण, त्यांनी पदांना लावलेल्या गोड चाली ऐकल्या असता मन तल्लीन होऊन जाते. अशा काही अभंगांचे एकत्रित पुस्तक आपण 'अभंग दरबार' या नांवे सन २०११ साली छापले होते. त्यानंतर या पुस्तकाच्या प्रती संपल्याने परत आपण सन २०१५ साली दुसरी आवृत्ती प्रकाशित केली.

प.पू.श्रीअण्णांचे कीर्तन म्हणजे अभंगांचा अथांग साठा असतो. एकावर एक चरण कीर्तनात सतत येत असतात. त्यामुळे मागील आवृत्तीत राहून गेलेले असे अनेक अभंग आहेत. हे सर्व अभंग एकत्रित करण्याचे काम आमच्या प.पू. श्रीदादांच्या अनुग्रहित सौ. उषाताई राजपूत यांनी केले आहे. अतिशय अवघड असे काम त्यांनी केले आहे. सर्वांगाचे कान करून कीर्तन ऐकल्याशिवाय हे घडत नाही. तसेच या व्यतिरिक्त जे अभंग राहिले ते एकत्रित करण्याचे काम माझ्या हातून झाले आहे. तसेच या पुस्तकाची कच्ची मुद्रिते तपासणे तसेच अभंग सूची करणे कामी श्री.प्रशांत गोखले यांचे बहुमोल सहकार्य लाभले आहे.

या पुस्तकाला 'अभंग दरबार भाग-२' असे नांव देण्यात आले आहे. या पुस्तकाच्या प्रकाशिका आहेत सौ. उषाताई राजपूत. त्यांनी आपल्या आईच्या स्मरणार्थ हे पुस्तक प्रकाशित केले आहे. त्यांचे प्रकाशिकेचे मनोगत आपण वाचलेत तर त्यांचा आपल्या आईविषयी असणारा कृतज्ञताभाव जाणवल्याशिवाय राहत नाही.

असे हे 'अभंग दरबार भाग-२' हे पुस्तक आपल्याकडे येणाऱ्या सर्व साधकांना उपयोगी पडेल यात शंका नाही.

भाद्रपद शु.१४, अनंतचतुर्दशी — श्रीअण्णांचा कृपाभिलाषी
दि.२७/०९/२०१५ — दीपक चंद्रशेखर केळकर

## अनुक्रमणिका


प्रार्थना
प्रकाशिकेचे दोन शब्द
माझिया मनीचे

| | |
|---|---|
| श्रीसंत मच्छिंद्रनाथ कृत अभंग | १ |
| श्रीसंत गहिनीनाथ कृत अभंग | १ |
| श्रीसंत निवृत्तीनाथमहाराज कृत अभंग | २ |
| श्रीसंत ज्ञानेश्वरमहाराज कृत अभंग | २ |
| श्रीसंत सोपानदेव कृत अभंग | ९ |
| श्रीसंत मुक्ताबाई कृत अभंग | ९ |
| श्रीसंत एकनाथमहाराज कृत अभंग | १० |
| श्रीसंत नामदेवमहाराज कृत अभंग | १९ |
| श्रीसंत तुकाराममहाराज कृत अभंग | २६ |
| श्रीसंत सेनामहाराज कृत अभंग | ४२ |
| श्रीसंत चांगदेवमहाराज कृत अभंग | ४३ |
| श्रीसंत कबीर साहेब कृत अभंग | ४३ |
| श्रीसंत कमाल साहेब कृत अभंग | ४६ |
| श्रीसंत जनाबाई कृत अभंग | ४६ |
| श्रीसंत तुकयाबंधु कृत अभंग | ५१ |
| श्रीसंत गोरा कुंभार कृत अभंग | ५१ |
| श्रीसंत सावता माळी कृत अभंग | ५२ |
| श्रीसंत चोखा मेळा कृत अभंग | ५३ |
| श्रीसंत निळोबाराय कृत अभंग | ५४ |

| | |
|---|---|
| श्रीसंत नारा कृत अभंग | ५४ |
| श्रीसंत रामेश्वरभट्ट कृत अभंग | ५४ |
| श्रीसंत शेख महंमद कृत अभंग | ५५ |
| श्रीसंत नरहरी सोनार कृत अभंग | ५५ |
| श्रीसंत सोहिरोबानाथ अंबिये कृत अभंग | ५५ |
| श्रीसंत हरीबुवा भोंडवे कृत अभंग | ५८ |
| श्रीसंत समर्थ रामदास स्वामी कृत अभंग | ५८ |
| श्रीसंत कल्याण स्वामी कृत अभंग | ६३ |
| श्रीसंत वेणाबाई कृत अभंग | ६३ |
| श्रीसंत केशवस्वामी कृत अभंग | ६४ |
| श्रीसंत गिरीधरस्वामी कृत अभंग | ६४ |
| श्रीसंत श्रीधरस्वामी कृत अभंग | ६५ |
| श्रीसंत बयाबाई कृत अभंग | ६५ |
| श्रीसंत दिनकर स्वामी कृत अभंग | ६५ |
| श्रीसंत कृष्णदयार्णव कृत अभंग | ६६ |
| श्रीसंत निजानंद कृत अभंग | ६६ |
| श्रीसंत हरिनारायण कृत अभंग | ६८ |
| श्रीसंत अमृतराय कृत अभंग | ६८ |
| श्रीसंत निरंजन कृत अभंग | ६९ |
| श्रीसंत सूरदास कृत अभंग | ६९ |
| श्रीसंत माधव कृत अभंग | ७० |
| श्रीसंत मध्वमुनिश्वर कृत अभंग | ७० |
| श्रीसंत महिपती कृत अभंग | ७१ |
| श्रीसंत मीराबाई कृत अभंग | ७२ |
| श्रीसंत भजरंगात्मा कृत अभंग | ७२ |
| श्रीसंत नरहरी कृत अभंग | ७३ |
| श्रीसंत नगदनारायण कृत अभंग | ७३ |
| श्रीसंत शिवीदिनी केसरी कृत अभंग | ७३ |
| श्रीसंत जयरामात्मज कृत अभंग | ७४ |
| श्रीसंत देवनाथ कृत अभंग | ७४ |
| श्रीसंत शिवराम कृत अभंग | ७५ |
| श्रीसंत महिपतीबोवा उज्जनकर कृत अभंग | ७६ |
| श्रीसंत निरंजन (गाणपत्य) कृत अभंग | ७६ |
| श्रीसंत मुकुंदराज कृत अभंग | ७७ |
| श्रीसंत गुलाबरावमहाराज कृत अभंग | ७७ |
| श्रीसंत पंतमहाराज बाळेकुंद्री कृत अभंग | ७८ |
| श्रीसंत स्वामी स्वरुपानंद कृत अभंग | ७८ |
| श्रीसंत ब्रह्मचैतन्य गोंदवलेकरमहाराज कृत अभंग | ७९ |
| श्रीसंत निंबरगीकरमहाराज कृत अभंग | ७९ |
| श्रीसंत रामभाऊमहाराज यरगट्टीकर कृत अभंग | ८० |
| श्रीसंत तात्यासाहेबमहाराज कोटणीस कृत अभंग | ८२ |
| श्रीसंत वामनरावजी कोटणीस कृत अभंग | ८७ |
| श्रीसंत गोपाळकाका कोटणीस कृत अभंग | ८७ |
| श्रीसंत पांडुरंगमहाराज ताम्हणकर कृत अभंग | ८८ |
| श्रीमती वेणुबाई सावर्डेकर कृत अभंग | ८९ |
| श्रीसंत मामामहाराज केळकर कृत अभंग | ८९ |
| श्रीसंत दासराममहाराज केळकर कृत अभंग | ९७ |
| दोहरे | १०१ |

# श्रीसंत मच्छिंद्रनाथ कृत अभंग

(१)

गुरुजी मैं तो एक निरंजन ध्यावूं ।।ध्रु ।।
दु:ख ना जानू दरद ना जानू, ना कोई बैद बुलावू ।।
सदगुरु बैद मिले अविनाशी वाहुको नाडी बतावू ।।१।।
गंगा न जाऊ जमुना न जाऊ ना कोई तीरथ न्हावू।
अडसट तीरथ है घटभीतर वाहुमो मनमल धुवू ।।२।।
फूल ना तोडू फतर ना फोडू ना कोई झाड सतावू ।
बनबनकी मैं लकडी ना फोडू ना कोई देवल जावू ।।३।।
कहे मछिंदर गोरख बोले जोतमे जोत मिलावू ।
सदगुरुजीकू शरन गयेसे आवागमन मिटावू ।।४।।

# श्रीसंत गहिनीनाथ कृत अभंग

(२)

वर्म नाही ठावे । ब्रह्म कैसे व्हावे ।।ध्रु ।।
भजन पूजन साधुनि योग, नेणे पूर्ण अंग ।।
पंचीकरण महासिद्धांत, वाक्य नोहे सांग ।।१।।
चार देह चार शून्य, दावी पांचव्याते ।
निघुनी जाय श्वासोच्छ्वास कोण राहे तेथे ।।२।।
विहंगम-मीन-कपि पिपीलिका मार्ग दावी चार ।
जळुनी जाय देह तेव्हा कैचे दशम द्वार ।।३।।
औट पीठ त्रिकूट घाट, दावी अर्धचंद्र ।
मातिस माती मिळुनी गेली, कैचे ब्रह्मरंध्र ।।४।।





सोहं सोहं चौदा चक्रे दावी अनुहात ।
नि:शब्दास ठाव नाही कैचा गहिनीनाथ ।।५।।

# श्रीसंत निवृत्तीनाथमहाराज कृत अभंग

(३)

गुरुरायाने नवलाव केला । देही अपूर्व बाग दाविला ।।ध्रु।।
या या बागेचे नवल सांगू काई । साडेतीन चाहूर बागशाही ।
त्यात पेरिली पंचरंगी जाई । धन्य कर्त्याची कारागिरी बाई ।।१।।
या या बागेमध्ये असे एक माळीण । तीला वर असती दोघे जण ।
एक भोगी तव एक जाय मरुन । एक जीवंत होतसे फिरुन ।।२।।
या या बागेमध्ये एक असे विहीर । मोट सतरावी वाहे निरंतर ।
मन पवनाचे लावुनिया दोर । सोहंभक्तीचे बळ असे फार ।।३।।
ऐसे केले गुरुरायांने । देहीच दाविली अंतर खूण ।
काय उतराई होऊ आता जाण । वारंवार निवृत्ती वंदितो चरण ।।४।।

# श्रीसंत ज्ञानेश्वरमहाराज कृत अभंग

(४)

तुझिये निढळी कोटि चंद्र प्रकाशे । कमलनयन हास्यवदन हांसे ।।१।।
हाल कां रे कृष्णा डोल कां रे । घडिये घडिये गुज बोल कां रे।।२।।
उभा राहोनिया कैसा हालवितो बाहो । बापरखुमादेविवरु विठ्ठलु नाहो ।।३।।

(५)

योगियां दुर्लभ तो म्या देखिला साजणी ।
पाहता पाहता मना न पुरेचि धणी ।।१।।

देखिला देखिला माये देवाचा देवो ।
फिटला संदेहो निमाले दुजेपण ।।२।।
अनंतरूपे अनंतवेषे देखिले म्यां त्यासी ।
बापरखुमादेवीवरू खुण बाणली कैसी ।।३।।

(६)

पूर्वजन्मी पाप केले ते हे बहु विस्तारले ।
विषयसुख नाशिवंत सेविता तिमिर कोंदले ।।
चौऱ्यांशी लक्ष योनी फिरता दु:ख भोगिले ।
ज्ञानदृष्टी हारपली दोन्ही नेत्र आंधळे ।।१।।
धर्म जागो सदैवाचा जे बा परउपकारी ।
आंधळ्या दृष्टि देतो त्याचे नाम मी उच्चारी ।।२।।
संसार दु:खमूळ चहूकडे इंगळ ।
विश्रांति नाही कोठे रात्रंदिवस तळमळ ।
काम क्रोध शुनी पाठी लागली ओढाळ ।
कवणा शरण जाऊ आता दृष्टि देईल निर्मळ ।।३।।
मातापिता बंधु बहिणी कोणी न पवती निर्वाणी।
इष्ट मित्र स्वजन सखे हे तो सुखाची मांडणी ।
एकला मी दु:ख भोगी कुंभपाक जाचणी ।
तेथे कोणी सोडविना एका सद्गुरूवाचोनी ।।४।।
साधुसंत मायबाप तिही केले कृपादान ।
पंढरिये यात्रे नेले घडले चंद्रभागे स्नान ।
पुंडलिके वैद्यराजे पूर्वी साधिले साधन ।
वैकुंठीचे मूळपीठ डोळा घातले ते अंजन ।।५।।





कृष्णांजन एक वेळां डोळां घालिता अढळ ।
तिमिर दु:ख गेले फिटले भ्रांति पडळ ।
श्रीगुरु निवृत्तिराये मार्ग दाविला सोज्वळ ।
बापरखुमादेविवरू विठ्ठल दीनाचा दयाळ ।।६।।

(७)

ॐ नमो शिवा आदि । कावडी घेतली खांदीं ।
मिळाली संत मांदी । त्याचे रजरेणु वंदी रे ।।१।।
शिवनाम शीतळ मुखी । सेवी पां कापडिया रे ।
दडदडदडदडदडदुडुदुडुदुडुदुडु । पळ सुटला कळिकाळा बापुडिया रे।।२।।
गुरुलिंग जंगम । तेणे दाविला आगम ।
आधि व्याधि झाली सम । तेणे पावलो विश्राम रे ।।३।।
जवळी असता जगजीवन । कां धांडोळिसी वन ।
एकाग्र करी मन । तेणे होईल समाधान रे ।।४।।
देहभाव जेथे विरे । ते साधन दिधले पुरे ।
बापरखुमादेवीवरे । विठ्ठलु रे विठ्ठलु रे विठ्ठलु रे ।।५।।

(८)

श्रीगुरूसारिखा असता पाठिराखा । इतरांची लेखा कोण करी ।।१।।
राजयाची कांता काय भीक मागे । मनाचिया जोगे सिद्धी पावे ।।२।।
कल्पतरुतळवटी जो कोणी बैसला। काय वाणी त्याला सांगिजे जी ।।३।।
ज्ञानदेव म्हणे तरलो तरलो । सत्य उद्धरलो गुरुकृपे ।।४।।

(९)

मन हे राम झाले (आता) मन हे राम झाले ।
प्रवृत्ति ग्रासुनि कैसे निवृत्तीसी आले ।।१।।

श्रवण कीर्तन पादसेवन कैसे विष्णुस्मरण केले ।
अर्चन वंदन दास्य सख्य आत्मनिवेदन केले ॥२॥
यम नियम प्राणायाम प्रत्याहार संपादिले ।
ध्यान धारणा आसन मुद्रा कैसे समाधीसी आले ॥३॥
बोधी बोधले बोधिता नये ऐसे झाले ।
बापरखुमादेविवरु विठ्ठले माझे मी पण हारपले ॥४॥

(१०)

आरंभी आवडी आदरे आले नाम ।
तेणे सकळ सिद्धि जगी झाले पूर्ण काम ॥१॥
रामकृष्ण गोविंद गोपाळा ।
तू माय माऊली जीवी जिव्हाळा ॥२॥
तुझियेनि नामे सकळ संदेहो फिटला ।
बापरखुमादेविवरा श्रीविठ्ठला ॥३॥

(११)

पन्नास अक्षरी करिसी भरोवरी । शेखी तुझे तोंड तुज वैरी रया ॥१॥
या परी नामाची वोळ हे मांडुनि । संसार दवडुनि घाली परता ॥२॥
रकारा पुढे एक मकार मांडी का । उतरसी सम तुका शंभुचिया ॥३॥
बापरखुमादेविवरा विठ्ठलु हृदयी । आपुली आण वाही त्रिभुवनी रया ॥४॥

(१२)

संत भेटती आजि मज । तेणे मी झालो चतुर्भुज ।
दोन्ही भुजा स्थुळी सहज । दोन्ही सूक्ष्मी वाढल्या ॥१॥
आलिंगने सुख वाटे । प्रेम चिदानंदी गोठे ।
हर्षे ब्रह्मांड उतटे । समुळ उडे मीपण ॥२॥



अभंग दरबार भाग - २

या संतासी भेटता । सरे संसाराची व्यथा ।
पुढता पुढती माथा । अखंडित ठेवीन ॥३॥
या संतांचे देणे । कल्पतरुहूनि दुणे ।
परिसा परीस अगाध देणे । चिंतामणी ठेंगणा ॥४॥
या संतापरीस उदार । त्रिभुवनी नाही थोर ।
मायबाप सहोदर । इष्टमित्र सोयरे ॥५॥
कृपाकटाक्षे न्याहाळिले । आपुल्या पदी बैसविले ।
बापरखुमादेविवरे विठ्ठले । भक्ता दिधले वरदान ॥६॥

(१३)

तुझी सेवा करीन मनोभावे वो । माझे मन गोविंदी रंगले वो ॥१॥
नवसिये नवसिये माझे नवसिये वो । पंढरीचे दैवते विठ्ठले नवसिये वो ॥२॥
बापरखुमादेविवरे विठ्ठले वो । चित्त चैतन्य चोरूनि नेले वो ॥३॥

(१४)

बरवा वो हरि बरवा वो । गोविंद गोपाळ गुण गरुवा वो ॥१॥
सांवळा वो हरि सांवळा वो । मदनमोहन कान्हो गोवळा वो ॥२॥
पाहता वो हरि पाहता वो । ध्यान लागले या चित्ता वो ॥३॥
पढिये वो हरि पढिये वो । बापरखुमादेविवरू घडिये वो ॥४॥

(१५)

अष्टांगयोगे न शिणिजे । यम नेम निरोध न किजे रया ॥१॥
वाचा गीत गाईजे । गाता वाता श्रवणी ऐकिजे रया ॥२॥
गीताछंदे अंग डोलिजे । लीला विनोदे संसार तरिजे रया ॥३॥
बापरखुमादेविवरू विठ्ठलु नामे । जोडे हा उपावो किजे रया ॥४॥

(१६)

कानी घालुनिया बोटे नाद जे पाहावे । न दिसता जाणावे नऊ दिवस ।।१।।
भोवया पाहाता न दिसे जाणा । आयुष्याची गणना सात दिवस ।।२।।
डोळा घालोनिया बोट चक्र जे पाहावे । न दिसता जाणावे पांच दिवस ।।३।।
नासाग्रीचे अग्र न दिसे नयनी । तरी तेचि दिनी म्हणा रामकृष्ण ।।४।।
ज्ञानदेव म्हणे हे साधूंचे लक्षण । अंतकाळी आपण पहा वेगी ।।५।।

(१७)

अवघाचि संसार सुखाचा करीन । आनंदे भरीन तिन्ही लोक ।।१।।
जाईन गे माये तया पंढरपुरा । भेटेन माहेरा आपुलिया ।।२।।
सर्व सुकृताचे फळ मी लाहीन । क्षेम मी देईन परब्रह्मी ।।३।।
बापरखुमादेविवरु विठ्ठलाची भेटी । आपुले संवसाठी करूनि ठेला ।।४।।

(१८)

दृष्टीचा देखणा दृष्टी अगोचर । दृष्टीसि गोचर कैसा होय ।।१।।
आदि मध्य झाला नाहीच की अंत । व्यापक श्रीमंत निवृत्तीराज ।।२।।
ज्ञानदेव म्हणे डोळियाचा डोळा । ओळखावा डोळा आपुलिया ।।३।।

(१९)

पैल मेरुच्या शिखरी । एक योगी निराकारी ।।
मुद्रा लावुनि खेचरी । प्राणायामी बैसला ।।१।।
तेणे सांडियेली माया । त्यजियेली कथा काया ।।
मन गेले विलया । ब्रह्मानंदा माझारी ।।२।।
अनुहत ध्वनि नाद । तो पावला परमपद ।
उन्मनी तूर्याविनोदे । छंदे छंदे डोलतसे ।।३।।
ज्ञान गोदावरीच्या तीरी । स्नान केले पंचाळेश्वरी ।।
ज्ञानदेवाच्या अंतरी । दत्तात्रेय योगिया ।।४।।





(२०)

निजाचे तेज की तेजाचे निज । तेथील ते गुज सांग मज ।।१।।
ब्रह्म ते कांयी ब्रह्म ते कांयी । ब्रह्म ते कांयी सांगा गोसावी ।।२।।
ब्रह्म सदोदित असे सर्वभूती । म्हणउनी सांगे जनाप्रती ।।३।।
ब्रह्म ऐसे नामयाने जाणिले । हृदयी धरिले प्राणलिंग ।।४।।
बापरखुमादेविवरु हृदयी प्रगटला । निवांत राहिला ज्ञानदेवो ।।५।।

(२१)

मोतियांचा चूर फेकिला अंबरी । विजुचीया परी कीळ झाले ।।१।।
जरी पितांबरे नेसविली नभा । चैतन्याचा गाभा नीळ बिंदू ।।२।।
तळीपरी परीसे शून्याकार झाले । सर्पाचीही पिले नाचू लागे ।।३।।
कडकडोनी वीज ठायीचे निमाली । भेटली मुक्ताबाई गोरोबाला ।।४।।
ज्ञानदेव म्हणे कैसी झाली भेट । ओळखिले अविट आपुलेपण।।५।।

(२२)

निजगुजा गुज तो गे बाई । मोहनाचा मोहन तो गे बाई ।।१।।
बोधाबोध बोधविता तो गे बाई । द्वैताद्वैत अद्वैत तो गे बाई ।।२।।
बापरखुमादेविवरु तो गे बाई । सर्वादि सर्वेश्वरु तो गे बाई ।।३।।

(२३)

माझ्या जिवीची आवडी । पंढरपुरा नेईन गुढी ।।ध्रु।।
पांडुरंगी मन रंगले । गोविंदाचे गुण वेधले ।।१।।
जागृती स्वप्न सुशुप्ती नाठवे । आनंदी आनंद सामावे गा ।।२।।
बापरखुमादेविवरु सगुण निर्गुण । रुप विटेवरी दाविली खुण ।।३।।

## श्रीसंत सोपानदेव कृत अभंग

(२४)

नारायणा बा नारायणा । अच्युत अनंत गोविंद म्हणा ।।ध्रु ।।
दोष जन्माचे जातील साचे । नारायण नाम घेता वाचे ।।१।।
नारायण नाम चारी ती अक्षरे । संसार तारक नाही दुसरे ।।२।।
नाम नारायण बहु दु:खहरण । सोपान म्हणे आले उच्चारोन ।।३।।

## श्रीसंत मुक्ताबाई कृत अभंग

(२५)

अहो क्रोधे यावे कोठे । अवघे आपण निघोटे ।।१।।
ऐसे कळले ज्याला पूर्ण । जन तेचि जनार्दन ।।२।।
ब्रीद बांधिले चरणी । नये दाविता करणी ।।३।।
वेल क्रोधाचा उगवला । अवघा योग फोल झाला ।।४।।
ऐसी थोर दृष्टी करा । ताटी उघडा ज्ञानेश्वरा ।।५।।

(२६)

धन्य धन्य सद्गुरुराव । माझे देही दाविला देव ।।१।।
माझे देहीच देऊळ केले । आत्मलिंग प्रकटले।।२।।
मन बेल पत्री केली । आत्मलिंगा समर्पिली ।।३।।
त्रिगुणांच्या करुनी वाती । सत्रावीच्या लाविल्या ज्योती ।।४।।
पंचप्राण पंचारती । मुक्ताई ओवाळी सद्गुरुमूर्ति ।।५।।

(२७)

झालासी तटस्त नव्हे ती समाधी । उपायाची शुद्धि नेणोनिया ।।१।।
काष्ठा ऐसा जड तैसा तू झालासी । स्वरुप नेणसी श्रमोनिया ।।२।।



अभंग दरबार भाग - २

बोलता चालता देखता ऐकता । ढळेना सर्वथा तेच साधी ।।३।।
ब्रह्मादिक ऐसी समाधी इच्छिती । तयाची हे स्थिति प्राप्ति नाही ।।४।।
ऐके रे चांगया ग्रासी हे कल्पना । पावसी त्या खुणा मुक्ताई म्हणे ।।५।।

(२८)

गोरा बोलाविला जुनाट पै जुना । हाती थापटणे अनुभवाचे ।।१।।
परब्रह्म म्हातारा निवाला अंतरी । वैराग्याचे वरी पाल्हाळला ।।२।।
सोहं शब्दे विरक्ती उरली अंबरी । पाती अणुभरी पाहिजे पण ।।३।।
म्हणे मुक्ताबाई घालू द्या लोटांगण । जाऊ द्या शरण अव्यक्तासी ।।४।।

## श्रीसंत एकनाथमहाराज कृत अभंग

(२९)

सुख दु:ख समान सकल जीवांचा कृपाळ ।
ज्ञानाचा उद्बोध भक्तीप्रेमाचा कल्लोळ ।।१।।
धन्य जगी तोचि एक हरि रंगी नाचे ।
रामकृष्ण वासुदेव सदा स्मरे वाचे ।।२।।
विषयी विरक्त जया नाही आपपर ।
संतुष्ट सर्वदा स्वये व्यापक निधी ।।३।।
जाणीव शहाणीव ओझे सोडोनिया दुरी ।
आपण वस्तीकर वर्ततसे संसारी ।।४।।
एका जनार्दनी नित्य हरीचे कीर्तन ।
आसनी शयनी सदा हरीचे चिंतन ।।५।।

(३०)

तुझ्या मुरलीचा ध्वनी । अकल्पित पडला कानी ।
विव्हळ झाले अंत:करणी । मी घरधंदा विसरले ।।१।।

अहा रे सांवळिया । कैसी वाजविली मुरली ।।ध्रु।।
मुरली नोहे केवळ बाण । तिने हरिला माझा प्राण ।
संसार केला दाणादीन । येऊनि हृदयी संचरली ।।२।।
तुझ्या मुरलीचा सूरतान । मी विसरले देहभान ।
घर सोडोनी धरिले रान । मी वृंदावनी गेले ।।३।।
एका जनार्दनी गोविंदा । पतित पावन परमानंदा ।
तुझ्या नामाचा मज धंदा । वृत्ति तव पदी निवर्तली ।।४।।

(३१)

अधरी धरुनि वेणु । वेणु वाजविला कोणी वेणु ।।१।।
प्रात:काळी तो वनमाळी । घेऊनि जातो धेनु ।।२।।
उभी मी राहे वाट मी पाहे । केव्हा भेटे मम प्राणु ।।३।।
एका जनार्दनी वाजविला वेणु । ऐकता मन झाले तल्लीनु ।।४।।

(३२)

सर्व सुखाची लहरी । ज्ञानाबाई अलंकापुरी ।।१।।
शिवपीठ हे जुनाट । ज्ञानाबाई तेथे मुगुट ।।२।।
वेदशास्त्रे देती ग्वाही । म्हणती ज्ञानाबाई आई ।।३।।
ज्ञानाबाईचे चरणी । शरण एका जनार्दनी ।।४।।

(३३)

कैवल्याचा पुतळा । प्रगटला भूतळा ।
चैतन्याचा जिव्हाळा । ज्ञानोबा माझा ।।१।।
साधकांचा मायबाप । दरुशने हरे ताप ।
सर्वाभूती सुखरूप । ज्ञानोबा माझा ।।२।।





ज्ञानियांचा शिरोमणी । वंद्य जो का पूज्यस्थानी ।
चिंतकाचा चिंतामणी । ज्ञानोबा माझा ।।३।।
चालविली जड भिंती । हरली चांगयाची भ्रांती ।
मोक्षमार्गीचा सांगाती । ज्ञानोबा माझा ।।४।।
रेड्यामुखी वेद बोलविला । गर्व द्विजांचा हरविला ।
शांतिसूर्य प्रगटला । ज्ञानोबा माझा ।।५।।
ब्रह्मसाम्राज्यदीपिका । वर्णियेली गीतेची टीका ।
विठोबाचा प्राणसखा । ज्ञानोबा माझा ।।६।।
गुरुसेवेलागी जाण । शरण एका जनार्दन।
त्रैलोक्याचे जीवन । ज्ञानोबा माझा ।।७।।

(३४)

नामाचे धारक विष्णुरूप देख । त्रिभुवनीचे सुख तये ठायी ।।१।।
ब्रह्मा विष्णु हर येताती सामोरे । नामधारक निर्धारे तया वंद्य ।।२।।
त्रिभुवनापरता नामाचा महिमा । जाणे शंकर उमा सत्य सत्य ।।३।।
एका जनार्दनी पतितपावन नाम । गाता निजधाम जोड मुक्ती ।।४।।

(३५)

अहं वाघा सोहं वाघा प्रेम नगारा वारी ।
सावध होउनी भजनी लागा देव करा कैवारी ।।१।।
मल्हारीची वारी माझ्या मल्हारीची वारी ।।ध्रु।।
इच्छा मुरळीस पाहू नका पडाल नरकद्वारी ।
बोध बुधली ज्ञान दिवटी उजळा महाद्वारी ।।२।।
आत्मनिवेदन भरित रोडगा निवतील हारोहारी ।
एका जनार्दनी धन्य खंडेराव त्यावरी कुंचा वारी ।।३।।

(३६)

सत्वर पाव गे मला । भवानी आई रोडगा वाहिन तुला ।।१।।
सासरा माझा गावी गेला । तिकडेच खपवी त्याला ।।२।।
सासू माझी जाच करती । लवकर निर्दाळी तिला ।।३।।
जाऊ माझी फडफड बोलती । बोडकी करग तिला ।।४।।
नणंदेचे पोर किरकिर करिते । खरुज होऊ दे त्याला ।।५।।
दादला मारुन आहुती देईन । मोकळी कर गे मला ।।६।।
एका जनार्दनी सगळेचि जाऊ दे । एकटीच राहू दे मला ।।७।।

(३७)

भाव धरुनिया वाची ज्ञानेश्वरी । कृपा करी हरि तयावरी ।।१।।
स्वमुखे आपण सांगे तो श्रीविष्णु । श्रीगीता हा प्रश्नु अर्जुनेसी ।।२।।
तेचि ज्ञानेश्वरी वाचे वदता साचे । भव कळिकाळाचे नाही तया।।३।।
एका जनार्दनी संशय सांडोनि । दृढ धरी मनी ज्ञानेश्वरी ।।४।।

(३८)

वारीयाने कुंडल हाले । डोळे मोडीत राधा चाले ।।ध्रु।।
फणस जंबीर कर्दळी दाट । हाती घेउनी नारंगी पाट ।
हरी पाहुनी भुलली चित्ता । (राधा) मंदिरी घुसळी डेरा रीता ।।१।।
राधा पाहुनी भुलले हरी । बैल दुभवी नंदाघरी ।
मन मिळालेसे मना । एका भुलला जनार्दना ।।२।।

(३९)

वैष्णवा घरी देव सुखावला । नवजे बाहीर दवडोनी घातला ।।
देव म्हणे माझे पुरतसे कोड । संगति गोड या वैष्णवांची ।।





जरी देव नेउनि घातिला दुरी । परतोनी पाहे तव घरा भीतरी ।।
कीर्तनाची देवा आवडी मोठी । एका जनार्दनी पडली मिठी ।।

(४०)

यार देखोरे देखो गैबी गारुडी आया ।।
आहाहाहा, अरेरेरे, अबबब, चलचलचलचल,
देखो रे देखो गैबी गारुडी आया ।।ध्रु।।
सातों सैलीपर विवेक समला जडकर उप्पर तोडा ।
ग्यान - ध्यानका रुमाल बांधे शमदम ताईत जोडा ।।१।।
अनुभव उप्पर लंघर बाजे विद्या बेद पुराना ।
सोहं शब्द का बाजा बाजे नाग सुर सुरसाना ।।२।।
एक दोन तीन मिलके पंचीसोका बाना ।
पंचतिसाने लोक गमाये छत्तीसोमें खाना ।।३।।
छनका हुन्नर छिनकी मांडी छिनोछीन ना मोजी ।
ऐसा हुनेरी एका जनार्दन विठ्ठल नाम कहो जी ।।४।।

(४१)

परेस सदगुरुराया रे । खेळ्या !! परेस सदगुरु राया रे ।।ध्रु।।
देव पुजू गेला देउळ उडाले परेस सदगुरु राया रे !
चिंचेच्या पानावर देउळ रचले आधि कळस मग पाया रे ।।१।।
दोही तोंडी हरिणी पाण्यावर आली मुखाविण पाणी प्याली रे ।।
आंधळ्याने देखिली, बहिऱ्याने ऐकिली, पांगळ्याने लागुपाठ केली रे ।।२।।
पावसा नाही सांगड मृगजळ डोही वांझेचा पुत्र पोहला रे ।
एका जनार्दनी एकपणे विनवी अखंड रामनाम बोला रे ! ।।३।।

(४२)

मोडकेसे घर तुटकेसे छप्पर । देवाला देवघर नाही ॥१॥
मला दादला नलगे बाई ॥ध्रु॥
फाटकेच लुगडे तुटकीसी चोळी । शिवाया दोरा नाही ॥२॥
जोंधळ्याची भाकर अंबाड्याची भाजी । वर तेलाची धार नाही ॥३॥
मोडका पलंग तुटकी नवार । नरम बिछाना नाही ॥४॥
सुरतीचे मोती गुळधाव सोने । राज्यात लेणे नाही ॥५॥
एका जनार्दनी समरस झाले ॥ तो रस येथे नाही ॥६॥

(४३)

तुमचे नामसंकीर्तन । हेचि माझे संध्यास्नान ॥१॥
तुमचे पायाचा साक्षेप । हाचि माझा कालक्षेप ॥ध्रु॥
तुमचे पायाचे वंदन । हेचि माझे अनुष्ठान ॥२॥
तुमचे पायापाशी निद्रा । हेचि माझी प्रेममुद्रा ॥३॥
एका-जनार्दनाकार । ब्रह्मरूप हा संसार ॥४॥

(४४)

धन्य आज दिन संत दरूशनाचा । अनंत जन्मांचा शीण गेला ॥१॥
मज वाटे त्यासी आलिंगन द्यावे । कदा न सोडावे चरण त्याचे ॥२॥
त्रिविधतापांची जाहली बोळवण । देखिल्या चरण वैष्णवांचे ॥३॥
एका जनार्दनी घडो त्याचा संग । न व्हावा वियोग माझ्या चित्ता ॥४॥

(४५)

येथुनि पुढे बरे होईल । भक्तिसुखे दोंद वाढेल ।
फेरा चौऱ्यांशीचा चुकेल । धनमोकासी ॥१॥





मी आलो रायाचा जोशी । होरा ऐका दादानो ॥ध्रु॥
मनाजी पाटील देहगावचा । विश्वास धरू नका त्याचा ।
हा घात करील नेमाचा । पाडील फशी ॥२॥
वासना बायको शेजारीण । झगडा घाली मोठी दारूण ।
तिच्या पायी नागवन । घर बुडविसी ॥३॥
एका जनार्दन कंगाल जोशी । होरा सांगतो लोकासी।
जा शरण सद्‌गुरूसी । फेरा चुकवा चौऱ्यांशी ॥४॥

(४६)

हजरत मौला मौला । सब दुनिया पालनवाला ॥१॥
सब घटमो साई बिराजे । करत हय बोलबाला ॥२॥
गरीब नवाजे मै गरीब तेरा । तेरे चरणकु रतवाला॥३॥
आपना साती समजके लेना । सलील वोही अल्ला॥४॥
जीन रूपसे है जगत पसारा । वोही सल्लाल अल्ला ॥५॥
एका जनार्दनी निजवद अल्ला । आसल वोही विटपर अल्ला ॥६॥

(४७)

हरिप्राप्तीसी उपाय । धरावे संतांचे ते पाय ॥१॥
तेणे साधती साधने । तुटती भवाची बंधने ॥२॥
संताविण प्राप्ति नाही । ऐशी वेद देती ग्वाही ॥३॥
एकाजनार्दनी संत । पूर्ण करिती मनोरथ ॥४॥

(४८)

अनादि निर्गुण प्रगटली भवानी । मोह महिषासुर मर्दनालागुनी ।
त्रिविधतापाची कराया झाडणी । भक्तालागोनी पावसी निर्वाणी ॥१॥

आईचा जोगवा जोगवा मागेन। द्वैत सारुनी माळ मी घालीन ।
हाती बोधाचा झेंडा मी घेईन । भेदरहित वारीसी जाईन ।।२।।
नवविध भक्तीच्या करीन नवरात्रा । करुनी पोटी मागेना ज्ञानपुत्रा ।
धरीन सद्भाव अंतरीच्या मित्रा । दंभ सासरा सांडीन कुपात्रा ।।३।।
पूर्ण बोधाची घेईन परडी । आशा तृष्णेच्या पाडीन दरडी ।
मनोविकार करीन कुर्वंडी । अद्भुत रसाची भरीन दुरडी ।।४।।
आता साजणी जाले मी निःसंग । विकल्प नवऱ्याचा सोडियला संग ।
कामक्रोध हे झोडियले मांग । केला मोकळा मारग सुरंग ।।५।।
ऐसा जोगवा मागुनी ठेविला । जाउनी नवस महाद्वारी फेडिला।
एकपणे जनार्दन देखिला । जन्म-मरणाचा फेरा चुकविला ।।६।।

(४९)

अशी ही थट्टा । भलभल्यासी लाविला बट्टा ।।ध्रु।।
ब्रह्मदेव त्रैलोकयाला शोधी । थट्टेने हारविली बुद्धि ।
केली नारदाची नारदी । अशी ही थट्टा ।।१।।
थट्टा दुर्योधनाने केली । पांचाळी सभेमाजी आणिली ।
गदाघाये मांडी फोडिली । अशी ही थट्टा ।।२।।
थट्टा गेली शंभोपाशी । कलंक लाविला चंद्रासी ।
भगे पाडिली इंद्रासी । बरी नव्हे थट्टा ।।३।।
थट्टेने मेला दुर्योधन । भस्मासुर गेला भस्म होऊन ।
वाळीही मुकला आपुला प्राण । अशी ही थट्टा ।। ४ ।।
थट्टा रावणाने केली । नगरी सोन्याची बुडविली ।
थट्टा ज्याची त्यास भोवली । बरी नव्हे थट्टा ।।५।।





अरण्यात होता भृगु ऋषी । थट्टा गेली त्याचेपाशी ।
भुलवुनी आणिला अयोध्येसी । बरी नव्हे थट्टा ।।६।।
विराटराजाचा मेहुणा । नाम तयाचे कीचक जाणा ।
त्याने घेतले बहुतांचे प्राणा । बरी नव्हे थट्टा ।।७।।
थट्टेपासून सुटले चौघेजण । शुक भीष्म आणि हनुमान ।
चौथा कार्तिकस्वामी जाण । त्याला नाही बट्टा ।।८।।
एका जनार्दन म्हणे सर्वाला । थट्टेला भिऊन तुम्ही चला ।
नाही तर नेईल नरककुंडाला । अशी ही थट्टा ।।९।।

(५०)

हरि हरि बोला नाही तरी अबोला । व्यर्थ गलबला करू नका ।।१।।
नको नको मान नको अभिमान । सोडी मीतूंपण तोचि सुखी ।।२।।
सुखी जेणे व्हावे जग निववावे । अज्ञानी लावावे सन्मार्गासी ।।३।।
मार्ग जया कळे भाव भक्तिबळे । जगाचिये मेळे न दिसती ।।४।।
दिसती जनी वनी प्रत्यक्ष लोचनी । एकाजनार्दनी ओळखिले ।।५।।

(५१)

कशी जाऊ मी वृंदावना । मुरली वाजवी कान्हा ।।ध्रु।।
पैल तीरी हरी वाजवी मुरली । नदी भरली यमुना ।।१।।
कासे पीतांबर कस्तुरी टिळक । कुंडल शोभे काना ।।२।।
काय करू बाई कोणाला सांगू । नामाची सांगड आणा।।३।।
नंदाच्या हरीने कौतुक केले । जाणे अंतरीच्या खुणा ।।४।।
एका जनार्दनी मनी म्हणा । देव माहात्म्य कळेना कोणा ।।५।।

(५२)

धन्य धन्य श्रीगुरुभक्त । गुरुचे जाणती मनोगत ।।१।।
गुरुचरणी श्रद्धा गाढी । गुरुभजनाची आवडी ।।२।।
गुरुचे नाम घेता वाचे । कैवल्य मुक्ती तेथे नाचे ।।३।।
गुरुचे घेता चरण तीर्थ । भुक्ति मुक्ति पवित्र होत ।।४।।
गुरुकृपेचे महिमान । शरण एका जनार्दन ।।५।।

## श्रीसंत नामदेवमहाराज कृत अभंग

(५३)

तिन्ही देव जैसे परब्रह्मीचे ठसे । जगी सूर्य जैसे प्रकाशले ।।१ ।।
धन्य तो निवृत्ति धन्य तो सोपान । धन्य हा निधान ज्ञानदेव ।।२ ।।
उपजताचि ज्ञानी हे वर्म जाणोनि । आले लोटांगणी चांगदेव ।।३ ।।
संस्कृताची गांठी उघडोनि ज्ञानदृष्टी । केलीसे मराठी गीतादेवी ।।४ ।।
प्रत्यक्ष पैठणी भटी केला वाद । रेड्यामुखी वेद बोलविला ।।५ ।।
नामा म्हणे सर्व सुकृत लाहिजे । एक वेळा जाइजे अलंकापुरा ।।६ ।।

(५४)

हडबडले पातक । रामनाम घेता एक ।।१।।
नाम घेता तत्क्षणी । चित्रे सांडिली लेखणी ।।२।।
घेऊनि पूजेचा संभार । ब्रह्मा येतसे समोर ।।३।।
नामा म्हणे जरी हे लटिके । तरि हे छेदावे मस्तक ।।४।।

(५५)

नाचू कीर्तनाचे रंगी । ज्ञानदीप लावू जगी ।।१।।
सर्व सांडुनी माझाई । वाचे विठ्ठल रखुमाई ।।२।।
परेहुन परते घर । तेथे राहू निरंतर ।।३ ।।





सर्वांचे जे अधिष्ठान । तेचि माझे रूप पूर्ण ।।४ ।।
अवघी सत्ता आली हाता । नामयाचा खेचर दाता ।।५ ।।

(५६)

सुखालागी जरी करिसी तळमळ । तरी तू पंढरीसी जाय एक वेळ ।।१ ।।
मग तू अवघाची सुखरूप होसी । जन्मोजन्मीचे दु:ख विसरसी ।।२ ।।
चंद्रभागेसी करिता स्नान । तुझे दोष पळती रानोरान ।।३ ।।
लोटांगण घालोनि महाद्वारी । कान धरोनि नाच गरुडपारी ।।४ ।।
नामा म्हणे उपमा काय द्यावी । माझ्या विठोबाची इडा पीडा घ्यावी ।।५ ।।

(५७)

ज्ञानराज माझी योग्यांची माऊली । जेणे निगमवल्ली प्रगट केली ।।१।।
गीता अलंकार नाम ज्ञानेश्वरी । ब्रह्मानंदलहरी प्रगट केली ।।२।।
अध्यात्म विद्येचे दाविलेसे रूप । चैतन्याचा दीप उजळिला ।।३।।
छपन्न भाषेचा केलासे गौरव । भवार्णवी नाव उभारिली ।।४।।
श्रवणाचे मिषे बैसावे येऊनी । साम्राज्य भुवनी सुखी नांदे ।।५।।
नामा म्हणे ग्रंथ श्रेष्ठ ज्ञानदेवी । एक तरी ओवी अनुभवावी ।।६।।

(५८)

मनुष्य करिसी तरी भक्तीचेनि मिसे । परि तुझे द्वारी वसे ऐसे करी ।।१।।
श्वान करिसी तरी उच्छिष्टाचेनि मिसे । परि तुझे द्वारी वसे ऐसे करी ।।२।।
पक्षी करिसी तरी चारियाचेनि मिसे । परि तुझे द्वारी वसे ऐसे करी ।।३।।
झाड करिसी तरी तुळसीचेनि मिसे । परि तुझे द्वारी वसे ऐसे करी ।।४ ।।
वृक्ष करिसी तरी मंडप मेखाचेनि मिसे । परि तुझे द्वारी वसे ऐसे करी ।।५ ।।
पाषाण करिसी तरी रंग शिळेचेनि मिसें । परि तुझे द्वारी वसे ऐसे करी ।।६।।
उदक करिसी तरी सडियाचेनि मिसे । परि तुझे द्वारी वसे ऐसे करी ।।७।।
नामा म्हणे विठो कीर्तनाचेनि मिसे । परि तुझे द्वारी वसे ऐसे करी ।।८।।

(५९)

सद्‌गुरुनायके पूर्ण कृपा केली । निजवस्तु दाविली माझी मज ।।१।।
माझे सुख मज दावियेले डोळा । दिधली प्रेमकळा ज्ञानमुद्रा ।।२।।
तया उतराई व्हावे कवण्या गुणे । जन्म नाही येणे ऐसे केले ।।३।।
नामा म्हणे निकी दावियेली सोय । न विसरावे पाय विठोबाचे ।।४।।

(६०)

पंढरी पंढरी । विठुरायाची नगरी ।।ध्रु।।
भोवती भीवरेचा वेढा । मधे पंढरीचा हुडा ।।१।।
गस्त फिरे चहूकोनी । टाळ मृदंगाचा ध्वनी ।
ऐसे तीर्थ आहे कोठे । नामयासी विठ्ठल भेटे ।।२।।

(६१)

वेदासी कानडा श्रृतीसी कानडा । तो असे उघडा पंढरीये ।।१।।
नाम बरवे रुप बरवे । दर्शन बरवे कानडीयाचे ।।२।।
नामा म्हणे तुझे अवघेचि बरवे । त्याहुनि बरवे प्रेम तुझे ।।३।।

(६२)

लटके न बोलू आम्ही लटके न बोलू ।।
अणुमात्र खोटे आम्ही लटके न बोलू ।।ध्रु।।
मुंगी व्याली शिंगी झाली तिचे दुध किती ।।
सत्रा रांजण भरून ठेवले प्याले बारा हत्ती ।।१।।
लटका गेला लटकीपाशी तेथे सुगडी येवढे राळे ।
उंट चिमणी रंगना आली तिचे वाटी येवढे डोळे ।।२।।
शेळी करी घुसळण मांजर काढी लोणी ।
उंदीर गेले देशांतरी त्यांनी ताका भरल्या गोणी ।।३।।





पाण्यात कासव गीत गाये कडेस कोल्हा नाचे ।
सायळ मनी संतोषली खेकड पुस्तक वाचे ।।४।
कांतिणीने मंदिरी लग्न मांडियेले सरड कणीक कांडी ।।
मंदोदरी झाली करवली घुबड माडे रांधी ।५।।
विष्णुदास नामा म्हणे ऐशा जगाच्या कीर्ती ।।
जगासि म्हणिजे लटके पूर्वज नरकी जाती ।।६।।

(६३)

वाऱ्याने दुनिया गेली गड्यांनो । वाऱ्याने दुनिया गेली ।।ध्रु।।
आत वारा बाहेर वारा ।। त्याचा निर्गुणात पसारा ।
त्या वाऱ्याचा शोध करा । गड्यांनो ।।१।।
एका चिंचेला आली दोन बोरे । तेथे मिळाली सांत पांच पोरे ।।
त्या पोरांचे वासरू चुकले मोरे । गड्यांनो ।।२।।
एका पानवट्याचे वाटे । अंबा जांभाची दोन चार बेटे ।।
तेथे डोईवर घागर फुटे । गड्यांनो ।।३।।
एका अंगायाची सात पांच घोडी । हाती बांधी रुइची खोडी ।।
झाडावर झाड तोडी । गड्यांनो ।।४।।
एक मसूर एवढे तळे । त्याच्या मध्ये एक देऊळ ।।
त्यात निर्गुण मासा खेळे । गड्यांनो ।।५।।
एका काट्याच्या अणीवर पाहे । तेथे मिळले सात पांच गांव ।।
नामा म्हणे संगे पाखरू घेऊ । गड्यांनो ।।६।।

(६४)

ती मुंगी उमगा हो, ती मुंगी उमगा । मुंगीच्या मुखी त्रिवेणी गंगा ।।ध्रु।।
उदकाचे टवळे माशाची वाती । अंधारी मुंगीने लावीली ज्योती ।।१।।

अवघे आकाश मुंगी येमागे । मुंगीने संसार सांडिला वेगे ।।२।।
विष्णुदास नामा मुंगी ही मागे । मुंगी ती उमगली खेचर-संगे ।।३।।

(६५)

चंद्रभागे तीरी आयकिली गोष्टी । वाल्मीके शतकोटी ग्रंथ केला ।।१।।
माझिया चित्तासी फार झाले क्लेश । वृथा म्या आयुष्य गमाविले ।।२।।
जाऊनि राऊळा विठोसी विनवीले । वाल्मीकाने केले रामायण ।।३।।
असेन मी खरा तुझा भक्त देवा । सिद्धीस हा न्यावा पण माझा ।।४।।
शतकोटी तुझे करीन अभंग । म्हणे पांडुरंग ऐक नाम्या ।।५।।
तयेवेळी होती आयुष्याची वृद्धि । आताची अवधि थोडी असे ।।६।।
नामा म्हणे जरी न होता संपूर्ण । जिव्हा उतरीन तुज पुढे ।।७।।

(६६)

हिरे जळामधी भिजतील कधी । तैसे कृपानिधी केले आम्हा ।।१।।
आमुचा विकल्प आमुचा विकल्प । आमुचा विकल्प आम्हा नाडी ।।२।।
कामधेनु संगे गाढव बांधिले । तयाचे ते मोले तुके केवि ।।३।।
काय म्या करावे पाठीलागे भोग । नामा म्हणे योग तुझ्या हाती ।।४।।

(६७)

पांडुरंग श्रीरंग भजो रे मना । भजो रे मना बाबा भजो रे मना ।।१।।
अमोलिक जाते वय आता तरी धरी सोय ।
असा काय नरदेह येईल पुन्हा ।।१।।
विषयाचे सुख द्वाड येथे वाटे बहु गोड ।
पुढे आहे अवघड यम यातना ।।२।।
द्रव्यावरी करसी मौजा अंती येईल यमराजा ।





घेऊनी जाईल प्राण तुझा यमसदना ।।३।।
लोहस्तंभी भेटविती तप्त भूमी चालवती ।
तैलपात्री टाकीताती तुझीया प्राणा ।।४।।
नामा म्हणे हेचि करी हरिचरण दृढ धरी ।
चुकेल चौऱ्यांशीची फेरी यम यातना ।।५।।

(६८)

राई येवढे पाखरू त्रिभुवनी त्याचा फेरा रे ।
नर आणि नारी तया पाखराचा चारा रे ।
पिंडामध्ये आहे त्याचा शोध तुझी करा रे ।
मेरूच्या शिखरी त्या पाखराचा थारा रे ।।१।।
येऊनी संसारा याचा अनुभव तुम्ही करा रे ।
चौऱ्यांशी लक्ष योनी चुकेल जन्माचा फेरा रे ।।ध्रु।।
अठ्ठावीस योजने तया पाखराचा फेरा रे ।
बत्तिसा मुखांनी ते बा घेतसे चारा रे ।
अहं सभेमध्ये याचा शोध तुम्ही करा रे ।
अकराही लोचन तया चोची असती फार रे ।।२।।
एकवीस स्वर्गाहुनी तया पाखराची उंची रे ।
सप्तही पाताळाखाली तया पाखराची नीची रे ।
नेत्रातील बाहुली तया पाखराची निची रे ।
उडाले पाखरू सप्तही सागर घेऊन चोची रे ।।३।।
ऐसे ते पाखरू दादा आहे सृष्टीवरी रे ।
मेरू आणि मांदार तया पाखराचे उदरी रे ।
शिवाचे आसन दादा कवणिये परी रे ।

पिंडी आणि ब्रह्मांडी म्हणती दशवे द्वारी रे ।।४।।
ऐसे ते पाखरू गोरक्षराये वळखिले रे ।
पिंडी आणि ब्रह्मांडी मच्छिंद्रनाथे देखियेले रे ।
त्याचीयेनी अंगसंगे सद्गुरूनाथे दाखविले रे ।
त्याचियाचि प्रसादे नामा शिंप्याने गाईले रे ।।५।।

(६९)

नव्हे तेचि कैसे झाले रे खेळिया । नाही तेचि दिसू लागले रे ।
अरूप होते ते रूपासि आले । जीव शिव नाम पावले रे ।।१।।
आपलिच आवडी धरून खेळिया । आपआपणाते व्याले रे ।
जोपनाकारणे केली बायको। तिणे येवढे वाढीवले रे ।।२।।
ऐक खेळिया तुज सांगितले । ऐसे जाणुनि खेळ खेळे रे ।।ध्रु।।
ब्राह्मणाचे पोर एक खेळासि भ्याले । ते बारा वर्षे लपाले रे ।
कापत कापत बाहेर आले । ते नागवेचि पळून गेले रे ।।३।।
साहा तोंड्या एक संभूचे बाळ त्याने । बहुतचि बळ आथियेले रे ।
खेळ खेळता दगदगी व्याले । ते कपाट फोडुनि गेले रे ।।४।।
चहू तोंड्याचा पोर एक नारयाहि जाण । तो खेळियामाजी आगळा रे ।
कुचालि करुनी पोरे भांडवी । आपण राहे वेगळा रे ।।५।।
गंगा गौरी दोघी भांडवी । संभ्यासी धाडिले राना रे ।
खेळ खेळे परि डायी न सापडे । तो एक खेळिया शाहाणा रे ।।६।।
खेळिया माजी हनुम्या शहाणा । न पडे काम व्यसनी रे।
कामचि नाही तेथे क्रोधची कैचा तेथे कैचे भांडण रे ।
रामा गड्याची आवडी मोठी । म्हणूनि लंके पेण रे ।।७।।
यादवांचा पोर एक गोप्या भला । तो बहुतचि खेळ खेळला रे ।





लहान थोर अवघे मारिली । खेळचि मोडूनि गेला रे ।।८।।
ऐसे खेळिये कोट्यानकोटी गणित नाही त्याला रे ।
विष्णुदास नामा म्हणे वडील हो। पहा देही शोधुनी रे ।।९।।

(७०)

पुढे ज्ञानेश्वर जोडोनिया कर । बोलतो उत्तर स्वामिसंगे ।।१।।
पाळिले पोसिले चालविला लळा । बा माझ्या कृपाळा निवृत्तिराजा ।।२।।
स्वामीचिया योगे झालो स्वरूपाकार । उतरलो पार मायानदी ।।३।।
निवृत्तीने हात उतरिला वदना । त्यागिले निधान आम्हालागी ।।४।।
नामा म्हणे देवा देखवेना मज । ब्रह्मी ज्ञानराज मिळविला ।।५।।

## श्रीसंत तुकाराममहाराज कृत अभंग

(७१)

लेकुराचे हित । जाणे माऊलीचे चित्त ।।१।।
ऐसी कळवळ्याची जाती । करी लाभाविण प्रीति ।।२।।
पोटी भार वाहे । त्याचे सर्वस्वही साहे ।।३।।
तुका म्हणे माझे । तुम्हा संतावरी ओझे ।।४।।

(७२)

सदा माझे डोळा जडो तुझी मूर्ति । रखुमाईच्या पति सोयरिया ।।१।।
गोड तुझे रूप गोड तुझे नाम । देई मज प्रेम सर्वकाळ ।।२।।
विठो माउलिये हाचि वर देई । संचरोनि राही हृदयी माझ्या ।।३।।
तुका म्हणे कांही न मागो आणिक । तुझे पायी सुख सर्व आहे ।।४।।

(७३)
मी तव अनाथ अपराधी । कर्महीन मतिमंद बुद्धि।
तुज म्यां आठविले नाही कधी। वाचे कृपानिधि मायबापा ।।१।।
नाहीं ऐकले गाईले गीत । धरिली लाज सांडिले हित ।
नावडे पुराण बैसले संत । केली बहुत परनिंदा ।।२।।
नाही केला करविला परोपकार। नाही दया आली पीडिता पर ।
करूं नये तो केला व्यापार । वाहिला भार कुटुंबाचा ।।३।।
नाही केले तीर्थाचे भ्रमण । पाळिला पिंड कर चरण ।
नाही संतसेवा घडले दान । पूजावलोकन मूर्तीचे ।।४।।
असंगसंग घडले अन्याय । बहुत अधर्म उपाय ।
न कळे हित करावे ते काय । नये बोलू आठवू ते ।।५।।
आप आपण्या घातकर । शत्रू झालो मी दावेदार ।
तू तव कृपेचा सागर । उतरी पार तुका म्हणे ।।६।।

(७४)
चला आळंदीला जाऊ । ज्ञानेश्वर डोळा पाहू ।।१।।
होतील संतांचिया भेटी । सांगु सुखाचिया गोष्टी ।।२।।
ज्ञानेश्वर ज्ञानेश्वर । मुखी म्हणता चुकती फेर ।।३।।
जन्म नाही रे आणिक । तुका म्हणे माझी भाक ।।४।।

(७५)
जयाचिये द्वारी सोन्याचा पिंपळ । अंगी ऐसे बळ रेडा बोले ।।१।।
करील ते काय नोहे महाराज । परि पाहे बीज शुद्ध अंगी ।।२।।
जयाने घातली मुक्तीची गवादी । मेळविली मांदी वैष्णवांची ।।३।।
तुका म्हणे तेथे सुखा काय उणे । राहे समाधाने चित्ताचिया ।।४।।





(७६)
ज्ञानियांचा राजा गुरु महाराव । म्हणती ज्ञानदेव तुम्हा ऐसे ।।१।।
मज पामरा हे काय थोरपण । पायीची वहाण पायी बरी ।।२।।
ब्रह्मादिक जेथे तुम्हा वोळगणे । इतर तुळणे काय पुढे ।।३।
तुका म्हणे युक्तिची ते खोली । म्हणोनि ठेविली पायी डोई ।।४।।

(७७)
ऐक ऐक गा किरीटी । गुज योगाची रहाटी ।।१।।
श्वासोश्वासी प्रणवाभ्यास । तोचि आमुचा संन्यास ।।२।।
तयासीच भगवे साजे । येर मुंड मुंडिले विराजे ।।३।।
मज भीति त्याच्या दंडे । करिल कृतांताची खंडे ।।४।।
तुका म्हणे सद्गुरुसी । ऐसा विरळा संन्यासी ।।५।।

(७८)
तुम्ही संत मायबाप कृपावंत । काय मी पतीत कीर्ति वानू ।।१।।
अवतार तुम्हा धराया कारण । उध्दराया जन जडजीव ।।२।।
वाढविले सुख भक्तिभाव धर्म । कुळाचार नाम विठोबाचे ।।३।।
तुका म्हणे गुण चंदनाचे अंगी । तैसे तुम्ही जगी संतजन ।।४।।

(७९)
हरिदासाचिये घरी । मज उपजवा जन्मांतरी ।।१।।
म्हणसी काही मागा । हेचि देगा पांडुरंगा ।।२।।
संता लोटांगणी । जाता लाज नको मनी ।।३।।
तुका म्हणे अंगी । शक्ती देई नाचे रंगी ।।४।।

(८०)
हरि कथेची आवडी देवा । करीतो सेवा दासाची ।।१।।
म्हणोनि हिंडे मागे मागे । घरटी जागे घालितसे ।।२।।

निर्लज्ज भोजे नाचे रंगी । भरते अंगी प्रेमाचे ।।३।।
तुका म्हणे विकले देवे । आपणा भावे संवसाटी ।।४।।

(८१)
नामाचा बाजार पंढरी । नामाचा बाजार ।।ध्रु।।
नामचि देता नामचि घेता । कोटिकुळे उद्धार ।।१।।
आषाढी कार्तिकी यात्रा भरते । होतो जयजयकार ।।२।।
ठायी ठायी संत मिळुनिया । गाती ब्रह्मचि सार ।।३।।
गोपाळपुरी काला होतो । लाह्यांचा भडिमार ।।४।।
तुका म्हणे संतसज्जनी । नारायण सरदार ।।५।।

(८२)
चाले हे शरीर कोणाचिये सत्ते । कोण बोलविते हरीविण ।।१।।
देखवी ऐकवी एक नारायण । तयाचे भजन चुको नका ।।२।।
माणसाची देव चालवी अहंता । मीचि एक कर्ता म्हणो नये ।।३।।
वृक्षाचेही पान हाले त्याची सत्ता । राहिली अहंता मग कोठे ।।४।।
तुका म्हणे विठो भरला सबाह्य । तया उणे काय चराचरी ।।५।।

(८३)
भक्त ऐसे जाणा जे देही उदास । गेले आशापाश निवारुनि ।।१।।
विषय तो त्यांचा झाला नारायण । नावडे धन जन माता पिता ।।२।।
निर्वाणी गोविंद असे मागेपुढे । काहीच साकडे पडो नेदी ।।३।।
तुका म्हणे सत्य कर्मा व्हावे साह्य । घातलिया भय नरका जाणे ।।४।।

(८४)
माझ्या वडिलांची मिरासी गा देवा । तुझी चरणसेवा पांडुरंगा ।।१।।
उपवास पारणी राखिला दारवंटा । केला भोगवटा आम्हालागी ।।२।।
वंशपरंपरा दास मी अंकित । तुका मोकलिता लाज कोणा ।।३।।





(८५)
मागे बहुता जन्मी । हेचि करित आलो आम्ही ।
भवतापश्रमी । दुःखे पीडिले निववू त्या ।।१।।
गर्जो हरीचे पवाडे । मेळवू वैष्णव बागडे ।
पाझर रोकडे । काढू पाषाणामध्ये ।।ध्रु।।
भावशुद्ध नामावळी । हर्षे नाचो पिटू टाळी ।
घालू पायातळी । कळिकाळ या बळे ।।३।।
कामक्रोध बंदी खाणी । तुका म्हणे दिले दोन्ही ।
इंद्रियांचे धनी । आम्ही झालो गोसावी ।।४।।

(८६)
सोहं तो रे । पंढरीसी कुणीतरी जा रे ।।ध्रु।।
औट हातावरी विठोबा उभा । मध्ये सुनीळाची प्रभा ।
अवघा गगनाचा गाभा । ज्याचा तो रे ।।१।।
विठोबा उभा ना बैसला । चोहीकडे कोंदाटला ।
अवघा घनानंद भरला । ज्याचा तो रे ।।२।।
घेऊनी सद्गुरुंची चिठ्ठी । तुजला दाविती हातवटी ।
उघडुनि चैतन्याची ताटी । तुरीया पहा रे ।।३।।
दुर्बुध्दी ती दूर करा । सोडूनी अविद्येचा थारा ।
तुका म्हणे देह तंबोरा । हाती घ्या रे ।। ४।।

(८७)
जावोनिया तीर्था तुवा काय केले । चर्म प्रक्षाळिले वरीवरी ।।१।।
अंतरीचे शुध्द कासयाने केले । भूषण मानिले आपण या ।।२।।
कडू वृंदावन घोळिले साखरा । भीतरील थारा मोडेचि ना ।।३।।
तुका म्हणे नाही शांती क्षमा दया । तोवरी कासया फुंदा तुम्ही ।।४।।

(८८)

नाम घेता वाया गेला । ऐसा कोणी आयकीला ।।१।।
सांगा विनवितो तुम्हासी । संत महंत सिध्द ऋषी ।।२।।
नामे तरला नाही कोण । ऐसा द्यावा निवडोन ।।३।।
सलगीच्या उत्तरा । तुका म्हणे क्षमा करा ।।४।।

(८९)

त्याग तरी ऐसा करा । अहंकारा दवडावे ।।१।।
मग तू जैसा तैसा राहे । काय पाहे उरले ते ।।२।।
अंतरीचे विषम गाढे । येऊ पुढे नेदावे ।।३।।
तुका म्हणे शुध्द मन । समाधान पाहिजे ।।४।।

(९०)

या या संसाराचे पायी । राम आठवित नाही ।।१।।
या या संसाराचे कोडे । जे जे आणावे ते थोडे ।।२।।
पायी प्रपंचाची बेडी । किती करावी लबाडी ।।३।।
तुका म्हणे आम्ही चुकलो । व्यर्थ संसारी गुंतलो ।।४।।

(९१)

ज्ञान म्हणजे काय आपणा जाणणे । जाणोनी नेणणे विज्ञान ते ।।१।।
भक्ति म्हणजे काय जनी जनार्दन । अलंकार सोने अभिन्नत्त्वे ।।२।।
सर्वाभूती देव आपणासगट । भजावे निकट भक्ति ऐसी ।।३।।
विरक्ति ते जाणा विषयांचा त्याग । इहामुत्र फलभोग नैराश्यता ।।४।।
भूतदया जनी अहिंसा करून । परदु:खे प्राण सांडू पाहे ।।५।।
एक पूजा करी, दुजा तोंडावरी । मारिता अंतरी क्रोधा नये ।।६।।
शांतीचे हे रूप बोलिल्या प्रकार । या गुणे निर्धार म्हणो ज्ञानी ।।७।।
इये गुणी युक्त धन्य तोचि ज्ञानी । तयाचे चरणी लोळे तुका ।।८।।





(९२)

राम म्हणता रामचि होइजे । पदी बैसोन पदवी घेइजे ।।१।।
ऐसे सुख वचनी आहे । विश्वासे अनुभव पाहे ।।२।।
रामरसाचिया चवी । आन रस रुचती केवी ।।३।।
तुका म्हणे चाखोनि सांगे । मज अनुभव आहे अंगे ।।४।।

(९३)

केला मातीचा पशुपती । परी माती नोहे पशुपती ।
शीवाची पूजा शीवासी पावे । माती माती माजी सामावे ।।१।।
केला पाषाणाचा विष्णु । परी पाषाण नोहे विष्णु ।
विष्णुचि पूजा विष्णुसी अर्पे । पाषाण राहे पाषाण रुपे ।।२।।
केली काशाची जगदंबा । परी कासे नोहे अंबा ।
अंबेची पूजा अंबेने घेणे । कासे राहे कासे पणे ।।३।।
तैसे आम्हा पूजिती संत । पूजा घेतो भगवंत ।
आम्ही किंकर संतांचे दास । संत पदवी नको आम्हास ।।४।।
ब्रह्मानंद पूर्णामाजी । तुका म्हणे केली काजी ।
ज्याची पूजा त्याने घेणे । आम्ही पाषाणरुपे रहाणे ।।५।।

(९४)

कलीमाजी संत झाले ते अनंत । त्यात दांडाईत पाचजण ।।१।।
रेडा बोलविला धोंडा दुध प्याला । मरोनीया झाला पुष्पेतुळसी ।।२।।
स्वर्गीचे पीतर जेवविले जेणे । जगात भूषण मिरविले ।।३।।
पाचवा तो तुका तयांचे पंगती । संतांचे संगती श्लाघ्य झाला ।।४।।

(९५)

हुरमुंजी रंगाचा उंच मोतीदाणा । रामदासी बाणा या रंगाचा ।।१।।
पीतवर्ण कांती तेज अघटीत । आवाळू शोभत भृकुटीमाजी ।।२।।

कौपीन परिधान मेखळा खांद्यावरी । कुबडी शोभे करी समर्थांच्या ।।३।।
काष्ठाच्या पादुका स्वामींच्या पायात । स्मरणी हातात तुळशीची ।।४।।
कृष्णा तटाकासी जहाले दर्शन । वंदिले चरण तुका म्हणे ।।५।।

(९६)

नव्हे आधीचे मधीचे । आम्ही देवाच्या आधीचे ।।१।।
जेव्हा नव्हते पवनपाणी । तेव्हा आम्ही निरंजनी ।।२।।
जेव्हा नव्हते चराचर । तेव्हा आम्ही शुन्याकार ।।३।।
जे जे झाले अवतार । तुका तया बरोबर ।।४।।

(९७)

आम्ही नामाचे धारक । नेणो प्रकार आणिक ।
सर्व भावे एक । विठ्ठलचि प्रमाण ।।१ ।।
नलगे जाणावे नेणावे । गावे आनंदे नाचावे ।
प्रेमसुख घ्यावे । वैष्णवांचे संगती ।।२ ।।
भावबळे घालू कांस । लज्जा चिंता दवडू आस ।
पायी निजध्यास । म्हणवू दास विष्णूचे ।।३ ।।
भय नाही जन्म घेता । मोक्षसुखा हाणो लाता ।
तुका म्हणे सत्ता । करू निकट सेवेची ।।४ ।।

(९८)

संतकृपा झाली । इमारत फळा आली ।।ध्रु ।।
ज्ञानदेवे रचियला पाया । उभारिले देवालया ।।१ ।।
नामा तयाचा किंकर । त्याने केला हा विस्तार ।।२।।
जनार्दनाचा एकनाथ । ध्वजा लाविली भागवत ।।३।।
भजन करा सावकाश । तुका झालासे कळस ।।४।।





(९९)

पिकलिया सेंद कडुपण गेले । तैसे आम्हा केले पांडुरंगे ।।१।।
काम क्रोध लोभ निमाले ठायीचि । सर्व आनंदाची सृष्टि झाली ।।२।।
आठव-नाठव गेले भावाभाव । झाला स्वयमेव पांडुरंग ।।३।।
तुका म्हणे भाग्य या नावे म्हणीजे । संसारी जन्मीजे याचि लागी ।।४।।

(१००)

मन करारे प्रसन्न । सर्व सिध्दींचे कारण ।।१ ।।
मोक्ष अथवा बंधन । सुख समाधान इच्छा ते ।।ध्रु।।
मने प्रतिमा स्थापिली । मने मन पूजा केली ।
मने इच्छा पुरविली । मने माऊली सकळांची ।।२।।
मन गुरु आणि शिष्य । करी आपुलेचि दास्य ।
प्रसन्न आपआपणास । गति अथवा अधोगति ।।३।।
साधक वाचक पंडित । श्रोते वक्ते ऐका मात ।
नाही नाही आन दैवत । तुका म्हणे दुसरे ।।४।।

(१०१)

कथा त्रिवेणी संगम । देव भक्त आणि नाम ।
तेथीचे उत्तम । चरणरज वंदिता ।।१ ।।
जळती दोषांचे डोंगर । शुद्ध होती नारी नर ।
गाती ऐकती सादर । जे पवित्र हरिकथा ।।२ ।।
तीर्थे तया ठाया । येती पुनीत व्हावया ।
पर्वकाळ पाया । तळी वसे वैष्णवा ।।३ ।।
अनुपम्य हा महिमा । नाही द्यावया उपमा ।
तुका म्हणे ब्रह्मा । नेणे वर्णू या सुखा ।।४ ।।

(१०२)

शांति परते नाही सुख । येर अवघेचि दु:ख ।।१।।
म्हणऊनी शांति धरा । उतराल पैलतीरा ।।२।।
खवळलिया कामक्रोधी । अंगी भरती आधिव्याधी ।।३।।
तुका म्हणे त्रिविध ताप । जाती मग आपेआप ।।४।।

(१०३)

कीर्तन चांग कीर्तन चांग । होय अंग हरिरुप ।।१।।
प्रेमे छंदे नाचे डोले । हारपले देहभाव ।।२।।
एकदेशी जीवकळा । हा सकळा सोयरा ।।३।।
तुका म्हणे उरला देव । गेला भेव त्या काळे ।।४।।

(१०४)

काळ सारावा चिंतने । एकांतवासी गंगास्नाने ।
करोनी पूजने । प्रदक्षिणा तुळशीच्या ।।१।।
युक्त आहार विहार । नेम इंद्रियासी सार ।
नसावी बासर । निद्रा बहु भाषण ।।२।।
परमार्थ महाधन । जोडी देवाचे चरण ।
व्हावया जतन । हे उपाय लाभाचे ।।३।।
देह समर्पिजे देवा । भार काहीच न घ्यावा ।
होईल आघवा । तुका म्हणे आनंद ।।४।।

(१०५)

लहानपण देगा देवा । मुंगी साखरेचा रवा ।।१।।
ऐरावत रत्न थोर । त्यासी अंकुशाचा मार ।।२।।
जया अंगी मोठेपण । तया यातना कठीण ।।३।।
तुका म्हणे जाण । व्हावे लहानाहुनि लहान ।।४।।





(१०६)

साठविला हरि । जेणे हृदय मंदिरी ।।ध्रु।।
त्याची सरली येरझार । झाला सुफल व्यापार ।।२।।
हरि आला हाता । मग कैची भय चिंता ।।३।।
तुका म्हणे हरि । काही उरो नेदी ऊरी ।।४।।

(१०७)

पाहुणे घरासी । आजी आले ऋषीकेशी ।।१।।
काय करु उपचार । कोप मोडकी जर्जर ।।२।।
कण्या दरदर । रांधीयेल्या त्या सत्वर ।।३।।
मोडकीया बाजा । वरी वाकळाच्या शेजा ।।४।।
मुखशुध्दी तुळशीदळ । तुका म्हणे मी दुर्बळ ।।५।।

(१०८)

लोडीस्ते बलीस्ते पलंग सुपती । परी नाही लंगोटी नेसावया ।।१।।
रिध्दीसिध्दी दासी राबताती घरी । परी नाही भाकरी भक्षावया ।।२।।
पुसाल तरी आम्हा वैकुंठीचा वास । नाही रहायास स्थळ कोठे ।।३।।
तुका म्हणे आम्ही वैकुंठीचे राजे । परी नाही कोणाचे उणेपुरे ।।४।।

(१०९)

भक्ति ते नमन वैराग्य तो त्याग । ब्रह्मी ब्रह्मभोग ब्रह्मतनु ।।१।।
देहाच्या निरसने पाविजे या ठाया । माझी ऐसी काया जव नव्हे ।।२।।
उदक अग्नि धान्य झाल्या घडे पाक । एकाविण एक कामा न ये ।।३।।
तुका म्हणे मज कळते चाचणी । बडबडीची वाणी अथवा सत्य ।।४।।

(११०)

लटिके हासे लटिके रडे । लटिके उडे लटिक्यापे ।।१।।
लटिके माझे लटिके तुझे । लटिके ओझे लटिक्याचे ।।२।।

लटिके गाय लटिके ध्याय । लटिके जाय लटिक्यापे ।।३।।
लटिका भोगी लटिका त्यागी । लटिका जोगी जगमाया ।।४।।
लटिका तुका लटिक्या भावे । लटिके बोले लटिक्यासवे ।।५।।

(१११)

कां रे पुंड्या मातलासी । उभे केले विठ्ठलासी ।।१।।
ऐसा कैसा रे तू धीट । मागे भिरकाविली वीट ।।२।।
युगे झाली अठ्ठावीस । अजुनि का न म्हणसी बैस ।।३।।
भाव देखोनि निकट । देवे सोडिले वैकुंठ ।।४।।
तुका म्हणे पुंडलीका । तूचि भक्त बळिया निका ।।५।।

(११२)

पहा ते पांडव अखंड वनवासी । परी त्या देवासी आठविती ।।१।।
प्रल्हादासी पिता करीतो जाचणी । परी तो स्मरे मनी नारायण ।।२।।
सुदामा ब्राह्मण दरिद्रे पीडिला । नाही विसरला पांडुरंगा ।।३।।
तुका म्हणे तुझा न पडावा विसर । दु:खाचे डोंगर झाले तरी ।।४।।

(११३)

पंढरीचे भूत मोठे । आल्या गेल्या झडपी वाटे ।।१।।
बहु खेचरीचे रान । जाता वेडे होय मन ।।२।।
तेथे जाऊ नका कोणी । गेले नाही आले परतोनि ।।३।।
तुका पंढरीसी गेला । पुन्हा जन्मा नाही आला ।।४।।

(११४)

पाहे प्रसादाची वाट ।। द्यावे धुवोनिया ताट ।।१।।
शेष घेऊनी जाईन ।। तुमचे झालिया भोजन ।।२।।
झालो एकसवा । तुम्हा आडुनिया देवा ।।३।।
तुका म्हणे चित्त । करुनी राहिलो निश्चिंत ।।४।।





(११५)

निरंजन वनी देखियेली गाय । तिला तीन पाय चारी मुखे ।।१।।
सहस्त्र तिला शिरे नऊ तिला कान । सत्रावीचे स्तन शृंग एक ।।२।।
ऐशी कामधेनु व्यासांनी पाळिली । शुकांनी ओळिली जनका घरी ।।३।।
तुका म्हणे गाय भाग्य नरा भेटे । अभागी करंटे वाया गेले ।।४।।

(११६)

श्वासोश्वासी निमिषोन्मेषी । वारी केली पंढरीसी ।।१।।
प्रत्यग्वृत्ती येरझारी । तुझ्या दर्शनासी हरी ।।२।।
प्रेम अंगी स्वेद कंप । तेचि घेउनी पताक ।।३।।
गेलो राउळाभीतरी । सहस्त्रदळाचे माझारी ।।४।।
संती दाविला मारग । अखंडित राजयोग ।।५।।
रंगशिळे उभा ठेलो । तुका म्हणे धन्य झालो ।।६।।

(११७)

गणराया लवकर येई । भेटी सकळांसी देई ।।ध्रु।।
अंगी शेंदुराची उटी । केशर कस्तुरी लल्लाटी ।।१।।
पायी घागऱ्या वाजती । नाचत आले गणपती ।।२।।
तुका म्हणे पाही । विठ्ठल गणपती दुजा नाही ।।३।।

(११८)

पुरे पुरे हा संसार । नित्य हाणितो पैजार ।।१।।
झाली माकडाची परी । येतो तळी जातो वरी ।।२।।
संसाराचा महिमा फार । हारपले थोर थोर ।।३।।
ऐसा संत तुकयावाणी । दिले संसारासी पाणी ।।४।।

(११९)
आम्ही निर्गुण पुरिचे वाणी । आमचा जिन्नस घ्यारे कोणी ।।१।।
शेर अच्छेर पावशेर घडा । जेवढा पाहिजे तेवढा ओढा ।।२।।
भरा गोण्या बांधा मोटा । आमच्या जिन्नसा नाही तोटा ।।३।।
तुका म्हणे आम्ही वाणी । पाल दिला निरंजनी ।।४।।

(१२०)
तिळाएवढे बांधुनि घर । आंत राहे विश्वंभर ।।१।।
तिळाइतुके बिंदुले । तेणे त्रिभुवन कोंदाटले ।।२।।
हरिहराचिया मूर्ति । बिंदुल्यात येती जाती ।।३।।
तुका म्हणे हे बिंदुले । तेणे त्रिभुवन कोंदाटले ।।४।।

(१२१)
आधार चक्र स्थानी राहतो गणपती । चतुर्दल आहेति तया लागी ।।१।।
मातृकाही चार यया लागी असती । दुसऱ्याची गती नसे तेथे ।।२।।
मुख्य अधिपत्य मेरूचे ते मूळ । निर्गुणाचे फळ जाणतसे ।।३।।
तुका म्हणे आहे थोडकीच कळा । जाणतो वेगळा योगीराज ।।४।।

(१२२)
घालुनी आसन करी एकाग्र मन ।। मेरु-दंड जाण उभा राहे ।।१।।
भृकुटीपासोनी अंगुळ्या त्या चार ।। दृष्टी करी स्थिर तया ठायी ।।२।।
प्रथम चांदणे प्रकाश होईल । तेज ते दाटेल न वर्णवे ।।३।।
तया तेजामाजी देहभाव राहे । निर्विकल्प पाहे समाधी ही ।।४।।
तुका म्हणे ज्याचे पूर्वपुण्य शुद्ध । तयासीच बोध होईल बापा ।।५।।

(१२३)
सोहं स्वरुप तेची जाण । नकळे सद्गुरुवाचून ।।१।।
नामी रुप तेची बिंबले । सर्ववृत्ती मौनाविले ।।२।।





गुण निर्गुण आटले । सोहं स्वरुप ते मिळाले ।।३।।
तुका म्हणे कैसे करु । सोहंस्वरुपात शिरू ।।४।।

(१२४)
षट्चक्रावरी त्रिकुटा अंतरी । त्रिवेणी सुंदरी गंगा वाहे ।।१।।
तेथे स्नान संत करिताती नित्य ।। रज तम द्वैत संहारोनी ।।२।।
त्रिवेणी संगमी अनुहात ध्वनी । आहे निशिदिनी वाद्य गजरे ।।३।।
ते लक्ष्य भेदुनी वरी जो जाणे अंगा । तुका पांडुरंगा भेटी तेथे ।।४।।

(१२५)
पहा आपुले शरीरी । दशमव्दार हे पंढरी ।।१।।
सोऽहं ब्रह्म विटेवरी । बरवे शोधावे अंतरी ।।२।।
भाव धरा तयापाशी । रिद्धि सिद्धि होती दासी ।।३।।
संतसिद्धि देती ग्वाही । तुका विश्वासला पायी ।।४।।

(१२६)
लटिके ते साच दाविले अचळ । पीडितसे काळ किती म्हणू ।।१।।
सत्य तू सत्य तू सत्य तू विठ्ठला । कां गा हा दाविला जगदाकार ।।२।।
सांभाळी सांभाळी आपुली हे माया । आम्हासी भयभीत कां केले ।।३।।
रुप नाही त्यासी ठेवियले नाम । लटिकाची भ्रम वाढविला ।।४।।
तुका म्हणे का गा झालासी चतुर । होतासी निसुर निर्विकार ।।५।।

(१२७)
तो हा पक्षी शुद्ध सात्विक । त्याचे नीळे दोन्ही पंख ।।१।।
तोचि पक्षी हृदयी डोले । सोहं सोहं ऐसे बोले ।।२।।
त्याचा अणूएवढा डोळा । करी ब्रह्मांडाचा गोळा ।।३।।
ऐसे अनंत गोळे गिळी । तोची पक्षी तुकडयाजवळी ।।४।।

(१२८)
नव्हे जाखाई जोखाई । मायराणी मेसाबाई ।।१।।
बळिया माझा पंढरीराव । जो ह्या देवांचाही देव ।।ध्रु।।
रंडी चंडी शक्ति । मद्यमांस भक्षिती ।।३।।
बहिरव खंडेराव । रोटी सुटीसाठी देव ।।४।।
गणोबा विक्राळ । लाडुमोदकांचा काळ ।।५ ।।
मुंजा म्हैसासुरे । हे तो कोण लेखी पोरे ।।६।।
वेताळे फेताळे । जळो त्यांचे तोंड काळे ।।७।।
तुका म्हणे चित्ती । धरा रखुमाईचा पती ।।८।।

(१२९)
कथेची सामग्री । देह अवसानावरी ।।१।।
नको जाऊ देऊ भंगा । गात्रे माझी पांडुरंगा ।।ध्रु।।
आयुष्य करी उणे । परि मज आवडो कीर्तन ।।३।।
तुका म्हणे हानी । या वेगळी मना नाणी ।।४।।

(१३०)
अंतरीची ज्योती प्रकाशली दीप्ती । मुळीची जे होती आच्छादिली ।।१।।
तेथीचा आनंद ब्रह्मांडी न समाये । उपमेशी काय देऊ सुखा ।।ध्रु।।
भावाचे मथिले निर्गुण संचले । ते हे उभे केले विटेवरी ।।३।।
तुका म्हणे आम्हा ब्रह्मांड पंढरी । प्रेमाची जे थोरी साठवण ।।४।।

(१३१)
प्रारब्धेचि जोडे धन । प्रारब्धेचि वाढे मान ।।१।।
सोस करिसी वाया । भजे मना पंढरीराया ।।ध्रु।।
प्रारब्धेचि होय सुख । प्रारब्धेचि पावे दुःख ।।२।।
प्रारब्धेचि भरे पोट । तुका करी ना बोभाट ।।३।।





(१३२)
सुख वाटे येचि ठायी । बहु पायी संतांचे ।।१।।
म्हणऊनि केला वास । नाही नाश ये ठायी ।।ध्रु।।
न करावे हाली चाली । निवारली चिंता हे ।।३।।
तुका म्हणे निवे तनु । रजकणु लागता ।।४।।

(१३३)
आलिया संसारा उठा वेग करा । शरण जा उदारा पांडुरंगा ।।ध्रु।।
देह हे काळाचे धन कुबेराचे । तेथे मनुष्याचे काय आहे ।।२।।
देता देवविता नेता नेवविता । येथे याची सत्ता काय आहे ।।३।।
निमित्याचा धनी केला असे प्राणी । तुका म्हणे म्हणोनि व्यर्थ गेला ।।४।।

## श्रीसंत सेनामहाराज कृत अभंग

(१३४)
नामाचे चिंतन श्रेष्ठ पै साधन । जातील जळोनी महापापे ।।१।।
न लागे धूम्रपान पंचाग्निसाधन । करिता चिंतन हरी भेटे ।।२।।
बैसुनि निवांत करा एकचित्त । आवडी गावे गीत विठोबाचे ।।३।।
सकळाहुनि सोपे हेची पै साधन । सेना म्हणे आण विठोबाची ।।४।।

(१३५)
ज्ञानदेव गुरू ज्ञानदेव तारू । उतरील पैलपारू ज्ञानदेव।।१।।
ज्ञानदेव माता ज्ञानदेव पिता । तोडील भवव्यथा ज्ञानदेव ।।२।।
ज्ञानदेव माझे सगे सोयरे । जिवलग निर्धारि ज्ञानदेव ।।३।।
सेना म्हणे माझा ज्ञानदेव निधान । दाविली निजखूण ज्ञानदेव।।४।।

(१३६)

श्रीज्ञानराजे केला उपकार । मार्ग हा निर्धार दाखविला ।।१।।
विटेवरी उभा वैकुंठनायक । आणि पुंडलिक चंद्रभागा ।।२।।
अविनाश पंढरी भूमीवरी पेठ । प्रत्यक्ष वैकुंठ दाखविले ।।३।।
सेना म्हणे चला जाऊ तया ठाया । पांडुरंग सखया भेटावया ।।४।।

## श्रीसंत चांगदेवमहाराज कृत अभंग

(१३७)

मोतीयांचे पाणी रांजण भरला । पिऊनिया धाला ज्ञानदेव ।।१ ।।
अभ्राची साउली घेउनिया हाती । निघे तो एकांती निवृत्तिदेव ।।२ ।।
पुष्पांचा परिमळ वेगळा काढिला । हार तो लेइला सोपानदेव ।।३ ।।
हिऱ्यांचिया घुगऱ्या जेवण जेवली । जेऊनिया धाली मुक्ताबाई ।।४ ।।
अवघ्याचे वर्म आले असे हाता । चांगदेव स्वता तये ठायी ।।५ ।।

## श्रीसंत कबीर साहेब कृत अभंग

(१३८)

देख खुल गई गुरुकी किल्ली ।। लुंगरा क्या देखे बिजली ।।ध्रु ।।
अकारसे उकार हुवा उकारसे मकारा ।।
उन्मनी मुद्रा देख त्रिकूटपर वोहि भरा जग सारा ।।१ ।।
काला पीला लाल सफेता रंग सुरंगा गहिरा ।।
वोही रंगका रंग समजले ओंकारसे न्यारा ।।२ ।।
देखरेख तो सबही डुब गये अब नही देख न आवे ।।
कहत कबीरा सुन भाई साधू रामानंद गुन गावे ।।३ ।।





(१३९)

करो प्रभूजीकी बात सबदिन ।। ध्रु ।।
धन दौलत और महल खजिना । उसपर मारो लाथ ।।१।।
बाप भाई और जोरु बेटे । कोई न आवे साथ ।।२।।
कहत कबीरा सुन भाई साधु । भजन करो दिनरात ।।३।।

(१४०)

घुंगट का पट खोल । रे तुज राम मिलेगा ।।ध्रु।।
घटघट बीचमें राम रमय्या । झुटा पंचरंग खोल ।।१।।
शुन्य मेहेलमे दीप बिराजे । बाजे अनुहात ढोल ।।२।।
कहत कबीरा सुनभाई साधु । रामनाम भरतोल ।।३।।

(१४१)

बंगला खुप बनाया बे । अंदर नारायण सोया बे ।।ध्रु।।
पंचतत्वकी भीत बनाई तीन गुनका गारा ।
रोम रोमकी छान चलाई चेतन करले हारा ।।१।।
इस बंगलेकु नव दरवाजे बीच पवनका खंबा ।
आवत जावत कोई न देखे ओही बडा आचंबा ।।२।।
पाच पचिसा पात्रताचे मनवा ताल बजावे ।
सुरत मुरतका मृदंग बजाये राग छत्तीसा गावे ।।३।।
अपरंपार भरा है यारो सद्‌गुरु भेद बनाया ।
कहत कबीरा सुन भाई साधु उने पाया उने छुपाया ।।४।।

(१४२)

नौकरी शर्यतसे करना । हुकुम पीर मुरशदका रखना ।।ध्रु।।
मन घोडेकु मार चाबुका । विवेक लगाम लेना ।

क्षेम प्रेमसे रहेना बेटा । सोहं गड लेना ।।१।।
कुचदर कुच मुकाम करके । संगम पूजा करना ।
आखिलगी कर मार निशानी । पिछे मत हटना ।।२।।
शिडी पकडकर चढना बेटा । धिरेसे गड लेना ।
अंदरका पट खोलनवाला । धिरेसे चढना ।।३।।
हजरदल्लकी हवा देखले । अमर कुंडमो नाहना ।
भयवी पट बांधु निशानी । पिछे मत हटना ।।४।।
कहत कबीरा सुनो भाई साधु । बार बार नहि आना ।
सोही गुरुका पुरा होगया । ओही बात पछाना ।।५।।

(१४३)

रामनाम तू भजले प्यारे । कायकूं मगरुरि करता है ।
कचे मटीका बंगला तेरा । पाव पलकमो जलता है ।।ध्रु।।
बम्मन होकर पुरान बांचे । स्नानतर्पन करता है ।
सर्वकाल सुचिल रहता है । यौ क्या साहेब मिलता है ।।१।।
जोगी होकर जटा बढावे । हालमस्तमें रहता है ।
दोनो हात शिरपर धरता । यौ क्या साहेब मिलता है ।।२।।
पेहरन भाव होकर काले कपडे पेने । दाढी मुछी मुंडता है ।
उलटी लकडी हाथ पकडकर । यौ क्या साहेब मिलता है ।।३।।
मुलना होकर बांग पुकारे । यौ क्या साहेब बहिरा है ।
मुंगी के पावमें घुंगुर बाजे । वोभि अल्ला सुनता है ।।४।।
जंगम होकर लिंग बंधावे । घरघर लेकर फिरता है ।
शंख बजाकर भिक्षा मांगे । यौ क्या साहेब मिलता है ।।५।।
कहत कबीरा सुन भाई साधु । मनकी माला जपता है ।
जो भावभगतसे ध्यान धरता है । उनकू साहेब मिलता है ।।६।।





## श्रीसंत कमाल साहेब कृत अभंग

(१४४)

हम तो बेपरवा, बेपरवा । नही किसीके डरवा ।।ध्रु।।
चार खूट जहागीर हमारी, तीन लोकमे बाच्छा ।
जनमका तो सफा भया है, गुरूने किया अच्छा ।।१।।
जागृती स्वप्न सुषुप्ती देखे, तुर्या उन्मनि बाला ।।
आलख मोती निर्गुन जोती, नजर पडा उजियाला ।।२।।
प्याला पीया मस्त बनाया, पंथ दिखाया सीधा ।
सहज समाधी अजब बतावे, साधत साधत साधा ।।३।।
मुराद मेरा हासल हुवा, दिया खुषामत फासा ।
बेपरवा कर रखे गुरुने, आपन आपे खासा ।।४।।
कमाल कीया पुरी कमाई, अनुहत बाजत बाजा ।
सुनो कानसे देख लिया है, अलख निरंजन राजा ।।५।।

## श्रीसंत जनाबाई कृत अभंग

(१४५)

सदाशिवाचा अवतार । स्वामी निवृत्ति दातार ।।१।।
महाविष्णुचा अवतार । सखा माझा ज्ञानेश्वर ।।२।।
ब्रह्मा सोपान तो झाला । भक्ता आनंद वर्तला ।।३।।
आदिशक्ती मुक्ताबाई । दासी जनी लागे पायी।।४।।

(१४६)

एकचि टाळी झाली चंद्रभागे वाळवंटी ।
माझा ज्ञानराज गोपाळासी लाह्या वाटी ।।१।।

नामदेव कीर्तन करी  पुढे नाचे पांडुरंग ।
जनी म्हणे बोला  ज्ञानदेवा अभंग ।।२।।
अभंग बोलता रंग कीर्तनी भरिला ।।
प्रेमाचेनि छंदे देव नाचू लागला ।।३।।
नाचता नाचता देवाचा गळला पितांबर ।
सावध होई देवा ऐसे बोले कबीर ।।४।।
साधु या संतांनी देव धरीला मनगटी ।।
काय झाले म्हणुनी दचकले जगजेठी ।।५।।
ऐसा कीर्तन महिमा सकळामाजी वरिष्ठ ।
जडमूढ भाविका सोपी केली पायवाट ।।६।।
नामयाची जनी लोळे संतांच्या पायी ।
प्रेम असो द्या हृदयी म्हणूनी ठेवितसे डोई ।।७।।

(१४७)

विठो माझा लेकुरवाळा । संगे लेकुरांचा मेळा ।।१।।
निवृत्ति हा खांद्यावरी । सोपानाचा हात धरी ।।२।।
पुढे चाले ज्ञानेश्वर । मागे मुक्ताई सुंदर ।।३।।
गोरा कुंभार मांडीवरी । चोखा जीवा बरोबरी ।।४।।
बंका कडियेवरी । नामा करांगुळी धरी ।।५।।
जनी म्हणे गोपाळा ।  करी भक्तांचा सोहळा ।।६।।

(१४८)

धरिला पंढरीचा चोर ।  गळा बांधोनिया दोर ।।१।।
हृदय बंदिखाना केला ।  आत विठ्ठल कोंडिला ।।२।।
शब्दे केली जडाजुडी ।  विठ्ठल पायी घातली बेडी ।।३।।
सोहं शब्दे मारा केला । विठ्ठल काकुलती आला ।।४।।
जनी म्हणे बा विठ्ठला । जीवे न सोडी मी तुला ।।५।।





(१४९)

सुंदर माझे जाते गे फिरते बहुत ।
ओव्या गाऊ कौतुके तू ये रे बा विठ्ठला ।।१।।
जीवशिव दोनी खुंटे गे प्रपंचाचे नेटे गे ।
लावुन पांची बोटे गे तू ये रे बा विठ्ठला ।।२।।
सासु आणि सासरा दीर तो तिसरा ।
ओव्या गाऊ भ्रतारा तू ये रे बा विठ्ठला ।।३।।
बारा सोळा गडणी अवघ्या कामिनी ।
ओव्या गाऊ बसूनि तू ये रे बा विठ्ठला ।।४।।
प्रपंच दळण दळिले पीठ भरिले ।
सासुपुढे ठेविले तू ये रे बा विठ्ठला ।।५।।
सत्वाचे आधण ठेविले पुण्य वैरिले ।
पाप ते उतू तू ये रे बा विठ्ठला ।।६।।
जनी जाते गाईल कीर्त राहिल ।
थोडासा लाभ होईल तू ये रे बा विठ्ठला ।।७।।

(१५०)

एकलीच गाणे गाता । दूजा साद उमटता ।।१।।
कोण गे तुझे बरोबरी ।  गाणे गातसे निर्धारी ।।२।।
खूण कळली नामदेवा ।  विठ्ठल  पुरता जनीच्या भावा ।।३।।

(१५१)

रक्तवर्ण त्रिकुट स्नान । श्रीहाट पाहे श्वेत वर्ण ।।१।।
श्यामवर्ण ते गोलाट । निळबिंदु औट पीठ ।।२।।
वरि भ्रमरगुंफा पाहे । दशमद्वारी गुरु आहे ।।३।।
नवद्वाराते भेदुनी । दशमद्वारी दासी जनी ।।४।।

(१५२)

ऐसा कोण आहे खासा । पदी बसवी आपुल्या दासा ।। १ ।।
ऐसा कोण आहे सरदार । छाया करी भक्तावर ।। २ ।।
ऐसा कोण आहे धनी । दासी जनीची घाली वेणी ।। ३ ।।

(१५३)

अरे विठ्या अरे विठ्या । मूळ मायेच्या कारट्या ।।१।।
तुझी रांड रंडकी झाली । जन्मसावित्री चुडा ल्याली ।।२।।
विठ्या तुझे गेले मढे । तुला पाहून काळ रडे ।।३।।
उभी राहूनि आंगणी । शिव्या देत दासी जनी ।।४।।

(१५४)

येग येग विठाबाई । माझे पंढरीचे आई ।।१।।
भीमा आणि चंद्रभागा । तुझे चरणीच्या गंगा ।।२।।
इतुक्यासहित त्वा बा यावे । माझे रंगणी नाचावे ।।३।।
माझा रंग तुझीया गुणी । म्हणे नामयाची जनी ।।४।।

(१५५)

जनी बैसली न्हायाला । पाणी घाले विसणाला ।।१।।
घागर घेउनी पाण्या गेली । मागे मागे धांव घाली ।।२।।
घागर घेऊनिया हाती । पाणी रांजणात ओती ।।३।।
ऐशा येरझारा केल्या । रांजण घागरी भरिल्या ।।४।।
पाणी पुरे पांडुरंगा । दासी जनीच्या अंतरंगा ।।५।।





(१५६)

ज्ञानाचा सागर । सखा माझा ज्ञानेश्वर ।।१।।
मरोनिया जावे । बा माझ्याच्या पोटा यावे ।।२।।
ऐसे करी माझ्या भावा । सख्या माझ्या ज्ञानदेवा ।।३।।
जावे वोवाळुनी । जन्मोजन्मी दासी जनी ।।४।।

(१५७)

सण दिवाळीचा आला । नामा राउळासी गेला ।।१।।
हाती धरूनी देवासी । चला आमुच्या घरासी ।।२।।
देव तेथुनी चालिले । नामयाच्या घरा आले ।।३।।
गोणाईने उटणे केले । दामाशेटीने स्नान केले ।।४।।
पदर काढिला माथ्याचा । बाळ पुशिला नंदाचा ।।५।।
हाती घेउनी आरती । चक्रपाणी ओवाळती ।।६।।
जेऊनिया तृप्त झाले । दासी जनीने विडे दिले ।।७।।

(१५८)

नवल वर्तले नवल वर्तले नवल गुरुचे पायी।
कापुर जळूनि गेला तेथे काजळी उरली नाही ।।१।।
साखर पेरूनी ऊस काढिला कान झाला डोळा ।
निबर बायको भ्रतार तान्हा सासरा तो भोळा ।।२।।
नवल वर्तले नवल वर्तले नवल चोजवेना ।
डोहामाजी मासोळीने वाचविले जीवना ।।३।।
नवल वर्तले नवल वर्तले अनाम चक्रपाणी ।
गोकुळ चोरून नेले तेथे कैची दासी जनी ।।४।।

## श्रीसंत तुकयाबंधु कृत अभंग

(१५९)

वचन ऐका कमळापती । माझी रंकाची विनंती ।।१।।
कर जोडितो कथेकाळी । आपण असावे जवळी ।।२।।
घेई घेई माझी भाक । जरी कां मागेन आणिक ।।३।।
तुकयाबंधु म्हणे देवा । शब्द इतुकाची राखावा ।।४।।

(१६०)

पवित्र सुदिन उत्तम दिवस दसरा । सांपडला तो साधा आजि मुहूर्त बरा ।
गर्जा जयजयकार हरि हृदयी धरा । आळस नका करू लहाना सांगतो थोरा।।१।।
या हो या हो बाइयानो निघाले हरि । सिलंगणा वेगी घेऊनि आरत्या करी।
ओवाळू श्रीमुख वंदू पाउले शिरी । आम्हा दैव आले येथे घरीच्या घरी ।।ध्रु।।
अक्षय मुहूर्त औटामध्ये साधते । मग येरी गर्जे जैसे तैसे होत जाते ।
म्हणोनि मागे पुढे कोणी न पहावे येथे।सांडा परते काम जाऊ हरी सांगाते।।३।।
बहुता बहुता रीती चित्ती धरा हे मनी । नका गई करू आइकाल ज्या कानी।
मग हे सुख तुम्ही कधी न देखाल स्वप्नी । उरेल हायहाय मागे होईल कहाणी ।।४।।
ऐसियास वंचता त्याच्या अभाग्या पार । नाही नाही नाही सत्य जाणा निर्धार ।
मग हे वेळ घटिका न ये अजरामर । कळले असो द्या मग पडतील विचार ।।५।।
जयासाठी ब्रह्मादिक झाले ते पिसे । उच्छिष्टाकारणे देव जळी झाले मासे ।
अर्धांगी विश्वमाता लक्षुमी वसे । तो हा तुकयाबंधु म्हणे आले अनायासे ।।६।।

## श्रीसंत गोरा कुंभार कृत अभंग

(१६१)

निर्गुणाचे भेटी आलो सगुणासंगे । तव झालो प्रसंगी गुणातीत ।।१।।
मज रूप नाही नांव सांगू काई । झाला बाई काई बोलू नये ।।२।।





बोलता आपली जिव्हा पै खादली । खेचरी लागली पाहता पाहता ।।३।।
म्हणे गोरा कुंभार नाम्या तुझी भेटी । सुखासुखी मिठी पडली कैसी ।।४।।

## श्रीसंत सावता माळी कृत अभंग

(१६२)

समयासी सादर व्हावे । हरि ठेविल तैसे रहावे ।।ध्रु।।
कोणे दिवशी बसून हत्तीवर । कोणे दिवशी पालखी सुभेदार ।
कोणे दिवशी पायांचा चाकर । चालून जावे ।।१।।
कोणे दिवशी बसून याची मन । कोणे दिवशी घरात नाही धान्य ।
कोणे दिवशी द्रव्याचे साठवण । कोठे साठवावे ।।२।।
कोणे दिवशी यम येती चालून । कोणे दिवशी प्राण जाती घेऊन ।।
कोणे दिवशी स्मशानी जाऊन । एवढे रहावे ।।३।।
कोणे दिवशी होइल सद्गुरुची कृपा । कोणे दिवशी चुकती जन्माच्या
खेपा । कोणे दिवशी सावत्याच्या बापा । दर्शन द्यावे ।।४।।

(१६३)

कांदा मुळा भाजी । अवघी विठाबाई माझी ।।१।।
लसूण मिरची कोथिंबिरी । अवघा झाला माझा हरी ।।२।।
मोट नाडा विहीर दोरी । अवघी व्यापिली पंढरी ।।३।।
सावत्याने केला मळा । विठ्ठलपायी गोविला गळा ।।४।।

(१६४)

आमुची माळीयाची जात । शेत लावू बागाईत ।।ध्रु।।
आम्हा हाती मोट नाडा । पाणी जाते फुलझाडा ।।१।।

शांती शेवंती फुलली । प्रेमे जाई जुई व्याली ।।२।।
सावत्याने केला मळा । विठ्ठल देखियला डोळा ।।३।।

## श्रीसंत चोखा मेळा कृत अभंग

(१६५)

टाळी वाजवावी गुढी उभारावी । वाट हे चालावी पंढरीची ।।१।।
हरिनाम गर्जता नाही भय चिंता । ऐसे बोले गीता भागवत ।।२।।
पताकाचे भार मिळाले अपार । गर्जे भीमातीर जयजयकारी ।।३।।
पंढरीचा हाट कौलाची पेठ । मिळाले चतुष्ट वारकरी ।।४।।
खटनट यावे शुद्ध होउनी जावे । दवंडी पिटी भावे चोखामेळा ।।५।।

(१६६)

ऐसा पुत्र देगा देवा । जग म्हणे त्याला बावा ।।१।।
कन्या ऐसी तरी देई । जैसी मिरा मुक्ताबाई ।।२।।
ऐसा भक्तराज गुंडा । त्याचा तिही लोकी झेंडा ।।३।।
इतके न देवे तुझ्याने । माझे करी गा निसंतान ।।४।।
दोही माजी एक लेखा । बोले केशव दास चोखा ।।५।।

(१६७)

भाग्यवंता घरी भजन कीर्तन । त्याची वाट पाहे रघुनंदन ।।१।।
जगाच्या बाजारी सर्व काही मिळे । परि दुर्लभ संतजन ।।२।।
पूर्वजन्मी ज्याची असेल पुण्याई । त्याच्या मुखी नाम रामकृष्णहरी ।।३।।
चोखा म्हणे तुम्ही आता तरी जागा । हरिचे नाम घ्या रे निरंतर ।।४।।





## श्रीसंत निळोबाराय कृत अभंग

(१६८)

नवल हा प्रकाश प्रकाशा वेगळा । झाकिलियाही डोळा पुढे दिसे ।।१ ।।
नव्हे हा उजळीला सवेचि मावळला । आत्मतेजे केला उदो नित्य ।।२ ।।
ढवळा ना काळा पिवळा ना जांभळा। जीवीच्या जीवनकळा प्रकाशीतु ।।३ ।।
निळा म्हणे आजी आरतीचेनि व्याजे । कृपे पंढरिराजे कळले मज ।।४ ।।

## श्रीसंत नारा कृत अभंग

(१६९)

आम्हा व्रत एकादशी । देव केशव तीर्थ तुळसी ।।१।।
अनेक नेणो वा साधन । आमचा विषय हरिकीर्तन ।।२।।
संतसंगती निरंतर । प्रेमधन हे भांडार ।।३।।
विनवी विष्णुदासाचा नारा । आमची ऐसी हे परंपरा ।।४।।

## श्रीसंत रामेश्वरभट्ट कृत अभंग

(१७०)

तुकाराम तुकाराम । नाम घेता कापे यम ।। १ ।।
धन्य तुकोबा समर्थ । तेणे केला पुरूषार्थ ।। २ ।।
तारीयेल्या वह्या । जैशा उदकावरी लाह्या ।। ३ ।।
म्हणे रामेश्वरभट्ट द्विजा । तुका विष्णु नाही दुजा ।। ४ ।।

## श्रीसंत शेख महंमद कृत अभंग

(१७१)

फणसाचे अंगी काटे । आत अमृताचे साठे ।।१।।
काटे केतकीच्या झाडा । आत जन्मला केवडा ।।२।।
नारळ वरुता कठीण । वरी अंतरी जीवन ।।३।।
शेख महमद आविंद । परी हृदयी गोविंद ।।४।।

## श्रीसंत नरहरी सोनार कृत अभंग

(१७२)

देवा तुझा मी सोनार । तुझा नामाचा व्यवहार ।।१।।
देह बागेसरी जाणे । अंतरात्मा नाम सोने ।।२।।
त्रिगुणाची करुनी मूस । आंत ओतिला ब्रह्मरस ।।३।।
जीव शिव करुनी फुंकी । रात्रंदिवस ठोकाठोकी ।।४।।
विवेक हातवडा घेऊन । कामक्रोध केला चूर्ण ।।५।।
मनबुद्धीची कातरी। रामनाम सोने चोरी ।।६।।
ज्ञान ताजवा घेउन हाती । दोन्ही अक्षरे जोखिती ।।७।।
खांद्या वाहुनी पोतडी । उतरला पैलथडी ।।८।।
नरहरी सोनार हरीचा दास । भजन करी रात्रंदिवस ।।९।।

## श्रीसंत सोहिरोबानाथ अंबिये कृत अभंग

(१७३)

त्या देवाचे तू दर्शन घे । संसार मोहातुनि त्वरित निघे ।।ध्रु।।
आदि मध्य ना अंत जयाला । 'नेति नेति' म्हणती वेद तयाला ।





ज्यापासुनि हा ॐ कारहि जाहला । ब्रह्मा विष्णु हर हे तिघे ।।१।।
अगम्य अगोचर सत्ता ज्याची । सहज लीला हे त्याची ।
जारज स्वेदज अंडज उद्‌भिज । ज्यापासुनि हे सहज निघे ।।२।।
दृश्य सकळही टाकुनि जाता। निरालंबि राहाता।
प्राणापान उर्ध्वहि वाहता। आनंदभुवनी मन हे रिघे ।।३।।
म्हणे सोहिरा शून्याकार । रुप नाही त्यासी आकार ।
परब्रह्मचि निर्विकार । आत बाहेर ते अवघे ।।४।।

(१७४)

हरिभजनावीण काळ घालवू नको रे ।।ध्रु।।
दोरीच्या सापा भिऊनी भवा । भेटि नाही जिवा शिवा ।
अंतरीचा ज्ञानदिवा मालवू नको रे ।।१।।
विवेकाची ठरेल ओल । ऐसे बोलावे की बोल ।
आपुल्या मते उगाच चिखल कालवू नको रे ।।२।।
संतसंगतीने समज । ध्यानि आणुनि पुरते उमज ।
अनुभवावीण मान हालवू नको रे ।।३।।
सोहिरा म्हणे ज्ञानज्योति । तेथे कैचि दिवसराति ।
तयाविणे नेत्रपाति, हालवू नको रे ।।४।।

(१७५)

हरिस्मरण-विस्मरण, तरि तुझे काय जिणे रे असून ।।ध्रु।।
स्वार्थचि साधिसी, सार्थक नेणसी । कोणासि पहा तरि पुसून ।
पुढे नाहि गति, मलिन जाहलि मति । साधुचि संगति नसून ।।१।।
रतीविलासी लंपट होसी । मानस गेले डसून ।
लवकर सर की, पडशिल नरकी । फुकट मरशिल कुसून ।।२।।

आळसी कामा, उगा रिकामा थट्टाचि करिसी बसून ।
कुकर्मांच्या काही वर्मांच्या । गोष्टी सांगसी कसून ।।३।।
शरीर फिरवी तुजला मिरवी । देव असे रे रुसून ।
जवळी असून तुझे हृदयी बसून । भगवंत नये रे दिसून ।।४।।
म्हणे सोहिरा गुरुनाथ हा । माझ्या हृदयी घुसून ।
जनासि उद्धरावया कारणे । वचन सांगतो ठसून ।।५।।

(१७६)

आम्ही नहो हो पाचतले, नहो पंचविसातले ।
एवढ्यालाही वळखोनिया, वेगळे आम्ही आतले ।।ध्रु।।
सत्व रज तम आम्ही न त्यातले ।।१।।
आम्ही नहो हो मंत्रातले । आम्ही नहो हो तंत्रातले ।
बहुत बोलुनि काय, आम्ही नहो मायेच्या यंत्रातले ।।२।।
आम्ही नहो लक्षातले । आम्ही नहो हो पक्षांतले ।
सोहिरा म्हणे अनिर्वाच्य, आम्ही केवळ अलक्ष्यातले ।।३।।

(१७७)

वंदियला भगवंत । तो म्या वंदियला भगवंत ।।ध्रु।।
भवसिंधुतारक निजसुखकारक । सकळा आदि अंत ।।१।।
सज्जन-रंजन अलख निरंजन। भक्तजना कृपावंत ।।२।।
वेद झाले मुके, शेष न स्तवू शके । ज्याचे स्वरुप अनंत ।।३।।
नव्हे नरनारी गैबी सूत्रधारी ।। हालवी जो जिवजंत ।।४।।
सोहिरा म्हणे अनुभवि पाहणे । चित्सुखवनवसंत ।।५।।





## श्रीसंत हरीबुवा भोंडवे कृत अभंग

(१७८)

स्वप्नामाजी सभा बैसली अद्भूत । करी न्याय नित ज्ञातेपणी ।।१।।
मुका पुराण सांगे बहिरे ऐकत । आंधळे न्याहाळीत अक्षरासी ।।२।।
थोटे लेहू जात पांगुळ धावत । वेडे शिकवीत शाहाण्यासी ।।३।।
तैसा हा संसार मायिक विस्तार । जन्म मरण थार कैचा असे ।।४।।
सावध होवोनि पावे स्वरुपासी ।। हरी म्हणे त्यासी भय नाही ।।५।।

## श्रीसंत समर्थ रामदास स्वामी कृत अभंग

(१७९)

कशामध्ये काही नाही । एक निर्गुण पाही ।।
सारासार सेवुनिया । भक्त होऊनि राही ।।ध्रु।।
तीर्थ-व्रत-तप-दाने । गोरांजन धूम्र पाने ।।
स्नान संध्या दर्भासने । नानायोग साधने ।।१।।
नाना देव उपासना । नाना देव कामना ।।
आपुलाल्या भावनेच्या । नानापरि कल्पना ।।२।।
नाना पंथ नाना मते । भूमंडळी असंख्यात ।।
एकाहुनि एक थोर । दास म्हणे नेमस्त ।।३।।

(१८०)

विषयी विरक्तपण इंद्रियनिग्रहण । गुरुकृपेवाचून नव्हे नव्हे ।।१।।
चंचलपण मन न करी विषयध्यान । गुरुकृपेवाचून नव्हे नव्हे ।।२।।
बुद्धि बोधक जाण ब्रह्मानुभव पूर्ण । गुरुकृपेवाचून नव्हे नव्हे ।।३।।
रामी रामदास म्हणे निर्गुण सुख लाधणे । गुरुकृपेवाचून नव्हे नव्हे ।।४।।

(१८१)

सार्थक होते, सार्थक होते, दुरित सर्व जाते ।
पुण्य-पावन ज्ञान-मार्ग हा देवदर्शन होते ।।ध्रु।।
ज्ञानाविण ते, पशु जाणावे, वचन भगवंताचे ।
अध्यात्मविद्या साधल्याविण व्यर्थ माणुस काचे ।।१।।
दास म्हणे तो, आत्मघातकी, स्वहित करीना तो ।
मायाजाळी, भ्रमोनि गेला, व्यर्थ मरुनिया जातो ।।२।।

(१८२)

येथे काय उभा श्रीरामा । मनमोहन मेघश्यामा ।।ध्रु।।
काय केली सीतामाई । येथे आणिली रखुमाई ।।१।।
काय केले वानरदल । येथे मेळविले गोपाळ ।।२।।
काय केले धनुष्यबाण । येथे कटीवर कर ।।३।।
काय केली शरयूगंगा । येथे आणिली चंद्रभागा ।।४।।
रामदासी जैसा भाव । तैसा झाला पंढरीराव ।।५।।

(१८३)

स्मरण देव स्मरण देव स्मरण देव जाणा ।।
स्मरण चिंतने जग चाळवी त्यास तुम्ही का नेणा ।।१।
स्मरण जाणता विस्मरणाचे पाही देह जातो ।।
मागे पुढे काहीच नाही कोण राहू पाहतो ।।२।।
स्मरण हरीरूप ओळखण अंशे अंश रीघावा ।।
जेणेवीण काही न चाले तोच बरा ओळखावा ।।३।।
दास म्हणे रे समजल्यावीण सकळ काही खोटे ।।
जवळीच आहे परी भासेना माया लाघव मोठे ।।४।।





(१८४)

अगा देवराया करीतसे प्रार्थना । धाव नारायणा झडकरी ।।१।।
तुझिया सत्तेने शक्य ते अशक्य । अशक्य ते शक्य होत असे ।।२।।
हीन दीन दास येतो काकुळती । धाव गा श्रीपति पांडुरंगा ।।३।।

(१८५)

गुरुचे पाय मनी हो ध्याउया ।।ध्रु।।
पाय नये जरी निशीदिनी ध्याता । पूजा काळी पाहूया ।।१।।
हेही न घडे जरी प्रतिदिनी तुजला । नाम गुरूचे गाउया ।।२।।
हेही न घडे जरी प्रतिदिनी तुजला । वाडीत गुरुच्या राहूया ।।३।।
दास म्हणे ही पदद्वय कुसुमे । मस्तक चरणी ठेऊया ।।४।।

(१८६)

चालत नाही । बोलत नाही । हालत नाही तो निरंजन ।।ध्रु।।
दिसत नाही भासत नाही । नासत नाही तो निरंजन ।।१।।
करीत नाही धरीत नाही । हरीत नाही तो निरंजन ।।२।।
निर्मळ जो तो निश्चळ जो तो । दासचि जो तो निरंजन ।।३।।

(१८७)

तगत नाही तगत नाही तगत नाही काही ।।
तगणार एक देव निरंजन तेथेचि अनन्य राही ।।ध्रु।।
नाना भोग भाग्य विराजे, वैभव साजे मोठे ।।।
संपत्ति विपत्ति दो दिवसांची सकळहि मायिक खोटे ।।१।।
तारुण्य लावण्य रुप मनोहर सुंदर सुख करिताहे ।
शेवट नासे वाईट दिसे अंती सकळ राहे ।।२।।
मायिक माया सांडुनि काया दृढ धरि रघुराया ।।
दास म्हणे सुख सकल पावसी साधन थोर उपाया ।।३।।

(१८८)

संताचेनि संगे देव पाठी लागे । सांडू जाता मागे सांडवेना ।।१।।
सांडवेना देव सदा समागमी । बाह्य अंतर्यामी सारिखाचि ।।२।।
सारिखाचि कडकपाटी शिखरी । गृही वनांतरी सारिखाचि ।।३।।
सारिखाचि तीर्थी सारिखाचि क्षेत्री । दिवा आणि रात्री सारिखाचि ।।४।।
सारिखाचि अंत नाही तो अनंत । रामदासी किंत मावळला।।५।।

(१८९)

नांव मारुतीचे घ्यावे । पुढे पाऊल टाकावे ।।१।।
अवघा मुहूर्त शकून । हृदयी मारुतीचे ध्यान ।।२।।
जिकडे जिकडे जाती भक्त । पाठी जाय हनुमंत ।।३।।
राम उपासना करी । मारुती नांदे त्याचे घरी ।।४।।
दास म्हणे ऐसा करा । सदा मारुती हृदयी धरा ।।५।।

(१९०)

धन्य धन्य ते नगर । जेथे कथा निरंतर ।।१।।
गुण गाती भगवंताचे । तेचि मानव दैवाचे ।।२।।
स्वये बोले जगज्जीवन । थोर कलियुगी कीर्तन ।।३।।
रामदास म्हणे भले । हरिभक्त उद्धरले ।।४।।

(१९१)

प्रगट निरंजन प्रगट निरंजन प्रगट निरंजन आहे ।
आगम निगम संतसमागम सद्‌गुरूवचने पाहे ।।ध्रु।।
आत्मविचारे शास्त्रविचारे गुरूविचारे बोध ।
मीपण तूपण शोधून पाहता आपण आपणा शोध ।।१।।





जडासी चंचल चालविताहे चंचळ स्थिर न राहे ।
प्रचित आहे शोधूनि पाहे निश्चळ होऊन राहे ।।२।।
भजनी भजन आत्मनिवेदन श्रवण मनन साधा ।
दास म्हणे निजगुज साधता होत नसे भवबाधा ।।३।।

(१९२)

अरे नर सारविचार करी । मन बरे विवरी ।।ध्रु।।
सारासारविचार न होता । वाहासी भवपुरी ।।१।।
सकळ चराचर कोठुनि जाले । कोठे निमाले तरी ।।२।।
दास म्हणे जरि समजसि अंतरी । मुळीची सोय धरी ।।३।।

(१९३)

जो जो जो जो रे श्रीराम । निजसुख गुणविश्रामा । बाळा. ।।ध्रु।।
ध्याती मुनि योगी तुजलागी । कौसल्या ओसंगी ।।१।।
वेदशास्त्रांची मती जाण । स्वरूपी जाली लीन ।।२।।
चारी मुक्तींचा विचार । चरणी पहाती थोर ।।३।।
भोळा शंकर निशिदिनी । तुजला जपतो ध्यानी ।।४।।
दास गातसे पाळणा । रामा लक्षूमणा ।।५।।

(१९४)

डोळा हा गाळोनी साधिले अंजन । निजी निजधन प्राप्त जाले ।।१।।
पायाळाचे दिले बलिदान अंग । अंगी अंगसंग संगाविण ।।२।।
लाभ ना अलाभ वृत्ति ना निवृत्ति । शुद्धबुद्ध ज्ञप्ति मावळली ।।३।।
आकाश हारपले चिद्रुप संचले । सूर्याविण पाहिले सदोदित ।।४।।
नाद बिंदुकळा ज्योती विश्रमली । रामदासा जाली वस्ति तेथे ।।५।।

## श्रीसंत कल्याण स्वामी कृत अभंग

(१९५)

लाविली बत्ती आता कशी मी विझवू पाशी ।।ध्रु।।
बत्ती लाविली दारुला । दारुसहित बुधला गेला ।
धूर आस्मानी दाटला । नये मागुति ।।१।।
बत्ती लाविली तोफेला । पुढे धणी उभा केला ।
भीड काय तोफेला । उडवुनि देती ।।२।।
बत्ती लाविली कापुरा । अवघा ज्योतीरुप सारा ।
निर्दाळला पुरा । ना उरला रती ।।३।।
सदगुरु रामदास माऊली । बत्ती कल्याणी लाविली ।
आपणा ऐसी केली । स्वयंज्योति ।।४।।

## श्रीसंत वेणाबाई कृत अभंग

(१९६)

कोण जनाला कोण मनाला मानवले सार ।।
रामवीण सर्वहि शीण दुःख अनिवार ।।ध्रु ।।
धन्य जिणे सुफल होणे रामगुणे होते ।।
ध्यास घडे ज्यास त्यास सत्य कळो येते ।।१।।
संग सोडी राम जोडी भजनी निष्काम ।।
धन्य तुम्ही धन्य आम्ही गाऊ रामनाम ।।२।।
इहलोक परलोक त्यासी सासुरवाडी ।।
वेणी म्हणे भक्तजना भजने राम जोडी ।।३।।





(१९७)

आम्ही गुरुनाथपंथी । सोपान मागे गेलो एकांती ।।१।।
आम्ही स्वामीचे अंकीत । रामराम मुद्रांकीत ।।२।।
अहं ब्रह्म उपदेशिले । निर्विकल्पी रत केले ।।३।।
वेणी स्वामी अवघा भरला । विज्ञानासी अंत आला ।।४।।

## श्रीसंत केशवस्वामी कृत अभंग

(१९८)

अखंड खंडेराया रे । दूर करी भवमाया रे ।।ध्रु।।
म्हणउनि पाया लागतसे । अक्षय निजपद मागतसे ।। १ ।।
प्रपंच मन्मथ मल्लारी । त्रिपुरारी मम श्रम वारी ।। २ ।।
देऊनी तारकपद सेवा । केवळ मंगल करि देवा ।। ३ ।।
निश्चळ ठेऊनि त्रिकाळी । अतिगतीने मज सांभाळी ।। ४ ।।
प्रेमहराप्रति मज नेई । म्हणे केशव अद्वय निजदेही ।। ५ ।।

## श्रीसंत गिरीधरस्वामी कृत अभंग

(१९९)

छंद मना घे अखंड सद्गुरु समर्थ चरणाचा ।
यावीण दुस्तर सागर तरण्या मार्ग नसे साचा ।।ध्रु।।
मना तूजला गूज सांगतो समर्थ ग्रंथीचे ।।
ग्रंथराज भावार्थ ही ऐसा वदिती गिरी वाचे ।।१।।
अनन्य भावे स्मरण करोनी सद्गुरु चरणाचे ।
मानसपूजा ध्यान जपा ते रिझवी मन ज्याचे ।।२।।

तरीच जन्मा येऊन केले सार्थक देहाचे ।
जरी अहर्निश ध्यान लागले योगीरायाचे ।।३।।
गुरुचरणाची गोडी तुजला किती सांगू वाचे ।
सेवक किंकर स्वच्छंदाने गुरुचरणी नाचे ।।४।।

## श्रीसंत श्रीधरस्वामी कृत अभंग

(२००)

गुरुपदकमळी मनभ्रमरा । धरिशिल जरि तू दृढ थारा ।।
तरि तुज निज-सुख-मधु-चारा । लाभे, नमिळे जो अमरा ।।ध्रु।।
मंजुळ तदगुण गान करी । निजरुपि निश्चळ प्रेम धरी ।।
नित्य निरंजन गुरुनरहरी । सर्व चराचर मति विवरी ।।१।।
प्रपंच चंपक सुमन असे । तेथे क्षणभरि तू न वसे ।।
अद्वय-भजने भ्रम निरसे ।। श्रीधर विभु मग नयनि दिसे ।।२।।

## श्रीसंत बयाबाई कृत अभंग

(२०१)

बाग रंगेली महाल बना है । महालके बीचमे झुलना खुला है ।।ध्रु।।
इस झुलनेपर झुलो रे भाई । जनन मरनकी भूल न आई ।।१।।
दासी बया कहे गुरुमैयाने । मुझकु झुलाया सोहि झुलाने ।।२।।

## श्रीसंत दिनकर स्वामी कृत अभंग

(२०२)

देव देव देव देव । देव म्हणता कैचा भेव ।।१।।
अखंड नाचावे उडावे । नाभीस्वरे नाम घ्यावे ।।२।।





वाजवुनी करताळिका । हाकारावे रामा एका ।।३।।
कथा करुणेच्या कल्लोळे । वोसंडावे नेत्रजळे।।४।।
होऊनि सप्रेम स्वानंदे । सोडवावी कळिची ब्रीदे ।।५।।
दिनकर म्हणे रामदास्य । मोठे ब्रीद हे संतास ।।६।।

## श्रीसंत कृष्णदयार्णव कृत अभंग

(२०३)

आपणची जग झाला हरी हा ।। ध्रु ।।
आपणची देव भक्त होऊनी । पूजीतो आपणाला ।।१।।
उत्तम मध्यम अधमायाति । देव रुपे नटला ।।२।।
सर्वं खलु इति कृष्णदयार्णव । श्रृति वदति त्याला ।।३।।

## श्रीसंत निजानंद कृत अभंग

(२०४)

डोळा उघडेना उघडेना । पश्चात्ताप घडेना ।
चिद चिद ग्रंथी सुटेना । क्षणभर विषयी चित्त विटेना ।।१।।
निजानंदे रंगेना । निश्चळ निर्मळ भव भंगेना ।।२।।

(२०५)

आम्ही हरिहरांच्या दासी । झालो अखंड वैकुंठवासी ।।ध्रु ।।
देही असताचि वैकुंठ पाही । येणे जाणे नलगे काही ।।१।।
पाय क्षाळुनि पद-तोय घेऊ । शेष उच्छिष्ट त्यांचे सेवू ।।२।।
पदोपदी श्वासोश्वासी । गाऊ गीती ग्रासोग्रासी ।।३।।

एक सत्ता त्रिभुवनी ज्याची । कीर्ती वर्णू त्रैलोक्यी त्याची ॥४॥
हेचि काम आता करु । संतपावले हृदयी धरू ॥५॥
कामा भेणे उसंत नाही । मागो देवासी हे सर्वदाही ॥६॥
दास्य दासाचे देव करी । निजानंदे रंग भरी ॥७॥

(२०६)

झाला विठ्ठल संग । मनि भरला रंग ॥ध्रु ॥
एकचि तंतु सोहंस्मरणाचा । वाजत जैसा चंग ॥१॥
चिन्मयमूर्ती परात्पर आहे । पाहुनि झालो दंग ॥२॥
रंगातीत निजरंगि रंगुनी । भवभय झाले भंग ॥३॥

(२०७)

राममय वृत्ती झाली आता काय उणे ।
अहंकार दग्ध झाला स्वात्मसुख घेणे ॥१ ॥
जीवशीव ऐक्य झाले जगब्रह्म दिसे ।
पशू पक्षी नाना योनी जगब्रह्म भासे ॥२ ॥
बोल सारे बोलुनि गेलो आता काय बोलू ।
निजानंदी नीजरंगी पूर्ण ब्रह्म डोलु ॥३ ॥

(२०८)

उर्ध्वपथे चाल बाई! ब्रह्मगिरी पाहू ।
देहभावविलय तेथे तेचि होउन राहू ॥ध्रु॥
निजमुळा जावे हेचि पडे ठावे ।
मागिल चाळे सांड बाळे ! सावध होऊन भावे! ॥१॥
नीट वाटे चाल बाई ! चोर बहूसाल ।
जाईल टका उडेल फुका लोक लाविती बोल ॥२॥





कल्पनेच्या सैरा दाटी श्वापदांच्या हारी ।
कंटकाचि पिडा बहू शिणविती भारी ॥३॥
दुर्जनाची रांड हो का काय धोका त्यांचा? ।
आपुले हिता सावध व्हावे काया मने वाचा ॥४॥
सज्जनाचे घरी पाय तरिच लागे सोय ।
सहज रंगी पूर्णब्रह्म निजानंद होय ॥५॥

## श्रीसंत हरिनारायण कृत अभंग

(२०९)

गुरु तुझा सर्वस्वी आधार ॥ध्रु॥
कळि काळासी दृष्टिसि नेणे । तूची उतरी पार ॥१॥
कल्पना हे घडमोड करिशी । मिथ्या हा व्यवहार ॥२॥
नाना भ्रांती तद्रुप करूनी । वरकड भूमीभार ॥३॥
हरिनारायण निशिदिनि घेई । मुखी हा उच्चार ॥४॥

## श्रीसंत अमृतराय कृत अभंग

(२१०)

संग्रह कोण करी अशाश्वत । संग्रह कोण करी ॥ध्रु॥
कोण करी घर सोपे माड्या । विवरी वस्ती बरी ॥१॥
चिडगुड चिंध्या जोडुनि कंथा । गोधडी हेचि बरी ॥२॥
नित्य नवे जे देईल माधव । भक्षु तेचि करी ॥३॥
अमृत म्हणे मज भीक्षेचे डोहाळे । येती तशा लहरी ॥४॥

## श्रीसंत निरंजन कृत अभंग

(२११)

सूक्ष्म गुरुमार्ग गुरुमार्ग ।। चढता एकवीस स्वर्ग ।।
हाती घेऊनिया ज्ञानखर्ग ।। घ्यावा अलक्षदुर्ग ।।ध्रु।।
हृदयी प्रगटति तीन वाटा । दोन गेल्या नीटा ।
एक गेलीसे अव्हाटा । भेदुनि ब्रह्मकपाटा ।।१।।
सप्तसिंधूचे आवरण । त्या दुर्गाकारण ।।
तेथे जाईल बा ! कोण । त्या योगींद्रावाचून ? ।।२।।
धारा शस्त्रांच्या तीक्ष्ण । त्या दुर्गाकारण ।
त्याहुनि करिती बा ! गमन ।। ब्रह्मनिष्ठ जाण ।।३।।
सुईच्या रंध्राहूनि लहान । त्या दुर्गाची खूण ।
त्यातुनि करिती बा ! गमन ।। आत्मनिष्ठ जाण ।।४।।
जेथे रीघ नाही मुंगीला । ठाव कैचा पक्ष्याला ।
मीन माघारा परतला । कपीशेष राहिला ।।५।।
सदगुरु एकांतासि नेतो । हस्त शिरी ठेवितो ।
तनुमन घेवोनीया जातो । जिव मारुनि जिववीतो ।।६।।
प्रभु निरंजन समर्थ । आमुचा सदगुरुनाथ ।।
तयाने दाखविला निजपंथ । बोलविला सिद्धांत ।।७।।

## श्रीसंत सूरदास कृत अभंग

(२१२)

निर्धनको धन राम । हमारो ।।ध्रु।।
खात न खरचत चोर न लूटत । साथे आवत काम ।।१।।





दिन दिन होत सवाई दिढी । खरचत को नहि दाम ।।२।।
सूरदास प्रभु मुखमो आवत । औरसमो नहि काम ।।३।।

## श्रीसंत माधव कृत अभंग

(२१३)

लागला तोबा, तोबा मज बाई । हरि हर विठ्ठल रखुमाई ।।ध्रु।।
यात्रा भरली, भरली आषाढीची । स्वारी आली श्रीमंतांची ।।
दाटी जाली, झाली दुदुराची । तोबे उडति ठायी ठायी ।।१।।
दर्शन होय ना, होय ना देवाचे । देवळाभोवता मी नाचे ।।
पाय पाहिले, पाहिले रुक्मिणीचे । वदनी नाम विठ्ठलाचे ।।२।।
माधव आत्मा, आत्मा सकळांचा । श्रुति गर्जती वेदवाचा ।।
करुणासिंधु, सिंधु भक्तांचा । हेतु पुरवी जडजीवांचा ।।३।।

## श्रीसंत मध्वमुनिश्वर कृत अभंग

(२१४)

जगामध्ये एकचि ब्रह्म गड्या ।।ध्रु।।
नाना भिंती एकचि माती । मठ आणि शेगड्या ।।१।।
नाना नाणे एकचि सोने । बाळ्या आणि बुगड्या ।।२।।
मध्वमुनिश्वर स्वामी रमापती । भजनी देत उड्या ।।३।।

(२१५)

शुभ शकून सांगा कोणी तरी । कधी भेटेल मजला देव हरी ।।ध्रु।।
अंगणी माझ्या कागची बोले । कोकीळ बोले मधुर स्वरी ।।१।।

मुखीच्या माझ्या ग्रासचि गळला । बंधु माझे स्मरण करी ।।२।।
लवतो माझा डावा डोळा । तळमळ तळमळ जीव करी ।।३।।
मध्वमुनीश्वर स्वामी रमापति । सद्गुरु चरणी प्रीति धरी ।।४।।

(२१६)

चिंतावा रघूवीर । प्राण्या ।।ध्रु।।
नासिक त्रिंबक रूप मनोहर । पावन गंगातीर ।।१।।
पंचवटीमध्ये पर्णकुटी करी । सेवुनि राहे नीर ।।२।।
मधुर हरीच्या नामाविरहित । न रूचे साखर क्षीर ।।३।।
मध्वमुनीश्वर म्हणतो येथे । चित्त करावे स्थिर ।।४।।

## श्रीसंत महिपती कृत अभंग

(२१७)

सावध व्हा गडे नीट उमगा । शिमगा निघून जाईल की ।
बसुन तमाशा पाहू चला रे, पहाता पहाट होईल की ।।ध्रु ।।
पाच पंचवीस पोरे यांची, संगत सोडून द्यावी की ।
त्रिगुण मोळी बांधुन होळी, औट पिठावर न्यावी की ।।१।।
सत्रावीचा लोट घोटुनी, लक्ष सुनीळा लावी की ।।
फटफटित चांदणे ज्योतिज्वाळा, त्यात भासा येईल की ।।२।।
नवरंगाचा एकच गोळा, बहु बाभाळा भासेल की।
चंद्रसूर्य हे देखणे गेले, पाहाता पाहणे नासेल की ।।३।।
लपेल ढवळे दिसेल पिवळे, यात कांही बाही असेल की ।
त्यात मिळावे तन्मय व्हावे, साधनि मन हे भावेल की ।।४।।
गुरुची सेवा घडेल जेव्हा, समाधि लागुन जाईल की ।





नरहरिनाथा स्वामिसमर्था, कधि हे घडोन येईल की ।।५।।
जन्ममरण या दु:खापासुनि, सुटका कशितरि होईल की ।।
महिपति किंकर अखंड भोगी, स्वरुपसमाधित राहिल की ।।६।।
हा सुखसोहळा आपुल्या डोळा, आपणचि आपणा पाहिल की।
जनांसि हसतो मनासि पुसतो, कधि सण शिमगा येईल की।।७।।
सदगुरुनाथ कृपा करुनि मज, माहेराप्रति नेइल की ।
सावध व्हा गडे नीट उमगा, शिमगा निघून जाईल की ।।८।।

## श्रीसंत मीराबाई कृत अभंग

(२१८)

हरि गुन गावत नाचुंगी ।।ध्रु।।
आपने मंदिरमो बैठ बैठकर । गीता भागवत बाचुंगी ।।१।।
ग्यान ध्यानकी गठडी बांधकर । हरिहर संग मै लागूंगी ।।२।।
मीराके प्रभु गिरीधर नागर । सदा प्रेमरस चाखुंगी ।।३।।

## श्रीसंत भजरंगात्मा कृत अभंग

(२१९)

साधन काय करु स्वामी । सांगा यत्न कसा करू मी ।।ध्रु।।
कोठे जावे काय करावे । घ्यावे काय त्यजावे ।
जळ प्रलयातील उदका सम ते । परब्रह्म समजावे ।।१।।
पाणी सांडुनी दुग्धचि घ्यावे ऐसा यत्न करावा ।
माया सांडुनी भजरंगात्मा नामी अनुभव घ्यावा ।।२।।

## श्रीसंत नरहरी कृत अभंग

(२२०)

नामस्मरण । तुम्ही करा हरिचे ध्यान ।।ध्रु।।
बालपण जाईल खेळता । तरूणपण जाईल भोगिता ।
पुढे म्हातारपणाची कथा । बहुत कठीण ।।१।।
बारा तास बत्तीस घडी । काळ चालला कातडी ।
पुढे पडेल काळाची उडी । घडेल मरण ।।२।।
नरदेह पाण्यावरला तरंग । जैसा बेगडीचा रंग ।
नरहरी बोधाचा अभंग । पहा शोधुन ।।३।।

## श्रीसंत नगदनारायण कृत अभंग

(२२१)

तुम्ही या गावचे की त्या गावचे । आडनाव सांगा काय तुमचे ।।ध्रु।।
प्रपंच करीता दिनरजनी । किंवा असता हरिभजनी ।।१ ।।
कर्मफळे तुम्ही मनी धरीता । किंवा आत्मनिवेदन करता ।।२ ।।
नगद नारायण भगत शिपाई । गाव पुसाल तर ठावची नाही ।।३।।

## श्रीसंत शिवीदिनी केसरी कृत अभंग

(२२२)

गुरूच्या उपकारा उपकारा । नाहीच पारावारा ।।ध्रु ।।
देऊनी आपुला डोळा । डोळा दाखविले घननीळा ।।१।।
देऊनी आपुली दृष्टी । अवघी चिन्मय केली सृष्टी ।।२।।
जिकडे पाहे तिकडे । अवघे ब्रह्मचि दिसते उघडे ।।३।।
नयनी स्वरुप जडले । सद्‌गुरुनाथे डोळस केले ।।४।।
केसरी-सद्‌गुरुपायी । शिवदिनी ब्रह्मचि केले पाही ।।५।।





(२२३)

शिव भरला शिव भरला । नयनी, भरलाची भरभरला ।।ध्रु ।।
सोहं भावे स्मरला । स्मरला नाहिच की विस्मरला ।।१ ।।
निंदा स्तुति वरिला । वरिला निर्गुण-सगुण-नवरिला ।।२ ।।
केसरि गुरु अवतरला । तरला शिवदिन हा भव तरला ।।३ ।।

(२२४)

जुग जुग जुग मैना जुग मैना । जन्ममरण दूर करना ।।ध्रु ।।
नयनव पिंजरा खोलो । मुखसे मैना मैना बोलो ।।१।।
खोलो त्रिकुटकी ताटी । बोलो रामनामकी धाटी ।।२।।
शिवदिन केसरी बोले । बोलके अंतरयामी डोले ।।३।।

## श्रीसंत जयरामात्मज कृत अभंग

(२२५)

निजवदनी हरिनाम वसावे । न लगे त्यासी वनात बसावे ।।ध्रु।।
कोण मी कैचा कोठुनि आलो । हे गुज श्रीगुरुलागि पुसावे ।।१।।
या पुनर्भवी नाम निरुपम । ध्यान सगुण हृदयात ठसावे ।।२।।
जयरामात्मज प्रभुच्या कीर्तनि । जाउनि प्रेमरसात घुसावे ।।३।।

## श्रीसंत देवनाथ कृत अभंग

(२२६)

गुरुकृपेका अंजन पाया मेरा मैं जानू ।।
आपरूप नयनोमे छाया मेरा मैं जानू ।।ध्रु ।।
उलट मार्गकी रहा बताई मेरा मैं जानू ।।
बुरे करमकी रेख मिटाई मेरा मैं जानू ।।१।।

चांदसुरजबिन पडा ऊजाला मेरा मैं जानू ।।
पिलाया अजरामरका प्याला मेरा मै जानू ।।२।।
जहां तहां मैं आप अकेला मेरा मैं जानू ।।
आपहि गुरु और आपहि चेला मेरा मैं जानू ।।३।।
गोविंदनाथने यहि बतलाया मेरा मैं जानू ।।
देवनाथ आपनोमे मिलाया मेरा मैं जानू ।।४।।

## श्रीसंत शिवराम कृत अभंग

(२२७)

महाराजा सद्गुरु मायबापा । तुझ्या संगे संसार गमे सोपा ।।ध्रु।।
तुझा हस्त धरुनि जाता वाटे । पदोपदी समाधिसुख दाटे ।।१।।
प्रबोधाची देखोनि जीववाढी । देहबुद्धि धाकेचि प्राण सोडी ।।२।।
शिवरामी लागला तुझा छंद । प्रगटला सबाह्य पूर्णानंद ।।३।।

(२२८)

तेचि गत बाई ! आचार तिचे ठायी ।
जाणिवेचा बोल अंगी येऊ दिला नाही ।।ध्रु ।।
सत्कर्माचा सडा बरा घालुनिया द्वारी ।।
माजघरची वोज बरी दावि लोकाचारी ।।१।।
निष्कामाचे चहुकोनी सारविले घर ।।
सुरंग रंग रंगमाळ घाली निरंतर ।।२।।
घवघवित प्रेमकुंकू लावुनिया भाळी ।।
पूर्णानंदी शिवरामी विचरे वेल्हाळी ।।३।।





(२२९)

संत दयाळ कसे । राजा रंक जया सरिसे ।।ध्रु।।
श्रवणी पाजुनी अमृतवाणी । नयनी दाविती चिन्मयखाणी ।।१।।
देऊनी भेटी तोडीती माया । नेऊनी बसविती निजपद ठाया ।।२।।
शिवरामाचे अभिनव लेणे । लेवविले मज पूर्ण कृपेने ।।३।।

## श्रीसंत महिपतीबोवा उज्जनकर कृत अभंग

(२३०)

गुरुने नवल केले ग । माझे मीपण नेले ग ।
गुरुरूप माझ्या नयनी भरले । ब्रह्मचि होउनि गेले ग ।।ध्रु ।।
नयन सांठवुनि नयनात । उभे मज केले अंगणात ।
हळूच सांगे कानी दुरूनी । बोट दाखवी गगनात ।।१।।
निळी चांदणी लखलखली । प्रभा लोचनी झकझकली ।
पहाता दृष्टी न पुरे माझी । पुढे ज्योती चकचकली ।।२।।
सुंदर सुनीळ नार ग । स्वरूप तिचे अरुवार ग ।
मस्तकी एक फुल फुलले । तेहि सदा गरुवार ग ।।३।।
फुलोन फुलली पूर्ण कला । चिन्मय उगवे चंद्रकला ।
मुद्रा तंद्री लागुन गेली । अलक्षरूप झाला सगळा ।।४।।
नरहरिनाथा श्रीगुरुराया । महिपति लागतसे तव पाया ।
कर्ता हर्ता तूचि स्वामी । अर्पण केली तुज काया ।।५।।

## श्रीसंत निरंजन (गाणपत्य) कृत अभंग

(२३१)

अपराध क्षमा आता केला पाहिजे । गुरु हा केला पाहिजे ।।
अबध्द सुबध्द गुण वर्णिले तुझे ।।१।।

नकळेचि टाळ विणा वाजला कैसा । वाजला कैसा ।।
अस्ताव्यस्त नाद पडे झाला भलतैसा ।।२।।
निरंजन म्हणे देवा वेडे वाकुडे । देवा वेडे वाकुडे ।।
गुणदोष न लावावा सेवकाकडे ।।३।।

## श्रीसंत मुकुंदराज कृत अभंग

(२३२)

हे खुण अनुभवाची पिंडी परतुनी पाहे ।
आपेआप प्रकाशले तेणे आनंदे राहे ।।ध्रु।।
पश्चिम दिशेसी जाता उजवा ठाकीला मेरु ।
अनुहात गगन गर्जे थोर उठला गजरू ।।१।।
त्रिकुटी स्थिरावला मन पवन वारु ।
जिंकीले पंचप्राण केला मदनासी मारु ।।२।।
आधारी नाभि मुळी तीही एकची तंतू ।
सहस्रदळावरी स्थिर राहे निवांतू ।।३।।
विघडले संद बंद षडचक्राची माळ ।
चंद्राविण चांदणे दिसे मुक्ती कल्लोळ ।।४।।
आशा मनषा दया क्षमा असती जया अंतरी ।
मुकुंदराज योगी सुखीया होय आधारी ।।५।।

## श्रीसंत गुलाबरावमहाराज कृत अभंग

(२३३)

आता मज एक सुचला उपाव । घेईन मी नांव श्वासोश्वासी ।।१ ।।
आकाशात आत्मा आत्म्यात आकाश करुनी मनास दाखवीन ।।२ ।।





वागेन पिसाट खेळेन अंतरी । कुडें ते निवारी यातील तू ।।३ ।।
हळू हळू चित्ता आणीन समाधी । परि पण सिध्दी नेई माझा ।।४ ।।
सगुणावांचोनी नलगे आणिक । तूचि नित्य सुख आळंदीशा ।।५ ।।

## श्रीसंत पंतमहाराज बाळेकुंद्री कृत अभंग

(२३४)

आरंभ नाही शेवट कैचा मध्यस्थितीला भुलू नको ।
संसारामधी एकही पाऊल अनुभवावीण टाकू नको ।।ध्रु ।।
जन्मा येऊनी पंचविषयासाठी निशिदिनी झुरू नको ।
अज्ञानामधी दु:ख भोगुनी व्यर्थ पशुवत् मरू नको ।।१।।
गुरुविणे अन्य दैवत नाही कल्पित देवा पुजू नको ।
सद्गुरु आत्मा तुझा तुचि बोध मनीचा सोडू नको ।।२।।
वेदशास्रांची भीड धरुनी संशयरानी फिरू नको ।
स्वानुभवसिध्दांत दत्ताचा ध्यानी धरी कधी विसरू नको ।।३।।

## श्रीसंत स्वामी स्वरुपानंद कृत अभंग

(२३५)

जीवा शिवाचा संयोग । हाचि माझा राजयोग ।।१।।
भेदभाव हारपला । हरि एकला संचला ।।२।।
दूर झाली आधिव्याधि । लागे अखंड समाधि ।।३।।
स्वामी बैसला स्वस्थानी । हरिरुप ध्यानी मनी ।।४।।

(२३६)

रामनाम धरा कंठी । पाप जाय उठाउठी ।।१।।
नामे पाषाण तारिले । नामे पापी उद्धरिले ।।२।।

नाम जपे वाल्या कोळी । धन्य झाला भूमंडळी ।।३।।
नामे तारिली पिंगळा । अजामीळ मुक्त केला ।।४।।
रामनाम बीजमंत्र । स्वामी जपे अहोरात्र ।।५।।

## श्रीसंत ब्रह्मचैतन्य गोंदवलेकरमहाराज कृत अभंग

(२३७)

भजनाचा शेवट आला । एक वेळ राम बोला ।।१।।
करा नामाचा गजर । भवसिंधु उतरा पार ।। २।।
नका करु हो आळस । राम जपा श्वासोच्श्वास ।। ३।।
राम राम म्हणता वाचे । ब्रह्मसुख तेथे नाचे ।।४।।
दृढ धरी गुरूपाय । नामावाचुनि गति काय ।।५।।
दीनदास म्हणे शरण जावे । त्याने स्वत: ब्रह्म व्हावें ।।६।।

## श्रीसंत निंबरगीकरमहाराज कृत अभंग

(२३८)

ध्यान करो गुरु साहेबजीका सबकुच करता मालक है ।।
भजन करो गुरु साहेबजीका सबकुच करता मालक है ।।ध्रु।।
नरतन जावे नहि मिलनेका फेरपावना पल्ला है ।।
फेर पडेतो पस्तावेगा लाख चौऱ्याऐशी चक्कर है ।।
करसोपलमो छोटेमोठे बहुत जनमका झोला है ।।१ ।।
सबजनतेकू माता पिता साहेबजी कहां मिलता है ।।
ये तनु सबसे ऊंची बाका गुरुभजन कुच घडता है ।।
नहि सुने तो तेरी आछी पापपुण्यका फेरा है ।।२।।
चार बेद सब मुखसे बाचे गुरुबिना कोई तरता है ।।





कच्ची ककडी दरदधुनीमे खूब स्वाद क्या पकता है ।।
कहत गुरुलिंगजंगमसाधु अलखनिरंजन न्यारा है ।।३ ।।

## श्रीसंत रामभाऊमहाराज यरगट्टीकर कृत अभंग

(२३९)

प्रभुजी बहुत मजा नरतनमो । नहि सुख घर धन बनमो ।।ध्रु।।
नरतनु अंदर सबकुच देखे । चंद्र सुरज दो नैनमो ।।१।।
हीरा तारा लाल पसारा । रंग उडत चैतनमो ।।२।।
गगन फोडकर बिजली चमके । हुवा उजाला बनमो ।।३।।
घंटा सिंह नाद उठत जब । मस्त हुवा अब मनमो ।।४।।
सद्गुरूबालक दास कहत है । झुटा पसारा जगमो ।।५।।

(२४०)

डोला भरला जाई रे । रामरूप तू पाही रे ।
आपणचि नाही तेथे । समाधान ते काई रे ।।ध्रु।।
पाचांचा गोंधळ रे । सगुणगुणाचा खेळ रे ।
तेथे पाहता काहीच नाही । व्यर्थ जाण उपाधी रे ।।१।।
अंतःकरण मन बुद्धी रे । चित्त अहंकार संधी रे ।
त्यापासुनि हे स्थूळ जन्मले । सर्व जाण असार रे ।।२।।
करुनी तत्वझाडा रे । सद्गुरुवचन जोडा रे ।
दासाचे हे वाक्य मानुनो । स्वरुपि लीन हो वेडा रे ।।३।।

(२४१)

अनुपम्य मनोहरु ।। गुरुकृपे साक्षात्कारू ।।
पाहता होय मन स्थीरु ।। सच्चिदानंद ।।१ ।।

सद्रूप मूळ ब्रह्म पाही ॥ चिद्रूप गगनी नटला बाई ॥
आनंदरुप ते लवलाही । गुरुघरचे नाणे ॥२॥
गुरुचे अंजन मी ल्याले । माझे मज दिसू आले ॥
झगमग झगमग कोंदाटले । चहुकडे तेची ॥३॥
आजवरि गुप्तचि होते बाई । आता प्रगटे दिशा दाही ॥
याच डोळा याच देही। अनुभव घेणे ॥४॥
ऐसा सदगुरुमहिमा । जाणुनि भजा नित्यनेमा ॥
आवडीने तारी आम्हा । समर्थ स्वामी ॥५॥

(२४२)

तो नर नर कसला नर कसला । हरिला विन्मुख जाहला ॥ध्रु॥
अविद्येचे वारे । त्यातचि निमग्न जाहला बा रे ॥१॥
संतसमागम नाही । अवघा प्रपंच केला काही ॥२॥
माझे तुझे म्हणता । लाज नाही ज्याच्या चित्ता ॥३॥
ज्ञानी अनुभव नाही । अवघी बडबड करितो बाई ॥४॥
संसार जन्मवरि केला । माझे माझे म्हणतचि मेला ॥५॥
येथे फट्ट फजिती । परलोकांतहि खाती जूती ॥६॥
दासाचे ऐकेना । जो श्रीगुरुला शरण रिघेना ॥७॥

(२४३)

सत्तेने जग चाले । प्रभु तव इच्छेने देह चाले ॥
व्यर्थ भ्रमे मी बोले । प्रभु तव सत्तेने जग चाले ॥ध्रु॥
माया तुम्ही परब्रह्म तुम्ही परि । न कळुनि हे जग भुलले ॥१॥
कोण देही या बोले चाले । दुजिया नाही उमजले ॥२॥





भरि भक्ताहाती सहज गवसती । इतरा नाही फसले ॥३॥
रक्षाया भक्तांच्या ब्रीदा । युगायुगी अवतरले ॥४॥
कर्ता सर्व ही करणी तुमची । काहो मज तुम्ही त्यजिले ॥५॥
सदय मन तुझे कृपाळु असता । का निष्ठुर ते केले ॥६॥
माय बाप गण गोत सखा तू । स्वामी मनि तुज वरिले ॥७॥
सदगुरुबालक दास स्मरे तुज । स्वरुपी मन हे रमले ॥८॥

## श्रीसंत तात्यासाहेबमहाराज कोटणीस कृत अभंग

(२४४)

सद्‌गुरुंनी दया बहुतचि केली । कृपेची साउली वर्णवेना ॥१॥
माझ्या नाशासाठी मोठा यत्न केला । परि तो विफळ झाला गुरुकृपे ॥२॥
सप्त दिन मज दीर्घ मूर्च्छा आली । काया व्यापियेली नाना रोगे ॥३॥
माझे अपराध सर्व क्षमा केले । संकटी धावले राखावया ॥४॥
जेथे राम उभा वाचवाया । कोण गणी वाया संकटासी ॥५॥
दासाचा हा स्वामी आकांती पावतो । दु:ख भय हरतो निजकृपे ॥६॥

(२४५)

श्रीराम अवतरला । जिकडे तिकडे दृष्टीत भरला ॥ध्रु॥
दशरथ पाहे वैखरीभीतरी । न लभे तेथे कौसल्या सुंदरी ॥
पाहे मध्यमा माजघरी । परि नच पडे दृष्टीला ॥
तेणे हताश भूपती झाला ॥१॥
पुढती पाहे पश्यंती ओवरी । न लभे तेथे निर्धारी ॥

चढला परेचिया उपरी । तेणे ही अप्राप्य त्याला ।
तेणे दशरथ बहु खिन्न जाहला ।।२।।
पुढती शोधी तो सहजासनी । जैसी योगिया लागे उन्मनी ।।
पाहता निवतसे लोचनी । सगर्भ धर्म पत्नीला ।।
देखोनि आनंद ओसंडला ।।३।।
जव जव तिजकडे सादरे पाहे । निज तेज नयनी नच समाये ।।
पोटा महद्भूत येउनी ठाये । विदेही संभवला ।।
तेणे गुणे नृप बहु तुष्ट झाला ।।४।।
अवलोकिता दाहि दिशा । पडला रामरूपी ठसा ।
गती खुंटली श्वासोच्छ्वासा । माजी राम कोंदाटला ।
दासाचा हा कैवारी आला ।।५।।

(२४६)

गजवदना तूं सुख-सदना रे । वेगी मला पावे ।।
मन-मूषकावरी बैसुनि । शीघ्र तुवा यावे ।।ध्रु।।
एक शब्दात्मक माया तीचा । सत्ताधीश अससी ।।
एकदंत हे नाम विराजे । माया-दमन करिसी ।।१।।
विन्मुख होता तरि तू सन्मुख साधकासि होसी ।।
वक्रतुंड हे नाम शोभले । करणी तव ऐसी ।।२।।
अनेक विश्वे तुझिया उदरी । होति जाति पाही ।।
लंबोदर हे नाम तुजला साजतसे देही ।।३।।
देहाभिमान मत्त गजाला आकर्षित करिसी ।।
ज्ञान अंकुश तुझिये हाती । काय वानु त्यासी ।।४।।
शूर्प -गुणाने रजोयुक्त ते धान्य रजोहीन ।।





तेवि मायेचा रज जाऊन राहे ब्रह्म कण ।।५।।
तव मुख शूर्प कर्णी लागता येत असे प्रचिती ।।
शूर्पकर्ण या नामे तुजला । सज्जन वर्णिती ।।६।।
आत्मा तूचि ब्रह्महि तूचि । तूचि सकळ कर्ता ।।
धर्ता हर्ता कोण तुजविणे । नाहीच उद्धरता ।।७।।
चित्त दुर्वांकुर आवडे म्हणुनी । अर्पितसे तुजला ।।
स्वानंदाचा मोदक देऊनी । उद्धरी दासाला ।।८।।

(२४७)

सांगा तुम्ही ब्राह्मण । देव कोणे ठायी ।।
देव ठावा नसता । ब्राह्मणत्व नाही ।।१।।
सांगा हो सन्यासी । नारायण कोणे ठायी ।।
नारायणावीणे । यतिधर्म नाही ।।२।।
सांगा जंगम आत्मलिंग कोणे ठायी ।
आत्मलिंगावीण जंगमपण नाही ।।३।।
शेवड्या निरंजन पेठ कोणे ठायी ।
पेठ न जाणता शेवडाचि नाही ।।४।।
सांगा काजी तुमचा अल्ला कोणे ठायी ।।
अल्ला ठावा नसता काजीपण नाही ।।५।।
दास म्हणे राम तुझा कोणे ठायी ।
राम न जाणता आरामचि नाही ।।६।।

(२४८)

ब्रह्मपुरी आम्ही जातो रे । कोण येतो का रे ।
संगे येईल त्यासी नेतो रे । लाभ हातो रे ।।ध्रु।।

गुरुपदि शरण आधि व्हावे रे । नाम घ्यावे रे ।
गुरुनाम निशिदिनी गावे रे । रुप पहावे रे ।।१।।
नामात राम प्रगट होतो रे । भेट देतो रे ।
नेसील तिकडे हा येतो रे। मुक्ती देतो रे ।।२।।
दासाचा निश्चय पाहि रे । शंका नाही रे ।
सदगुरुपद धरुनी राही रे । मुक्ती लाही रे ।।३।।

(२४९)

जववरी सदगुरु प्रसन्न नाही । मातीची महती न कळे ग बाई ।।ध्रु।।
मातीत माणीक चमकत पाही। माणिक न कळता व्यर्थ जन्म बाई ।।१।।
मातीत हिरे लखलखती पाही । हिरे न कळता व्यर्थ जन्म बाई ।।२।।
मातीत मोती झळकती पाही । मोती न कळता व्यर्थ जन्म बाई ।।३।।
मातीत मोहनमाळ गे पाही । माळ न कळता व्यर्थ जन्म बाई ।।४।।
मातीत चांदणी चमकत पाही । चांदणी न कळता व्यर्थ जन्म बाई ।।५।।
गुरुनाम स्कंधी वाहूनि पाही । हनुमंत मातीत नाचतो बाई ।।६।।

(२५०)

स्वयंभसदना सुहास्यवदना प्रगटलासि रामा ।
भवतारक तव पवित्र चरणी । देई नित्य प्रेमा ।।ध्रु।।
वाट धर्माची मोडली साची । सीग अधर्मा चढला ।
धर्म स्थापना करावयाचा । विचार मणी ठरला ।।१।।
आत्म-स्वरूपा विसरुनिया मी । भवचक्री फिरलो ।
काय सुकृत होते न कळे । शरण पदी आलो ।।२।।





पूर्ण कृपेने नाममंत्र तो । कर्णी फुंकियला ।
जिकडे तिकडे देव निरंजन । निर्गुण दावियला ।।३।।
महाविष्णु तू एकनाथ तू । स्वामी गुरुनाथा ।
दास प्रभूचा रामकृपेचा । वंदित पद माथा ।।४।।

(२५१)

स्थिर स्थीर होई मनुबाई । हरिकीर्तनी सावध होई ।।ध्रु।।
काय सांगू तुझ्या संगतिने । नर जन्मा आणिले उणे ।।
एक विषयसेवन करणे । या परते काहीच नेणे ।।
परमार्थ विषापरी वाटे । चौमुक्ती जोडती जेणे ।।
पुरे तुझे नाचणे आता । किती गाजविसी मजवरी सत्ता ।।
साधि साधि काही परमार्था । हरिनामी स्वस्थचि राही ।।१।।
कीर्तन संत रायाचे । परमार्थ तत्वबोधाचे ।।
सांगणे बहुत प्रेमाचे । प्रासादिक गुरुभक्तीचे ।।
आदरे ऐकती साचे । धन्य भाग्य त्या लोकांचे ।।
देव कीर्तनात प्रगटला । जेथे तेथे पाहता भरला ।।
असा अनुभव कोठे न आला । तनु पुलकित जेथे होई ।।२।।
हरि कथा गोड बहु झाली । वाचे न बोलवे बोली ।।
भाग्यवंत मंडळी बसली । अशी शोभा कोठे न दिसली ।।
स्वारी सद्गुरुची आली । चित्तवृत्ती तल्लीन झाली ।।
जिउबाई कीर्तना आली । शिउबाई तिजसि भेटली ।।
मनुबाई निवांत ठेली । दासा प्राप्त झाली गुरुपायी ।।३।।

## श्रीसंत वामनरावजी कोटणीस कृत अभंग

(२५२)

राम राम जगी सर्वही म्हणती । रामाची आकृती कैसी बोला ।।१।।
कोणत्या मुलुखी कोणत्या मंदिरी । कोण्या दरबारी राम आहे ।।२।।
श्वेत की पिवळा तांबडा की काळा । गोरा की सावळा कैसा रंग ।।३।।
बाळ किंवा तरुण किंवा वृद्ध आहे । त्याचे वय पाहे किती सांगा ।।४।।
रामाच्या निजांगी कोणती भूषणे । कैसी ती वसने सांगा आता ।।५।।
सदगुरुवाचोनी नुमजे ही मात । ऐसे श्रुतिमत स्पष्ट आहे ।।६।।
दासाचा सदगुरु रामराय जाणा । दावी सर्व खूणा क्षणमात्रे ।।७।।

## श्रीसंत गोपाळकाका कोटणीस कृत अभंग

(२५३)

रंग माजला रंग माजला रंग गुरूद्वारी ।
मध्यरात्रिसी सूर्य प्रबळला प्रभा पडली भारी ।।ध्रु।।
अभ्राविण तो मेघ वर्षतो कैसा संततधारी ।
उदकाविण त्या लाटा आदळति एकमेकिवरी ।।१।।
नानाविध ती वाद्ये वाजति अनुहात गजरी ।
पश्चिम पंथे प्रवेश केला मूळ गिरीशिखरी ।।२।।
मुक्ताजाळी पाहता तल्लिन वृत्ति हारोहारी ।
चढता उतरता माळ लाविली रामकृष्णहरी ।।३।।
अनुभव ऐसा दासा कळतो सत्य गुरूद्वारी ।
गोपालनाथ कृपा करिल हा भाग्य जरी पदरी ।।४।।





## श्रीसंत पांडुरंगमहाराज ताम्हणकर कृत अभंग

(२५४)

दत्तदर्शना जायाचं जायाचं जायाचं ।
आनंद पोटात माझ्या मायेना ।।ध्रु।।
गेलो रंभापूरी थेट । घेतली दत्ताची भेट ।
या या डोळ्याची । भूक काय जाईना ।।१।।
रुप सावळे सुंदर । गोजिरवाणे मनोहर ।
या या नजरेत । आणिक काय राहिना ।।२।।
नजरबंदीचा हा खेळ । खेळे सदगुरु प्रेमळ ।
खेळ खेळिता । खेळ पुरा होईना ।।३।।
हंडीबाग पांडुरंग । दत्त गारुडी अभंग ।
या या भजनाची । हौस पुरी होईना ।।४।।

(२५५)

आज माझ्या मनी आनंद झाला । दत्तगुरु भेटला ।।ध्रु।।
भक्तजनांचे मंडळ जमले । प्रेम सरोवरी कमळ उगवले ।
सुगंध दरवळला ।।१।।
प्रसन्न मुखडा हसरे डोळे । आनंदाचे अश्रू गळले ।
ब्रह्मानंद भरला ।।२।।
मुक्त मंडळी शोभू लागली । आनंदाने डोलू लागली ।
दिव्य दिव्य सोहळा ।।३।।
पांडुरंग प्रेमाने नटला । दत्तगुरुच्या चरणी पडला ।
भिन्न भाव नुरला ।।४।।

(२५६)
नित्य मनी जपा जपा रामनाम । सर्व मंगल कल्याण धाम ।।ध्रु।।
नाममंत्र महा गुणकारी । काय वर्णावी नामाची थोरी ।।१।।
प्याला शंकर विष हलाहल । शांत झाला जावुनि तळमळ ।।२।।
वाल्या कोळ्याचा वाल्मिक झाला । जगी वंद्य होवुनिया ठेला ।।३।।
पांडुरंग रमला रमला राम नामी । दया करी दत्त गुरु स्वामी ।।४।।

## श्रीमती वेणुबाई सावर्डेकर कृत अभंग

(२५७)
अलौकीक ही कृपा गुरूची । चिमणी साजिरी मूर्ति हरीची ।।ध्रु।।
अनंत जन्मी तप मी केले । सकल सुकृत फळासि आले ।।
निराकार ते साकार जाहले । अलौकीक ही कृपा गुरुची ।।१।।
मंजुळ मधुर नाद हा भरला । हरि मम अंगणी अवचित आला ।
माझ्या दृष्टीमाजी भरला । प्रेम पाघरुण घाली कुंची ।।२।।.
मंजुळ मधुर वाजवी वेणू । व्रज ललनाच्या भुलल्या धेनू ।
वेणी म्हणे धन्य सद्गुरू वचनू । गर्दी झाली रासक्रिडेची ।।३।।

## श्रीसंत मामामहाराज केळकर कृत अभंग

(२५८)
तेरा माजी धनराशी । तेचि धनत्रयोदशी ।।१।।
तेरा अक्षरे परम । श्रीराम जयराम जयजयराम ।।१।।
गोविंद म्हणे तेरा । नुरवी अंतःकरणी मेरा ।।३।।





(२५९)
अहो हनुमंत षष्ठी । करती स्वानंदाची पुष्टी ।।१।।
षडैश्वर्य देऊन । करिती भक्तांचे रक्षण ।।२।।
गोविंदासी नेमी । आणती गंगाधर स्वामी ।।३।।

(२६०)
तीळ घ्या गूळ घ्या गोड बोला वाचे बोलताती ।
तीळगुळ म्हणजे काय याची पडली भ्रांती ।।१।।
तीळ सूक्ष्म प्रेमस्थान नामगूळ पाही ।
प्रेम भावे नाम घेता बोल गोड होई ।।२।।
म्हणोनिया सर्व जनी सदासर्वदाही ।
गोड बोलणे बोलावे पर्व नरदेही ।।३।।
बिंदूस्वरूप ज्ञान होता मकर आन नाही ।
दास म्हणे ते साधिता देवा साह्य होई ।।४।।

(२६१)
तोची सांसारिक भला । जेणे संसार जाणला ।।१।।
संसरणामाजी नाम । सांसारिका हेचि काम ।।२।।
संसरण हा संसार । वाया चाले येरझार ।।३।।
येर विषय उपभोग । अन्य जन्मीचे ते अंग ।।४।।
दासा सुखाचा संसार । एक जोडल्या ईश्वर ।।५।।

(२६२)
नाशीवंत देह लावावा कारणी । नामउच्चारणी देवाजीच्या ।।१।।
देहाचे साधनी पापात्मा पुण्यात्मा । होता अंतरात्मा कळी येई ।।२।।
दास म्हणे ऐसा नरदेह दुर्लभ । साधिलिया लाभ देव एक ।।३।।

(२६३)
साधिलीया मनोजय । तरी साधका विजय ॥१॥
जेणे मनासी जिंकिले । तेणे सर्वांसी जिंकिले ॥२॥
मन हे तो चंचळ जाण । नाम युक्ती ये अधीन ॥३॥
जो का मनाधीन झाला । त्याचा कार्यभाग बुडाला ॥४॥
दासा मन हे अधीन । अशक्य ते शक्य जाण ॥५॥

(२६४)
कळे ऐसे नाम कोणी न शोधिती । प्रारब्धाची गती शोधीताती ॥१॥
कळोनिया काय चुकविता नये । ऐसे बळ आहे प्रारब्धाचे ॥२॥
आपणची सवे घेवोनिया आला । सुखदुःख त्याला तैसे मिळे ॥३॥
प्रारब्ध संबंध असे या शरीरी । नामे भेटे हरी दास म्हणे ॥४॥

(२६५)
एका विकल्पाने बा रे । जग बुडविले सारे ॥१॥
ऐसा विकल्प पातकी । आपआपणा घातकी॥२॥
गोविंद म्हणे नाम घेई । विकल्प मग नुरे काही ॥३॥

(२६६)
ब्रह्मचारी जो विचारी । ब्रह्मी रममाण अंतरी ॥१॥
अक्षर नाम सदा घोकी । सर्व आत्मत्वे विलोकी ॥२॥
गोविंद म्हणे बाईल त्यागे । ब्रह्मचर्य ते वाऊगे ॥३॥

(२६७)
सोडू नये ऐसे काय । धरू नये ऐसे काय ॥१॥
कीर्तनास सोडू नये । प्रपंचास धरू नये ॥२॥





धरावे ते ऐसे काय । संत दाविताती सोय ॥३॥
धरिता नाम संकीर्तन । दास म्हणे नुरे विघ्न ॥४॥

(२६८)
स्वरूपापासोन दूर बुद्धी । तीच जाणावी दुर्बुद्धी ॥१॥
बुद्धी नामी जडता पाहे । स्वरूपात स्थिर होये ॥२॥
गोविंद म्हणे या वाचून । काही करू नको अन्य ॥३॥

(२६९)
जगी वागावे ते कैसे । असाधूसी साधू जैसे ॥१॥
बाळा नीत लावावयासी । माता क्रोध दावि जैशी ॥२॥
तैसा जगामाजी वर्ते । रामनामी तू प्रवर्ते ॥३॥
दास म्हणे तरीच भले । व्हावे वाईटा चांगले ॥४॥

(२७०)
कीर्तनाची गोडी । देवा आतून आवडी ॥१॥
भक्त गाती जये स्थानी । देव वसे तये स्थानी ॥२॥
गोविंद म्हणे कीर्तन । सोडू नये कधी जाण ॥३॥

(२७१)
नाम घेता मुक्ति हे ब्रह्मलिखित । मुक्ति ये शोधित तयालागी ॥१॥
नाम अविनाश ज्याच्या मुखी राही । अविनाश तोही होत असे ॥२॥
ऐसे थाोर आहे नामाचे सामर्थ्य । इतर किमर्थ तया होनी ॥३॥
नाम तारक हा प्रचितीचा डंका । धरू नको शंका दास म्हणे ॥४॥

(२७२)

कैसा पवन साधावा । स्थिर करुनि नामी लावा ।।१।।
घेऊनि सोडणेचे आधी । स्थिर करुनि कुंभक साधी ।।२।।
जैसा जैसा वाढे काळ । पवन विजयाचे बळ ।।३।।
वाढे दासाचे अंतरी । पूर्ण होता साक्षात्कारी ।।४।।

(२७३)

गुरु आज्ञा करितो जैशी । आचरणी ठेवी तैशी ।।१।।
देव तयासी म्हणावे । न लगे तयासी शोधावे ।।२।।
गोविंद म्हणे नाम एक । नामे गुरू शिष्य एक ।।३।।

(२७४)

बंधन विषयाचे। नुरता मोक्षपद साचे ।।१।।
मोक्ष सर्वदा स्वतंत्र । जयात नसे पतरंत्र।।२।।
गोविंद म्हणे अनुग्रह । मोक्ष असे तयासह ।।३।।

(२७५)

साधकाचे हित सद्‌गुरू जाणत । साधक पाहिजे साधनात ।।१।।
मग सद्‌गुरू हे नित्य सान्निध्यात । अंतर दृष्टीने सांभाळीत ।।२।।
सद्‌गुरू माऊली कुरवाळी कृपेने । दासाच्या वैभवा काय उणे ।।३।।

(२७६)

काय देव आहे वनात बैसला । पाहता तयाला दिसेचिना ।।१।।
काय देव आहे जनात बैसला । पाहता तयाला दिसेचिना ।।२।।
काय देव आहे मनात वैसला । पाहता तयाला दिसेचिना।।३।।
दास म्हणे देव भावात बैसला । शोधिता तयाला संनिधचि ।।४।।





(२७७)

उरली नाही वृत्ती । म्हणून बोलती निवृत्ती ।।१।।
मूर्तिमंत ज्ञान । ज्ञानराजा भगवान ।।२।।
भक्ति मार्गीचा सोपान । म्हणून नाव त्या सोपान ।।३।।
मुक्तस्थिती मुक्ताबाई । दास म्हणे नामी पाही ।।४।।

(२७८)

ब्रह्मस्वरूप चैतन्य । ते हे सद्‌गुरू ब्रह्मचैतन्य ।।१।।
ज्यांचे रूप पडता दृष्टी । ज्याचे नाम घेता ओठी ।।२।।
गोविंद म्हणे होती मुक्त । गुरूनामी हे प्रचीत ।।३।।

(२७९)

तोचि जाणावा विश्वासी । जेणे सोडिले विश्वासी ।।१।।
तोचि जाणावा विश्वासी । जेणे जोडिले विश्वासी ।।२।।
तोचि जाणावा विश्वासी । गुरुवचनी विश्वासी ।।३।।
तोचि जाणावा विश्वासी । राहे विज्ञानाचे श्वासी ।।४।।
तोचि जाणावा विश्वासी । नाम घेई श्वासोच्छ्वासी ।।५।।
हरि भक्त तो विश्वासी । दास वंदितो तयासी ।।६।।

(२८०)

सर्व प्रेमामाजी थोर मातृप्रेम । इतरांचे प्रेम न तुळे तेथे ।।१।।
ऐसे थोरपण आले कासयाने । मातेच्या रूपाने देव वसे ।।२।।
संन्यासी झालिया फिटे सर्व ऋण । परी मातृऋण फिटेचि ना ।।३।।
जिच्या आशीर्वादे होतसे कल्याण । हरिगुणगान दास म्हणे ।।४।।

(२८१)

मज सर्वांनी ठकविले । सरळ वागता वैरी झाले ।।१।।
आता तुम्हावीण देवा । कोण सुख माझ्या जीवा ।।२।।
किती लावता उशीर । माझा अंत का पाहणार ।।३।।.
भेटी देऊनि राघवा । मज अंतरी वागवा ।।४।।
काही सज्जन भेटले । तेणे मना सुख झाले ।।५।।
करुणा ऐकोन सीतारमण । देती गोविंदा आलिंगन ।।६।।

(२८२)

साधी साधी साधी साधी गुरूनाम साधी ।
गुरुनाम साधिलीया तुटेल उपाधी ।।१।।
गुरुनाम गुरूपाशी गुरुपदी जाई ।
गुरुपदी जावे कैसे मनी लीन होई ।।२।।
मनी लीन होवोनिया मुखी नाम गाई ।
मुखी नाम घेता दासा गुरुकृपा होई ।।३।।

(२८३)

कसे कसे कसे कसे ब्रह्मरूप होती ।
जसे जसे जसे जसे मने नाम घेती ।।१।।
तसे तसे तसे तसे अनुभव पावती ।
नसे नसे नसे नसे कल्पना जया ती ।।२।।
ठसे ठसे ठसे ठसे एक नाम चित्ती ।
असे असे दास म्हणे संत ब्रह्ममूर्ती ।।३।।





(२८४)

दीपावली दीपज्योती नयनी देखिली ।
सद्‌गुरुच्या पूर्णकृपे हृदयी प्रगटली ।।१।।
अनंत दीप झगझगाट होय अंबरी ।
पाताळी त्याच परी हृदयमंदिरी ।।२।।
तेलवाती पात्राविण तेज कसुरी ।
चंद्र सूर्य विद्युताग्नि न पवे सरी ।।३।।
स्वयंप्रकाश झगझगाट होय अंबरी ।
पाहुनिया समाधान दास अंतरी ।।४।।

(२८५)

जा नित्य नवे जे तेचि समजुनी घेई ।
ज्या धारण करिता वृत्ति ब्रह्ममय होई ।।१।।
जे आदी मध्ये अंती तगते पाही ।
ते सूत्र जाणता सर्व ब्रह्ममय होई ।।२।।
तेथ जो पवित्र अंतरी शोधुनी पाही ।
बा दास म्हणे ते नामी हातासी येई ।।३।।

(२८६)

नामरूप भगवान । माझा नामरूप भगवान ।।१।।
नामरूप सद्‌गुरू कृपा करी । नामचि वदवी महान् ।।२।।
नामचि साधन नामचि कीर्तन । नामाविण नच ज्ञान।।३।।
पंथहि नामचि प्राप्तिही नामचि । दासा तेच प्रमाण ।।४।।

(२८७)

मूळ स्वभाव गुरुनाम । श्रीराम जयराम जयजयराम ।।१।।
अहंकाराच्या अभावे । देव होशील स्वभावे ।।२।।
गोविंद म्हणे स्व-स्वभाव । जीवी सोडी रे अभाव ।।३।।

## श्रीसंत दासराममहाराज केळकर कृत अभंग

(२८८)

नामाचा बिंदू घडला गे माये । अंतर बाहेर प्रकाशे स्वये ।।१।।
जयाचे पोटी साठले ब्रह्म । ज्याने हो गिळिले अगमानिगम ।।२।।
हृदयात झाली वायूची घासणी । कंठात उदेला ॐकार वन्ही ।।३।।
कैसे ते उजळे ब्रह्माचे तेज । निजाते मिळुनी देखे बा गूज ।।४।।
नामची ब्रह्म नामची ब्रह्म । सद्गुरु दाविती प्रणवाचे वर्म ।।५।।
दासरामा ते लाधली भीक । अलख निरंजन हृदयीचे सुख ।।६।।

(२८९)

स्वरूपाचा आनंद । तोची स्वामी स्वरूपानंद ।।१।।
आनंदाचे जे स्वरूप। अमलानंद निर्विकल्प ।।२।।
संतांचे संगती । दासरामा आनंद किती ।।३।।

(२९०)

अक्कलकोट स्वामी दत्ताचे अवतार । कंठी रघुवीर धन्य धन्य ।।१।।
भाग्य ते अपार भरले भांडार । भक्ति बडिवार वाढविला ।।२।।
चोळाप्पा भाविक शीलवान भक्त । चिंती त्याचे चित्त द्रव्यलाभ ।।३।।





जंगलामाझारी नाग होते भारी । तयाचे पदरी बांधिलासे ।।४।।
घरी जावोनीया पहाता चंद्रहार । नवल चमत्कार ऐसा झाला ।।५।।
अशक्य ते शक्य होवोनिया गेले । भक्ताचे आणिले उदया भाग्य ।।६।।
चरणी लागता कृपा केली बरी । नामाचे उच्चारी भाग्य दिले ।।७।।
दासराम गाय कथा हे साजिरी । वंदोनी सत्वरी पाय त्यांचे ।।८।।

(२९१)

हा प्राण आटला वाऱ्यामाजी संगम किती हा गोड ।।ध्रु।।
शांत हरीच्या नामी काया । सर्व मन हे जाय विलया ।
वायुलहरी वायुसागरी मिनली । जेणे हरीची जोड ।।१।।
लाट उसळे वारियाची । वृत्ती हेले या मनाची ।
ते ठायीच रमली विराम पावुनी । हरिनामाचे कोड ।।२।।
नवल नभी या महाली आभा । दृष्टी भरली दिव्य शोभा ।
वायुसंगे घर्षण होऊनी भरले । तेज कसे बिनतोड ।।३।।
वायुरूपे भक्त नटला । वायुरूपाकार झाला ।
दासराम ग्रासुनी चिदाकाशीया । निःशद्बाची जोड ।।४।।

(२९२)

वारियाची मौज किती न्यारी रे । वाऱ्यावरी माझी बहू प्रीती रे ।।१।।
वारा दावी सगुण निर्गुण रे । आत्मवस्तू दावी कशी प्यारी रे ।।२।।
वारियाच्या हाती जीव सारे रे । वारा हा जीवाचा जीवन रे ।।३।।
शुद्ध जे निरंजन वारे रे । चातुरा मनाचा साक्षी रे ।।४।।
आत बाहेर खेळे वारे रे । वारेची आवघे जाले रे ।।५।।

वारियाने आकाशा गिळिले रे । वारियाने आकाशा फोडले रे ।।६।।
आकाशात वारे हे भरले रे । नामरूप गुणाने नटले रे ।।७।।
संतासी अंकिले वारे रे । दासराम त्याचे पायी लोळे रे ।।८।।

(२९३)

या गारा पाहू जरा । पावती निरआकारा ।।ध्रु।।
जेथुनिया या आल्या । त्यातची विरूनी गेल्या ।।
भासती ज्या नासती ज्या । पावू मुळी तो थारा ।।१।।
शीतपणे घन होती । उष्णची मिळवी नीरा ।।
नीर मिसळे जइ नीरा । पहावे केवी आकारा ।।२।।
शीत रूपे वायुची हा । उष्म ही तोची उबारा ।।
द्रवबिंदू जे झाले । त्याचे मूळ हा वारा ।।३।।
ते होऊ गमतीने । जेथुनी जीव पसारा ।।
जीवन ते जीवसृष्टी । दाखवी सार असारा ।।४।।
चराचर व्यापक हा । अवघा एकची सारा ।।
धन्य हा हरी माझा । दासरामी विस्तारा ।।५।।

(२९४)

चैतन्याच्या वाऱ्या तुला माझा नमस्कार ।
तुझा नाद प्रकाश हाची आम्हा साक्षात्कार ।।१।।
तुझे स्फुरण सदा हाची अनुग्रही निर्धार ।
तेथे तादात्म्यता हाचि भक्तिचा बडिवार ।।२।।
तुझा ध्वनी कानी घुसे तोची जयजयकार ।।





मनाची शुद्धता हाची मोठा चमत्कार ।।३।।
सकल देव धर्म पंथ तूची आम्हा साचार ।
मायबाप गुरू दासरामी तू साकार ।।४।।

(२९५)

तूची मला सोड वायू तूची मला सोड रे ।।ध्रु।।
तुझी माझी कइची भेटी । जई जीवन नव्हते सृष्टी ।
गगन बुडबुडा तव पोटी । नवल तुझे कोड रे ।।१।।
तू मी दोनी एकची असता । काय दाविसी अहंता ।
फजीतची झालो पुरता । होऊनी गेलो रोड रे ।।२।।
तू मी मिसळू एकात । संपवोनी सारे द्वैत ।
जीवन हे करू अद्वैत । तेची वाटे गोड रे ।।३।।
माझी ऐक विनवणी । कवाड हे दे उघडोनी ।
नेई निरंजनी झणी । दासराम झोंड रे ।।४।।

(२९६)

मामा तुम्हालागी कोठे धुंडू आता ।
तुम्ही माझ्या चित्ता ठाव दिला ।।१।।
आजवरी होता आपुलिये घरी ।
आता या शरीरी वास केला ।।२।।
हनुमंत तुम्ही तुम्ही हनुमंत ।
न कळेची मात ऐसी झाली ।।३।।
आपुला लडिवाळ बालक हा राम ।
तयासी विश्राम आपुल्या पायी ।।४।।

*****

# दोहरे

ओठ कंठ हाले नहि जिव्हा न बोले राम ॥
राम हमारा जप करे हम बैठे आराम ॥१॥
माला तो करमे फिरे जीभ मुख माही ॥
मन वो तो चहू दिस फिरे ऐसो सुमरन नाही ॥२॥
ओठ न हाले जिव्हा न बोले घटबिच बोलत राम ॥
कहत कमाल कबीरका बालक यहि संतनका काम ॥३॥
ओठ कंठ हाले नही सहज सुमरन होय ॥
कबीर बंदा नरतनका कोटी जज्ञ होय ॥४॥
कबीर कहे मै रामनामका भाता, भीतर रामनामका तीर ॥
ये जिव्हेसे खैचू तो तोडू काल जंजीर ॥५॥
काल हमारा पोंगडा जम करू गुलाम ॥
ह्यासे डेरा उठावू तो वैकुंठ करू मुकाम ॥६॥
तीन भुवन और चौदा लोक एक श्वासका मोल ॥
तुलसी कहे रामभजनबिन वृथा श्वास मत खोल ॥७॥
आसपासमो श्वेत भरा है, श्वेतके बीचमे शाम ॥
शामके बीचमे पुतली झमके, वोही जानो कबीरका राम ॥८॥
कबीर कबीर क्या कहें जा जमुना के तीर ।
एक एक गोपीके प्रेममें बह गये कोटी कबीर ॥९॥
चित्रकुट के घाटपर भई संतनकी भीड ।
तुलसीदास चंदन घसे तीलक करे रघुवीर ॥१०॥



अभंग दरबार भाग – २

## - संदर्भ सूची -

१) अमृतवाणी, रा.गो.केळकर,सांगली, १९८१
२) अवधूत भजनमाला, श्रीपंत पांडुरंग सेवा मंडळ, सांगली, २००८
३) कैवल्यवैभव, र.ह.कोटणीस,सांगली, दुसरी आवृत्ती, १९२६
४) ब्रह्मचैतन्य गाथा, मधुसुदन य.परांजपे, २००१
५) रामदासी गाथा, श्रीसमर्थ सेवा मंडळ, सज्जनगड, तिसरी आवृत्ती,शके १९२१
६) श्रीएकनाथ गाथा, संग्राहक,श्री.नानामहाराज साखरे, २००२
७) श्रीकेशवस्वामीकृत पदसंग्रह
८) श्रीदत्त प्रेमलहरी, श्रीपंत वाङमय प्रकाशन मंडळ, १९९९
९) श्रीदासरामगाथा, १९८८
१०) श्रीदासराममहाराज केळकर यांची हस्तलिखित वही
११) श्रीनामदेव गाथा, संग्राहक, श्रीनानामहाराज साखरे, २००२
१२) श्रीमत् संजीवनी गाथा, स्वामी स्वरुपानंद सेवा मंडळ,पावस, १२वी आवृत्ती
१३) श्रीसद्गुरु तुकोबारायांची वेदवाणी अभंग गाथा, संत वाङमय प्रसारक मंडळ, कराड
१४) श्रीसमर्थ रामदासस्वामी अभंग गाथा, श्रीसंत साहित्य सेवा संघ, सोलापूर
१५) साखरे सांप्रदायिक शुध्द ज्ञानेश्वरमहाराज यांच्या अभंगाची सार्थ गाथा, १९७६
१६) श्रीसंतगाथा, संग्राहक श्रीनानामहाराज साखरे, २००४

* * * *

## – सूची –


ॐ नम: शिवा ४
अक्कलकोट स्वामी दत्ताचे ९७
अखंड खंडेराया रे ६४
अगा देवराया करीतसे ६०
अंतरीची ज्योती प्रकाशली ४१
अधरी धरुनि वेणु ११
अनादि निर्गुण प्रगटली १६
अनुपम्य मनोहरु ८०
अपराध क्षमा आता ७६
अरे नर सारविचार ६२
अरे विठ्या अरे ४९
अलौकिक ही कृपा ८९
अवघाचि संसार सुखाचा ७
अशी ही थट्टा १७
अष्टांगयोगे न शिणिजे ६
अहो क्रोधे यावे ९
अहो हनुमंत षष्ठी ९०
अहं वाघा सोहं १२
आज माझ्या मनी ८८
आता मज एक ७७
आधारचक्र स्थानी ३९
आपणचि जग झाला ६६
आमुची माळीयाची जात ५२
आरंभी आवडी आदरे ५
आम्हा व्रत एकादशी ५४
आम्ही गुरूनाथपंथी ६४
आम्ही नहो हो पांचातले ५७
आम्ही नामाचे धारक ३३
आम्ही निर्गुण पुरिचे ३९
आम्ही हरिहरांच्या दासी ६६

आरंभ नाही शेवट ७८
आलिया संसारा उठा ४२
उर्ध्वपंथे चाल बाई ६७
उरली नाही वृत्ती ९४
एकची टाळी झाली ४६
एकलीच गाणे गाता ४८
एका विकल्पाने बा रे ९१
ऐक ऐक गा २८
ऐसा कोण आहे ४९
ऐसा पुत्र देगा ५३

कथा त्रिवेणी संगम ३४
कथेची सामुग्री ४१
करो प्रभुजीकी बात ४४
कलीमाजी संत झाले ३२
कशामध्ये काही नाही ५८
कशी जाऊ मी वृंदावना १८
कसे कसे कसे ९५
कळे ऐसे नाम कोणी ९१
कानी घालुनिया बोटे ७
काय देव आहे ९३
काळ सारावा चिंतने ३५
कीर्तन चांग कीर्तन ३५
कीर्तनाची गोडी ९२
केला मातीचा पशुपती ३२
कैवल्याचा पुतळा ११
कैसा पवन साधावा ९३
कोण जनाला कोण ६३
कांदा मुळा भाजी ५२
कां रे पुंड्या ३७







गजवदना तू सुख ८३
गणराया लवकर येई ३८
गुरू आज्ञा करितो ९३
गुरु तुझा सर्वस्वी ६८
गुरुकृपेका अंजन पाया ७४
गुरुचे पाय मनी ६०
गुरुच्या उपकारा ७३
गुरुजी मै तो १
गुरुने नवल केले ७६
गुरुपदकमळी मनभ्रमरा ६५
गुरुरायाने नवलाव केला २
गोरा बोलाविला जुनाट १०

घालुनी आसन करी ३९
घुंगट का पट ४४

चला आळंदीला जाऊ २७
चालत नाही बोलत ६०
चाले हे शरीर २९
चिंतावा रघूवीर ७१
चैतन्याच्या वाऱ्या तुला ९९
चंद्रभागे तीरी आयकिली २३

छंद मना घे ६४
जगामध्ये एकचि ब्रह्म ७०
जगी वागावे ते ९२
जनी बैसली न्हायाला ४९
जयाचिये द्वारी सोन्याचा २७
जववरी सद्गुरु प्रसन्न ८५
जा नित्य नवे ९६
जावोनिया तिर्था तुवा ३०
जीवाशिवाचा संयोग ७८
जुग जुग जुग ७४

जो जो जो ६२

झाला विठ्ठल संग ६७
झालासी तटस्त नव्हे ९

टाळी वाजवावी गुढी ५३
डोला भरला जाई ८०
डोळा उघडेना उघडेना ६६
डोळा हा गाळोनी ६२

तगत नाही तगत ६०
तिन्ही देव जैसे १९
तिळाएवढे बांधुनि घर ३९
ती मुंगी उमगा २२
तीळ घ्या गुळ ९०
तुकाराम तुकाराम ५४
तुझिये निढळी कोटि २
तुझी सेवा करीन ६
तुझ्या मुरलीचा ध्वनी १०
तुमचे नामसंकीर्तन १५
तुम्ही या गावचे ७३
तुम्ही संत माय २८
तूची मला सोड १००
तेची गत बाई ७५
तेरा माजी धनराशी ८९
तो नर नर ८१
तो हा पक्षी ४०
तोचि जाणावा विश्वासी ९४
तोचि सांसारिक भला ९०
त्या देवाचे दर्शन ५५
त्याग तरी ऐसा ३१

दत्त दर्शना जायाचं ८८

| | |
|---|---|
| दीपावली दीपज्योती | ९६ |
| देख खुल गई | ४३ |
| देव देव देव | ६५ |
| देवा तुझा मी | ५५ |
| दृष्टीचा देखणा दृष्टी | ७ |
| धरीला पंढरीचा चोर | ४७ |
| धन्य आज दिन | १५ |
| धन्य धन्य ते | ६१ |
| धन्य धन्य सद्गुरुराव | ९ |
| धन्य धन्य श्रीगुरुभक्त | १९ |
| ध्यान करो गुरु | ७९ |
| नवल वर्तले नवल | ५० |
| नवल हा प्रकाश | ५४ |
| नव्हे आधीचे मधीचे | ३३ |
| नव्हे जाखाई जोखाई | ४१ |
| नव्हे तेचि कैसे | २५ |
| नाचू कीर्तनाचे रंगी | १९ |
| नाम घेता मुक्ति | ९२ |
| नाम घेता वाया | ३१ |
| नामरुप भगवान | ९६ |
| नामाचा बाजार पंढरी | २९ |
| नामाचा बिंदू घडला | ९७ |
| नामाचे चिंतन श्रेष्ठ | ४२ |
| नामचे धारक विष्णुरूप | १२ |
| नामस्मरण तुम्ही करा | ७३ |
| नारायणा बा नारायणा | ९ |
| नाशिवंत देह लावावा | ९० |
| नांव मारुतीचे घ्यावे | ६१ |
| निर्गुणाचे भेटी आलो | ५१ |
| निजगुजा गुज तो | ८ |
| निजवदनी हरिनाम | ७४ |
| निजाचे तेज की | ८ |
| नित्य मनी जपा | ८९ |
| निर्धनको धन राम | ६९ |
| निरंजनी वनी देखियेली | ३८ |
| नौकरी शर्यतसे करना | ४४ |
| पन्नास अक्षरी करिसी | ५ |
| परेस सद्गुरुराया रे | १४ |
| पवित्र सुदिन उत्तम | ५१ |
| पहा आपुले शरीरी | ४० |
| पहा ते पांडव | ३७ |
| पाहुणे घरासी आजी | ३६ |
| पाहे प्रसादाची वाट | ३७ |
| पांडुरंग श्रीरंग भजो | २३ |
| पिकलिया सेंद कडुपण | ३४ |
| पुढे ज्ञानेश्वर जोडोनिया | २६ |
| पुरे पुरे हा | ३८ |
| पूर्वजन्मी पाप केले | ३ |
| पैल मेरूच्या शिखरी | ७ |
| पंढरी पंढरी | २१ |
| पंढरीचे भूत मोठे | ३७ |
| प्रगट निरंजन प्रगट | ६१ |
| प्रभुजी बहुत मजा | ८० |
| प्रारब्धेचि जोडे धन | ४१ |
| फणसाचे अंगी काटे | ५५ |
| बरवा वो हरि | ६ |
| बाग रंगेली महाल | ६५ |
| बंगला खुप बनाया | ४४ |
| बंधन विषयाचे | ९३ |







| | |
|---|---|
| ब्रह्मचारी जो विचारी | ९१ |
| ब्रह्मपुरी आम्ही जातो | ८४ |
| ब्रह्मस्वरूप चैतन्य | ९४ |
| भक्त ऐसे जाणा | २९ |
| भक्ति ते नमन | ३६ |
| भजनाचा शेवट आला | ७९ |
| भाग्यवंता घरी भजन | ५३ |
| भाव धरूनिया वाची | १३ |
| मज सर्वांनी ठकविले | ९५ |
| मन करा रे प्रसन्न | ३४ |
| मन हे राम झाले | ४ |
| मनुष्य करिसी तरी | २० |
| महाराजा सद्गुरु मायबापा | ७५ |
| मागे बहुता जन्मी | ३० |
| माझ्या जिवीची आवडी | ८ |
| माझ्या वडिलांची मिराशी | २९ |
| मामा तुम्हालागी कोठे | १०० |
| मी तव अनाथ | २७ |
| मूळ स्वभाव गुरुनाम | ९७ |
| मोडकेसे घर तुटकेसे | १५ |
| मोतियांचे चूर फेकिला | ८ |
| मोतियांचे पाणी रांजण | ४३ |
| या गारा पाहू जरा | ९९ |
| या या संसाराचे | ३१ |
| यार देखो रे देखो | १४ |
| येग येग विठाबाई | ४९ |
| येथुनि पुढे बरे | १५ |
| येथे काय उभा | ५९ |
| योगिया दुर्लभ तो | २ |
| रक्तवर्ण त्रिकुट स्नान | ४८ |
| राई एवढे पाखरू | २४ |
| राम म्हणता रामचि | ३२ |
| राम राम जगी | ८७ |
| रामनाम तू भजले | ४५ |
| रामनाम धरी कंठी | ७८ |
| राममय वृत्ती झाली | ६७ |
| रंग माजला रंग | ८७ |
| लटके न बोलू | २१ |
| लहानपण दे गा | ३५ |
| लटिके ते साच | ४० |
| लटिके हासे लटिके | ३६ |
| लागला तोबा तोबा | ७० |
| लाविली बत्ती आता | ६३ |
| लेकुराचे हित | २६ |
| लोडीस्ते बलीस्ते पलंग | ३६ |
| वचन ऐका कमलापती | ५१ |
| वर्म नाही ठावे | १ |
| वारियाची मौज किती | ९८ |
| वारियाने कुंडल हाले | १३ |
| वाऱ्याने दुनिया गेली | २२ |
| विषयी विरक्तपण | ५८ |
| विठो माझा लेकुरवाळा | ४७ |
| वेदासी कानडा श्रुतिसी | २१ |
| वैष्णवा घरी देव | १३ |
| वंदियला भगवंत | ५७ |
| शिव भरला शिव | ७४ |
| शुभशकुन सांगा | ७० |
| शांती परते नाही | ३५ |
| श्रीगुरुसारिखा असता | ४ |
| श्रीराम अवतरला | ८२ |

श्रीज्ञानराजे केला उपकार ४३
श्वासोश्वासी निमिषोन्मेषी ३८
षट्चक्रावरी त्रिकुटा ४०

सदा माझे डोळा २६
सदाशिवाचा अवतार ४६
सद्गुरुनायके पूर्ण कृपा २१
सद्गुरुंनी दया बहुतचि ८२
सण दिवाळीचा आला ५०
सत्तेने जग चाले ८१
सत्वर पाव गे १३
समयासी सादर व्हावे ५२
सर्व प्रेमामाजी थोर ९४
सर्व सुखाची लहरी ११
स्वप्नामाजी सभा बैसली ५८
स्मरण देव स्मरण ५९
स्वरूपाचा आनंद ९७
स्वरुपापासून दूर बुद्धी ९२
स्वयंभ सदना सुहास्य ८५
साठविला हरि ३६
सार्थक होते, सार्थक ५९
साधन काय करू ७२
साधकाचे हित सद्गुरु ९३
साधी साधी साधी ९५
साधिलीया मनोजय ९१
सावध व्हा गडे ७१
सांगा तुम्ही ब्राह्मण ८४
स्थिर स्थिर होई ८६
सुख वाटे येचि ४२
सुखदुःख समान सकळ १०
सुखालागी जरी करिसी २०
सूक्ष्म गुरुमार्ग गुरुमार्ग ६९

सोहं तो रे ३०
सोडू नये ऐसे ९१
सोहं स्वरूप तेचि ३९
संग्रह कोण करी ६८
संतकृपा झाली ३३
संत दयाळ कसे ७६
संत भेटती आजि ५
संताचेनि संगे देव ६१
सुंदर माझे जाते ४८

हजरत मौला मौला १६
हडबडले पातक १९
हम तो बेपरवा ४६
हरि हरि बोला १८
हरीकथेची आवडी देवा २८
हरिगुन गावत ७२
हरिप्राप्तीसी उपाय १६
हरिभजनावीण काळ ५६
हरिदासाचिये घरी मज २८
हरिस्मरण–विस्मरण ५६
हा प्राण आटला ९८
हिरे जळामधी भिजतील २३
हुरमुंजी रंगाचा उंच ३२
हे खूण अनुभवाची ७७
ज्ञान म्हणजे काय ३१
ज्ञानाचा सागर ५०
ज्ञानदेव गुरु ज्ञानदेव ४२
ज्ञानराज माझी योग्यांची २०
ज्ञानियांचा राजा गुरु २८


****





## प.पू.श्रीमामामहाराजांची आरती

आरती गोविंदा । नित्य कीर्तनानंदा ।
सच्चिदानंदकंदा । गुरुलिंग साधु बोधा ।।१।।
हनुमंत सद्गुरु आज्ञे । केले अखंड कीर्तन ।
सर्वस्व वेचियेले । समर्पिले पंचप्राण ।।२।।
ब्रह्मचैतन्यादी संत । भाऊराव समर्थ ।
रामचंद्र नारायण । नाम बोधी हे कथीत ।।३।।
श्रीराम जय राम जय जय राम । तेरा अक्षरे परम ।
संदेश निर्वाणीचा । पायी लोळे *दासराम* ।।४।।

– श्रीदासराममहाराज

*

## प.पू.श्रीदासराममहाराजांची आरती

आरती रामराया । करी कृपेची छाया ।
दावोनी दीनी दया । धन्य धन्य महाराया ।।ध्रु।।

सद्गुरु हनुमंत । पिता गोविंद संत ।
बोधी गुरुलिंग सिद्ध । धरुनि रूप सिद्धानंद ।।१।।

सिद्धसाधनाने । स्वये ब्रह्मचि झाले ।
भावादरे *केशवाने* । चरणी मस्तक ठेविले ।।२।।

– प्रा.डॉ.के.वा.आपटे

## श्रीदासराममहाराजांची ग्रंथसंपदा

१) मनोहर विनायक मंगळवेढेकर यांचे ओवीबद्ध चरित्र................१९४०

२) श्रीज्ञानदेवतेहत्तिशी,सानंद टीकेसह,व तात्पर्यार्थसह श्रीज्ञानेश्वरमहाराजांचा हरिपाठ..१९५२

३) श्रीज्ञानदेवमुद्राप्रकाश, साधनमुद्रा टीकेसह, आणि ज्ञानेश्वरीसार.......१९६८

४) वायुलहरी, आणि ज्ञानदेव आज्ञापत्र (ओवीबद्ध भावार्थ)............१९६९

५) ज्ञानेश्वरकृत दत्तस्तुति, श्रीदत्तस्तुतिप्रसाद ओवीबद्ध टीकेसह.........१९७१

६) श्रीज्ञानेश्वरकृत नमनस्तोत्र, भावार्थ नमनासह.........................१९७२

७) श्रीनारायणरावजीमहाराज यरगट्टीकर चरितामृत........................१९७३

८) श्रीनागाप्पाण्णामहाराज निंबरगीकर चरित्र.................(सन दिलेला नाही)

९) श्रीज्ञानेश्वरी चिंतनस्तोत्र व ज्ञानेश्वरी संकीर्तन स्तोत्र (भावार्थासह)....१९७४

१०) श्रीज्ञानेश्वरस्तोत्र.....................................................१९७५

११) सिद्धस्तुती........................................................१९७७

१२) अमृतानुभव मंगलाचरण, मंगलप्रसाद टीकेसह.........................१९७९

१३) तात्यासाहेब कोटणीसमहाराज चरित्र..............................१९८३

१४) श्रीसंत राधाबाई अक्का यांचे चरित्र...............................(सन नाही)

१५) गुरुपाठ.............................................................१९८४

१६) सांप्रदायबोध...................................................... १९८४

१७) श्रीरामपाठामृत......................................................१९८४

१८) बाबासाहेब मुजुमदार यांचे चरित्र....................................१९८४

१९) श्रीएकनाथी भागवत : संक्षिप्त पाठस्तोत्र..............................१९८७

२०) नित्यपाठामृत........................................................१९८७

२१) संजीवनपाठ..........................................................१९८७

२२) श्रीदासरामवचनामृत................................................ १९८७

२३) नासदीयसूक्त, भावार्थ संगति.................................... १९८८

२४) श्रीगोविंददर्शन......................................................१९८८

२५) सांगली माहात्म्य ऊर्फ श्रीगंगाधरपंत चरितामृत....................१९८८

२६) श्रीदासरामगाथा.....................................................१९८८

२७) श्रीतुकाराममहाराज नित्यपाठ, भावार्थ विवरण.......................१९८९

२८) श्रीगुरुमहिमा........................................................१९९१

२९) श्रीज्ञानेश्वरस्तोत्र व अन्य लघुग्रंथ..................................१९९७

३०) श्रीरामदासबोध......................................................१९९७

३१) श्रीचांगदेवपासष्टी, एक नाम कला.................................१९९९

३२) परमार्थासार आणि अन्य ग्रंथ (उद्धवरावजी महाराज यरगट्टीकरांच्या चरित्रासह)..२००२

३३) परमार्थ प्रश्नोत्तरी, आवृत्ती पाहिली व दुसरी.......................२००२

३४) आरती संग्रह........................................................२००२

३५) चांगदेव पासष्टी व इतर ग्रंथ.......................................२००२

३६) हरिपाठ संकीर्तन....................................................२००७

३७)श्रीदासराममहाराज : श्लोकरचना...................................२०१०

३८)अनुभवामृत, सम-ओवी-टीकेसह....................................२०१०

३९)परमार्थ प्रश्नोत्तरी, आवृत्ती तिसरी.................................२०१०

४०)आत्माराम (श्रीदासराममहाराजकृत गद्य अर्थासह)...................२०१०

४१) ग्रंथत्रमी...........................................................२०११

४२) उत्तरगीता (श्रीदासराममहाराजकृत गद्य अर्थासह)...................२०११

४३) सद्बोध दशक........................................................२०११

४४) गुरुराजकथित ज्ञान आणि बोध ....................................२०११

४५) श्रीदासराममहाराजलिखित लघुचरित्रे...............................२०११

४६) श्रीदासराममहाराज यांची आत्म लहरी..............................२०११

४७) श्रीदासराममहाराज यांची प्रवचने...................................२०१२

४८) श्रीज्ञानेश्वरी (अध्याय ६ वा) (श्रीदासराममहाराजकृत गद्य अर्थासह).......२०१५

❖ श्रीदासराम ग्रंथमाला पुष्प सूची ❖

| पुस्तकाचे नांव | पुष्प क्रमांक | सन |
|---|---|---|
| चिमड संप्रदाय | १ | २००५ |
| श्रीरामदासस्वामी चरित्र | २ | २००६ |
| भजन तरंग | ३ | २००६ |
| हरिपाठ संकीर्तन | ४ | २००७ |
| श्रीदासराममहाराज नित्यपाठ चरित्र | ५ | २००७ |
| दासबोधातील तत्त्वज्ञान | ६ | २००७ |
| श्रीदासराममहाराजांचा वचनसंग्रह | ७ | २००८ |
| श्रीरघुनाथप्रिय साधुमहाराज चरित्र | ८ | २००९ |
| साधन संध्या | ९ | २००९ |
| अनंत अमृत स्मरण | १० | २००९ |
| श्रीगुरु महिमा | ११ | २००९ |
| श्रीज्ञानेश्वरी प्रसाद | १२ | २००९ |
| श्रीदासराम गाथा : पुरवणी | १३ | २००९ |
| श्रीदासराममहाराज : आत्मचरित्र | १४ | २०१० |
| श्रीनारायणमहाराज यरगट्टीकर यांचे चरित्र | १५ | २०१० |
| श्रीदासराममहाराज : श्लोकरचना | १६ | २०१० |
| ज्ञानदेवकृत अनुभवामृत(ओवी टीकेसहित) | १७ | २०१० |
| श्रीदासराममहाराज सहस्रनामस्तोत्रम् | १८ | २०१० |
| आत्माराम(श्रीदासराममहाराजकृत्त गद्य अर्थासह) | १९ | २०१० |
| श्रीगुरुलिंगगीता (कानडी लिपीत) | २० | २०१० |
| श्रीगुरुलिंगगीता (मराठी) | २१ | २०१० |
| श्रीरामनिकेतन | २२ | २०११ |
| श्रीरामनिकेतनमधील आराधना | २३ | २०११ |
| ग्रंथत्रयी | २४ | २०११ |
| उत्तरगीता (श्रीदासराममहाराजकृत्त गद्य अर्थासह) | २५ | २०११ |
| अभंग दरबार | २६ | २०११ |
| सद्‌बोध दशक (श्रीदासरामरक्षास्तोत्रासह) | २७ | २०११ |
| श्रीदासराममहाराज नित्यपाठ चरित्र (आवृत्ति ३री) | २८ | २०११ |
| श्रीगुरुराज कथित ज्ञान आणि बोध | २९ | २०११ |
| प.पू.श्रीमाईसाहेब यरगट्टीकर यांचे चरित्र | ३० | २०११ |
| पाठांतरसुलभ भगवद्‌गीता (आवृत्ति २ री) | ३१ | २०११ |

| पुस्तकाचे नांव | पुष्प क्रमांक | सन |
|---|---|---|
| श्रीदासराममहाराज लिखित लघुचरित्रे | ३२ | २०११ |
| श्रीतात्यासाहेबमहाराज कोटणीस कृत मनोबोध व निवडक अभंग (विवरणासह) | ३३ | २०११ |
| प.पू. सद्‌गुरू श्रीरामभाऊमहाराज यरगट्टीकर | ३४ | २०११ |
| महायोगिनी श्रीलक्ष्मीबाई अक्का | ३५ | २०११ |
| तो हा दासबोध | ३६ | २०११ |
| श्रीदासराममहाराज चरितामृत (२ री आवृत्ति) | ३७ | २०११ |
| श्रीनिंबरगीकरमहाराज चरित्र ( ४ थी आवृत्ति) | ३८ | २०११ |
| श्रीदाजीसाहेबमहाराज चरित्र | ३९ | २०११ |
| श्रीतात्यासाहेबमहाराज कोटणीस चरित्र | ४० | २०११ |
| श्रीदासराममहाराज यांची आत्म लहरी | ४१ | २०११ |
| हरिनामसंकीर्तन | ४२ | २०१२ |
| श्रीदासराममहाराज यांची प्रवचने | ४३ | २०१२ |
| प.प.सद्‌गुरु श्रीमामामहाराज केळकर चरित्र | ४४ | २०१२ |
| दासरामगीतम् | ४५ | २०१२ |
| श्रीदासराममहाराजांचा वचन संग्रह (आवृत्ती तिसरी) | ४६ | २०१२ |
| चैतन्यब्रह्म | ४७ | २०१३ |
| श्रीदासराममहाराज विरचित वायुलहरी विवरण | ४८ | २०१३ |
| श्रीदासराममहाराजकृत विवरणासह सात करुणाष्टके | ४९ | २०१३ |
| श्रीगुरुलींगगीता | ५० | २०१३ |
| चिमड सांप्रदायातील पंचपदी (विवरणासह) | ५१ | २०१३ |
| गुरुलींगगीतेचे अंतरंग (भाग-१) | ५२ | २०१४ |
| राम दास बोध | ५३ | २०१४ |
| श्रीदासरामायण | ५४ | २०१४ |
| वास्तुशांत | ५५ | २०१४ |
| श्रीदासराममहाराजकृत रेवणसिध्दपाठ (विवरणासह) | ५६ | २०१५ |
| गुरुलींगगीतेचे अंतरंग (भाग-२) | ५७ | २०१५ |
| अभंगदरबार (आवृत्ती दुसरी) | ५८ | २०१५ |
| श्रीदासरामचरित्र | ५९ | २०१५ |
| आत्मारामपाठ | ६० | २०१५ |
| श्रीज्ञानेश्वरी (अध्याय ६ वा)(श्रीदासरामकृत अर्थासह) | ६१ | २०१५ |
| श्रीमत् दासबोधातील प्रपंचयोग | ६२ | २०१५ |